साप्ताहिक

# माणूस

५ एप्रिल १९८६ । २ रुपये



## कलावंत समाजसुधारक आणि लोकनेता भाई माधवराव बागल

## चार्ल्स शोभराज

आणि तिहार तुरुंगातील भ्रष्टाचार....

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : पंचेचाळिसावा

५ एप्रिल १९८६
किमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस


वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ—सुरेश नावडकर



## मुंबापुरी

### ☐ राज्यपालांचे प्रकृती–अस्वास्थ्य

तुम्ही म्हणाल दर आठवड्याला हे कोना प्रभाकर रावांवर काय लिहितात म्हणजे यांना दुसरा विषयच नाही काय? परंतु एकदा शेजाऱ्याची दुसऱ्या गावी बदली झाली की नंतर त्याच्याविषयी वाईट बोलण्याचे आपल्याला कारणच उरत नाही; त्यानुसार ह्यापुढे प्रभाकर रावांवर लिहिण्याचा प्रसंग येईल असे वाटत नाही.

बुडत्याला कधी वाचवू नये असे म्हणतात ते काही खोटे नाही. शिवाजीराव तर बुडालेच पण बरोबर कोना प्रभाकर रावांनाही घेऊन रसातळाला गेले. राजभवनावर जाणाऱ्या पाहुण्यांनासुद्धा तेथून लवकर बाहेर पडण्याची इच्छा होत नाही, मग राज्यपालांची काय स्थिती झाली असेल याची तुम्हाला कल्पना येईल.

फार मोठ्या पदावर छोट्या माणसांची नियुक्ती झाली की आपल्याबरोबर त्या पदाचेही महत्त्व ते कमी करतात. एकदा आपली खुर्ची गेली की कोणी आपल्याला जवळ उभेसुद्धा करणार नाही ह्या चिंतेने ते ग्रासलेले असतात. त्यामुळे स्वतंत्रपणे परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात राहात नाही. चंद्रकलेच्या परीक्षेचा राज्याच्या शासन यंत्रणेशी काय किंवा काँग्रेस आय पक्षाशीही सुतराम संबंध नव्हता. त्यामुळे त्यात कोना प्रभाकर रावांनी लक्ष घालण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. नंतर मात्र सारे प्रकरण अंगाशी येत आहे असे पाहिल्यावर त्यांची अचानक प्रकृती बिघडली.

राज्यपाल किंवा मुख्यमंत्री ह्यासारख्या पदांना नैतिक अधिष्ठानाची गरज असते. अंतुले ह्यांच्यावर खटला भरण्याची परवानगी माजी राज्यपाल लतीफ ह्यांच्याकडे मागण्यात आली होती, तेव्हा असाच प्रश्न उपस्थित झाला होता. परंतु त्यांना निर्णय घेताना पक्षाचा विचार करण्याची आवश्यकता नव्हती.

शिवाजीराव पाटलांचे स्थान काही राजकीय घडमोडींमुळे धोक्यात आले नव्हते. त्यामुळे हायकोर्टाच्या निर्णयापर्यंत राज्यपाल स्वस्थ बसले असते तरी दिल्लीने त्यांना दोष दिला नसता. ह्याच कोना प्रभाकर रावांनी मागे अंतुल्यांचे प्रतिष्ठान हे कायद्याला धरून आहे असा नरसिंह रावांना सल्ला दिला होता.

खरे पहाता डॉक्टर गारे ह्यांनी राजीनामा दिल्यानंतर विद्यापिठातील कामात हस्तक्षेप केल्याचा राज्यपालांवर आरोप झाला तेव्हाच कोना प्रभाकर रावांनी राजीनामा देण्याची गरज होती. पण त्यानंतर त्यांनी पत्रकारांचीदेखील भेट घेतली नाही. आता पुणे आणि मुंबई विद्यापिठांनी ठराव संमत केल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला ह्यात काही आश्चर्य नाही. त्यांनी तो दिला नसता तरी राष्ट्रपतींनी त्याना भाग पाडले असते.

'ज्या विद्यापिठांचा मी कुलपती आहे त्या विद्यापिठांनीच माझ्यावर अविश्वास दाखविल्याने विद्यापिठांचे आरोप योग्य की अयोग्य याबद्दल मत व्यक्त न करता नैतिक भूमिकेतून मी राजीनामा देत आहे' अशी भूमिका न घेता प्रकृती ठीक नसल्याने आपण राजीनामा देत आहोत असे राज्यपालांनी म्हटले. ह्यावर आता विश्वास कोण ठेवणार? पूर्वी आम्ही सकाळपासून पोट दुखते आहे ह्या कारणास्तव शाळेत जात नसू. परंतु त्यामुळे शिक्षकांचे काहीच नुकसान होत नाही हे पाहिल्यावर आम्ही सुरळीत शाळेत जाऊ लागलो. असो.

कोना प्रभाकर रावांना दहा मुले आहेत. त्यांचा नियमित अभ्यास घ्यायचे सोडून

त्याना शिवाजीरावाच्या मुलीची काळजी करण्याचे काहीच कारण नव्हते.

### ☐ नवे मंत्रिमंडळ

विधानसभेच बजेट सेशन आटपल बुवा एकदाच. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात जसजसे मुख्यमत्री बदलतायेत, तो तो अधिवेशनाचा कालावधी कमी कमी होत जातो. नागपूरचं हिवाळी अधिवेशन म्हणजे एवीतेवी सहलच असते. पत्रकारासाठी आणि आमदारकपनीसाठी. आता काही दिवसात पावसाळी अधिवेशन तीन–चार दिवसात उरकून टाकण्याच जर राज्य-कर्त्यांनी ठरवल तर आश्चर्य वाटायला नको.

शकरराव जवळजवळ दहा वर्षानतर महाराष्ट्राच्या आखाड्यात उतरलेत. त्याचं हे पुनरागमन कितपत यशस्वी, फलदायी होतं हे एक त्या जयतरावांना (साळगावकर) अन् वसतरावाना (हो, हो, जयपूरवाले) ठाऊक.

साप्रत, सगळ्याच म्हणणं असं आहे की, शंकरराव अगदी पक्की माड ठोकून आहेत, अन् तसेच राहणार. पत्रकारही असच म्हणतायेत पण या पत्रकारावर जाऊ नका. काय वाट्टेल ते करतील. हिचकॉकच्या चित्रपटातली नायिका कशी हसत हसत फसवून जाते !

शकररावाचं मत्रिमंडळ 'बॅलन्स्ड' नाही अशी कुरबुर सुरू झालीये विलासराव देशमुखाना 'प्रमोशन' मिळणं समजू शकतं. पण त्या श्रीकात जिचकाराना पुन्हा घ्यायच कारण काय? विधान परिषदेत या जिचकारानी परवा वोट ऑन अका-ऊन्ट्स माडताना इतका तारस्वर लावला होता की, याना अशोक रानड्याच्या व्हाईस-कल्चर क्लासला पाठवाव अस मनात आलं.

वसंतराव घोत्रे, सय्यद अहमद वगैरेंची तर साध्या अल्प–सूचना प्रश्नाची उत्तरे देताना वाट लागते. फोर्टमधल्या 'पुरुषोत्तम बिल्डिंग' वरच्या प्रश्नावर या अहमदसाहे-बांनी असा छानपैकी घोळ केला की अखेरीस मुख्यमंत्र्यांना उत्तर द्यावं लागलं

मंत्र्यांनी उत्तर कशी द्यावीत ? तर नरेंद्र तिडक्यासारखी. दहा मिनिटे सविस्तर उत्तर दिल तरी तिडक्याना नेमक काय सागायचंय ते ध्यानात येत नाही. आणि सर्वात ग्रेट म्हणजे प्रश्न विचारणारा समाधानी होत्साता आणखी उप–प्रश्न विचारण्याच्या भानगडीत न पडता स्वस्थ बसतो.

उगीच नाही तिडक्याचा चौदा वेळा शपथविधी झाला याच वेळा चान्स कसा काय हुकला हो तिडकेजी ?

### ☐ अल्लादियाखाँची पुण्यतिथी

गेल्या पाऊणशे–एक वर्षात उत्तरेकडच्या दिग्गज गायकांनी दक्षिणेत आपल बस्तान माडल त्यात भू–गधर्व रहिमतखाँ आणि संगीतसम्राट अल्लादियाखाँ यांचा उल्लेख अटळ आहे.

भू–गधर्व रहमतखासाहेबांना आपल्या सर्कसवाल्या विष्णुपत छत्र्यानी साभाळल. अल्लादियाखाँसाहेबांची थोरवी कोल्हापुरात दरवळली. केसरबाई केरकर त्याच्या शिष्यो-त्तमा. खाँसाहेबाच्या दोन्ही सुपुत्राचो–भूर्जीखां आणि मजीखा–तालीम मधू कानिट-कर, गजाननबुवा जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर, मोगूबाई कुर्डीकर वगैरे नामवत कलावंताना मिळाली.

चव्वेचाळीसच्या विक्रमादित्य सगीत सोहळ्यात अल्लादियाखाँ शेवटच गायले. मुंबई विद्यापिठाच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यात बडे गुलाम अलीच पहिल गाणं झाल.

हे सगळ सविस्तर सागायच कारण या आठवड्यात अल्लादियाखाँसाहेबांची पुण्य-तिथी होती. आज मुबईत जयपूर–अत्रोली घराण्याच्या नावाने टिळा लावणारे पुष्कळ आहेत. सगीतसंस्थाही बख्खळ आहेत. तरीही एक चेंबूरचा पुण्यतिथी सोहळा सोडला तर अल्लादियाखाँसाहेबाची याद कुणालाच आली नाहीये. कुमार गधर्व, बसवराज राजगुरू, डॉ. अशोक रानडे, श्रुती सडोलीकर प्रभृती गायक चेंबूरच्या पुण्यतिथी सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहिले. बाकी सर्वत्र विस्मरणाचा सन्नाटा.

याच आठवड्यात मोगूबाई कुर्डीकर, किशोरी आमोणकर प्रभृती कलावतानी रवळनाथाच्या स्मारकासाठी तीन दिवसाचा जलसा योजला. रवळनाथाविषयी मोगूबाईंना जेवढी श्रद्धा आहे तितकीच आम्हालाही आहे. त्यात वाद नाही. पण ज्या जयपूर घराण्याची डौल–पताका मोगूबाईंच्या खाद्यावर आहे त्या घराण्याचे आद्य संस्थापक–प्रणेते अल्ला-दियाखाँ यांचे विस्मरण मोगूबाईंना कसे झाले ?

– विष्णू जयदेव

---

## पुणे वार्ता

### ☐ अपक्ष माहात्म्य

ज्ञानेश्वर लांडगे पिंपरी-चिंचवड महा-पालिकेचे पहिले–वहिले महापौर झाले आणि गेला महिनाभर रगलेल्या या नाटकावर अखेरचा पडदा पडला. तीनवर्षापूर्वी महा-पालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर २ मार्चला पहिल्या निवडणुका झाल्या आणि २७ मार्चला महापौराची निवड झाली. पण मधली २ मार्च ते २७ मार्च ह्या कालावधीत जे प्रसंग रंगले त्यानी पिंपरी–चिंचवडकरांचे मस्त मनोरंजन केले.,

पिंपरी–चिंचवड म्हणजे पुण्याच धाकटं भावंड. म्हणूनच त्याच्या पहिल्यावहिल्या निवडणुकीत आपल्या Big Brother चे अनुकरण न घडेल तर नवल ! खर तर या निवडणुकीत सगळ्याच पक्षांचे अंदाज साफ झोपले. शरद पवाराना या शहराचा फार मोठा दिलासा होता. पण त्याच्या पक्षाला अवघ्या दहा जागा मिळाल्या. कॉंग्रेस आयला २४ जागा मिळाल्या पण बहुमतासाठी अपुऱ्याच. अपक्षावर मात्र मतदारांनी मेहर-बानी केली आणि म्हणूनच सर्व राजकीय पक्ष अडचणीत आले.

अपक्षाचे माहात्म्य फार मोठे आहे काल-पर्यंत बडखोर–बंडखोर म्हणून ओरड कर-णारे, पक्षशिस्तीच्या नावाखाली हकालपट्टीची भाषा बोलणारे महाभाग बहुमतासाठी हवाल-दिल होतात आणि कालची शिवराळ भाषा विसरून आर्जवे, मनधरणी सुरू करतात. अपक्षाना काय– जो देगा उसका (च) भला ! याची मजल कुठवर जाते त्याचे जिवत (आणि विदारक) चित्र या निवड-णुकीत पहायला मिळाले.

बहुमतासाठी कॉंग्रेस आयने अपक्षाला उपमहापौरपद देऊ केले तर विरोधी आघा-

डीने त्याहीपुढे जाऊन चक्क महापौरपद देऊ केले ! महापौरपदाच्या निवडणुकीआधी आपली आघाडी फुटू नये म्हणून एक गट महाबळेश्वरात थंड हवेची सैर करत होता तर दुसरा गट कर्जत, खंडाळ्यात मजा लुटत होता. (अखेर फुटायचे ते फुटलेच.)

असो. अखेर निवडणूक झाली. लाडगे महापौर झाले. हनुमंतराव भोसले उपमहापौर झाले. त्यांच्या निवडणुकीत गैरप्रकार झाल्याची ओरडही झाली. त्या निमित्ताने सभात्यागही घडला आणि खऱ्या अर्थाने महापालिका 'कार्यान्वित' झाली आता पाच वर्षे हेच चालणार आहे आपापले गट साभाळण्यात आणि रस्सीखेच खेळण्यातच सर्वस्व पणाला लागायचे आहे. त्यापुढे नागरी वगैरे प्रश्न चिल्लर बाबी आहेत.

आपल्या Big Brother च्या पावलावर पाऊल ठेऊन या नव्या पालिकेने वाटचाल सुरू केली आहे.

### ☐ फिल्मी सितारे पण साधेच

एखाद्या कार्यक्रमला फिल्मी व्यक्ती बोलवावी का हा मुद्दा विवाद्य आहे. बहुताशी त्यात पब्लिक स्टटच असतो. ही मडळी सदैव 'बिझी' असतात. त्यातून वेळात वेळ काढून ती येतात. बहुधा त्याचा कार्यक्रमाशी काहीही सबध नसतो. आपल्या दोन-चार मिनिटाच्या भाषणात ते तमाम 'पब्लिकला' खूष करणारे 'डायलॉग' भारतात आणि कटतात.

यापेक्षा निराळा अनुभव पुण्यात या आठवड्यात झालेल्या दोन कार्यक्रमाना आला. गुलजार आणि शशीकपूर या चित्रपट क्षेत्रातील दिलखुलास व्यक्ती या कार्यक्रमाना हजर होत्या. शनिवार दि. २२ मार्चला टिळक स्मारक मदिरात सुरेश नाडकर्णीच्या काव्यविषयक पुस्तकाच्या प्रकाशनासाठी गुलजार आले होते तर २३ मार्चला टिळक स्मारक मदिरातच झालेल्या पथनाट्य स्पर्धेच्या पारितोषिक वितरणासाठी शशीकपूर आले होते.

गुलजार स्वतः कवी, काव्यात त्यांनी निरनिराळे प्रयोग केलेले. कवीमनाचा लेखक आणि दिग्दर्शक ही छाप त्याच्या चित्रपटातूनही जाणवते. कार्यक्रमाला त्यांनी बहार आणली. आपल्या लहानशाच भाषणात त्यानी त्यांच्या रचना सादर केल्या. अत्यंत शात आणि साधेपणाने. त्याच्या वागण्या-बोलण्यात, पेहरावात कुठेही नाटकीपणा नव्हता किंवा फिल्मी झाकही नव्हती

गुलजार या गुलजारी व्यक्तिमत्त्वाने ती सध्याकाळ प्रसन्न केली.

हीच गोष्ट शशीकपूरच्या बाबतीत घडली. गुलजारच ठीक आहे. ते बोलूनचालून कवी आणि दिग्दर्शक. पण शशीकपूर अभिनेते. तेही गाजलेल्या चित्रपटाचे पण त्याच्याही व्यक्तिमत्त्वात ही मिजास आढळली नाही साधाच पायजमा आणि नेहरू शर्ट असा पोशाख होता. बोलताना थिएटर आणि फिल्म या बद्दलची आत्मीयता जाणवत होती. त्याचे भाषण मोठे दिलखुलास होते. जाता जाता अनेक चिमटे त्यानी घेतले आणि शेवटी 'रंगभूमी' करिता आपण निश्चित लढू असे भरघोस आश्वासनही दिले त्याच्या उपस्थितीत कार्यक्रमाला वेगळीच झालर लाभली.

हे दोघेही पाहुणे थोडेसे उशिराच आले पण विठ्ठलराव गाडगीळ दोन्ही कार्यक्रमाच्या यादीत असूनही आले नाहीत. फिल्मी लोकापासून दूर रहावयाचे त्यानी ठरवलेय की काय ? बाकी फोटोग्राफर्स लोकाची चगळ होती. भलीमोठी पलटण मिळेल त्या अँगलमधून फोटो काढत होती त्यातच व्हीडिओ-रेकॉर्डिंग वगैरे वगैरे. पाहुण्यांमध्ये न आढळलेली मिजास त्याच्यामध्ये आढळली रंगमचावर वाटेल तशी वावरणारी ही माणस म्हणजे प्रेक्षकाना डोकेदुखी होती.

—मनोहर सोनवणे

---

## सांस्कृतिक नागपूर

---

### ☐ राज्यशास्त्र विभाग — रौप्य महोत्सव !

नागपूर विद्यापिठाच्या राज्यशास्त्र विभागाने २२ मार्चला आपली पचवीस वर्षे पूर्ण केली आणि त्या निमित्ताने कार्यक्रमाचा एकच धुमधडाका लावला. खरोखर नागपूर विद्यापिठाच्या राज्यशास्त्र विभागाला अखिल भारतीय पातळीला नेऊन पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य कै डॉ एन् आर. देशपांडे यानी केले. राज्यशास्त्र विभागाचे ते एक शिल्पकारच समजले पाहिजेत. त्यामुळे रौप्यमहोत्सवी सोहळ्यात त्यांची वारंवार आठवण येणे साहजिकच होते. प्रत्येक वक्त्याने त्याची वारंवार आठवण केली व त्याना आदराजली दिली. कै डॉ. एन्. आर देशपांडे याच्याच प्रेरणेने राज्यशास्त्र प्राध्यापकांची वार्षिक परिषद भरू लागली व त्यात शोधनिबंध वाचले जाऊ लागले राज्यशास्त्र परिषदेचे अनुकरण नतर इतिहास, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी अनेक विषयानी केले राज्यशास्त्राला ग्रामीण आणि व्यावहारीक पातळीवर पोहोचविण्याचे कार्य डॉ एन् आर. देशपांडे यानी केले. आज ह्या विभागाचे प्रमुख आहेत डॉ प ल. जोशी. रौप्यमहोत्सवी वर्षात अनेक उपक्रम त्यानी हाती घेतलेले आहेत आणि कित्येक यशस्वीही झालेले आहेत रौप्यमहोत्सवाचा उद्घाटन समारभ दिनाक २२ मार्च रोजी विद्यापिठाच्या दीक्षात सभागृहात झाला. उद्घाटनाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम बंगालच्या मत्रिमडळातील उद्योगमत्री प्रोफेसर निर्मल बोस हे उपस्थित होते. विद्वत्ता आणि व्यावहारिकता याचा सुदर सगम त्याच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आढळून आला. सध्या ज्या परिस्थितीत आपण आहोत त्याबद्दल प्रोफेसर बोस यानी मनस्वी दु.ख व्यक्त केले तुम्ही कोणीही असा परंतु भारताचे ऐक्य कायम ठेवा असाच त्याच्या भाषणाचा आशय होता सध्याच्या सकटावर मात करण्याकरिता त्यांनी सप्तसूत्री कार्यक्रम सागितला (१) देशाच्या एकात्मतेवर भर दिला पाहिजे. (२) राष्ट्रीय दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. (३) प्राताना जास्त सत्ता दिली पाहिजे. (४) निधर्मिकता कडकपणे अमलात आणली पाहिजे. (५) अविकसित प्रदेशाचा विकास केंद्र सरकारने प्रामाणिकपणे घडवून आणला पाहिजे. (६) नवीन शिक्षण व्यवस्था अमलात आणून विद्यार्थ्यांतील राष्ट्रप्रेम जागृत केले पाहिजे. (७) देशात अशा सामाजिक, आर्थिक, राजकीय चळवळी चालविल्या पाहिजेत की ज्यात समाजातील सर्व लोक सामील होऊ शकतील. त्याच्या सप्तसूत्री कार्यक्रमाचा आशय वरीलप्रमाणे होता. डॉ. निर्मल बोस यांनी आपल्या प्राजळ

भाषणाने सर्वांनाच प्रभावित केले.

डॉ प. ल. जोशी यानी आपल्या प्रारंभिक भाषणात राज्यशास्त्र परिषद ही राज्यशास्त्र विषयाची असूनसुद्धा ह्या परिषदेला घटना नाही, पदाधिकारी नाहीत, निवडणुका नाहीत तरी ही सस्था गेली २५ वर्षे यशस्वीपणे कार्य करीत आहे असे मोठ्या अभिमानाने सागितले. परतु आता २५ वर्षे उलटून गेल्यानतर आम्ही घटना बनविण्याचा विचार करीत आहोत असे जाहीर केले. त्याला उद्देशून नागपूर विद्यापिठाच्या कुलगुरूंनी आपल्या भाषणात एक गोष्ट सागितली ती अशी : एकदा सगळ्या जंगलातल्या प्राण्यानी माणसासारखी 'घटना' तयार करण्याचे ठरविले. त्याकरिता बोलाविलेल्या सभेत सर्वांनी घटना बनविताना पहिलेच वाक्य टाकले, 'All animals are equal' हा ठराव टाळ्यांच्या गजरात सर्वांनी एकमताने संमत केला. परतु थोड्याच वेळात रागाने थरथर कापत हत्तीने एक दुरूस्ती सुचविली. तो म्हणाला, माझी आणि उंदराची बरोबरी आहे काय ? तेव्हा 'Some animals are more equal' अशी दुरूस्ती त्यात करा. सर्वांनाच ही दुरूस्ती मान्य करावी लागली. त्यानतर 'आमचे राज्य पूर्णत: अहिंसक राहील' असाही ठराव टाळ्यांच्या गजरात समत करण्यात आला. परतु लागलीच एक डरकाळी फोडून वाघ म्हणाला, मी हिंसेशिवाय राहूच शकत नाही दुसऱ्याला ठार मारूनच माझे जीवन चालू शकते. तेव्हा मला हिंसेची परवानगी द्या तेव्हा घटनेत Survival करिता हिंसेची परवानगी देण्यात आली. 'आता तुम्ही राज्यशास्त्राचे लोक घटना बनविणार आहात. तेव्हा घटना कशी असावी यावरच तुम्ही भाडणे कराल. तुमचे खरे कार्य मागे पडेल–,' मिस्किलपणे हसत डॉ. चान्सरकर म्हणाले !

### ☐ लोकन्यायालयांची आवश्यकता

दि. २३ मार्च रविवार रोजी सकाळी प्रथमच लोकन्यायालयाची बैठक नागपूरला बोलाविण्यात आली व त्या कल्पनेला पक्षकार, वकील, इन्शुअरन्स कंपन्या यानी प्रचड प्रतिसाद दिला. ह्या लोकन्यायालयासमोर मोटार अपघातांच्या एकूण १८५ केसेस विचारार्थ ठेवण्यात आल्या आणि त्यापैकी ७० केसेसमध्ये तडजोडी घडून आल्या. हायकोर्ट न्यायाधीश श्री. व्ही व्ही. जोशी आणि एम्. आर वाईकर यानी ह्या केसेसमध्ये मध्यस्थ म्हणून काम केले. ह्या लोकन्यायालयाचा उद्घाटन समारभ वसंतराव स्मृती हॉलमध्ये मुबई हायकोर्टाचे प्रधान न्यायाधीश श्री. एम् एच. कनिया ह्याच्याहस्ते पार पडला त्यावेळी रविवार असून सभागृह नुसते ओसंडून वहात होते. त्याप्रसगी निरनिराळ्या वक्त्यानी जी मते माडली ती लक्षात घेण्यासारखी आहेत. लिगल एड कमिटीचे अध्यक्ष जस्टिस मोहता, 'हिंदुस्थानातील विविध न्यायालयामध्ये इतक्या केसेस पडून आहेत की त्याचा निर्णय न झाल्यास लोक स्वत च कायदा हाती घेण्याचा सभव आहे. यावर एकच उपाय दिसतो तो म्हणजे लोकन्यायालये.' अॅड. माडखोलकर, 'घाईघाईने दिलेल्या निर्णयापेक्षा विलबाने का होईना परतु न्याय मिळणार आहे ही कल्पनाच मला सुखावह वाटते.' 'इंग्लडमध्ये सपूर्ण वर्षभरातून जितक्या writpetions होतात तेवढ्या नागपूरला कोणत्याही महिन्याच्या पहिल्या सोमवारी होतात.'– जस्टिस मोहता. 'लोक न्यायालये ही सध्याच्या न्यायालयाना पूरक आहेत. ती परस्पर विरोधी नाहीत.'– जस्टिस कनिया.

एकूण उद्घाटन प्रसंगी जरी लोकन्यायालयाबाबत परस्पर विरोधी मते प्रगट झाली तरी एकूण नागपूरची लोकन्यायालयाची बैठक यशस्वी झाली असेच म्हटले पाहिजे. कारण अपघात-ग्रस्त पक्षकार मंडळीचे चेहरे समाधानाने उजळून गेलेले दिसत होते. लोकांना न्याय पाहिजे आणि तोही त्वरित हाच याचा अर्थ आहे !

—शरदचंद्र

सांस्कृतिक डोंबिवली

# एका शिक्षकाची स्मृती

आपले भविष्य अगदीच काळेकुट्ट नाही, शिक्षक अगदीच उपेक्षित नाही असा दिलासा देणारा एक कार्यक्रम नुकताच झाला. जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट ही मुबईची जुनी आणि मोठी शिक्षणसस्था आहे. ह्या संस्थेच्या उरण, कल्याण आणि डोंबिवली येथील शाळातून शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून काम करून निवृत्त झालेले श्री. चिंतामण वैजनाथ भिडे (जन्म ४–३–१९०० मृत्यू १८–३–१९७८ ) हे इतिहासाचे शिक्षक संशोधक, व्यायामप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्याचा शिष्य परिवार मोठा आहे त्याच्या निधनानतर त्याच्या कर्तबगार शिष्याना आणि मुलाला त्याचे कायम स्वरूपाचे स्मारक करावे असे वाटले. त्यासाठी एक समिती तयार झाली. त्या समितीने निधी जमवण्याचे ठरविले. त्या स्मारक निधीची सुरुवात श्री. माधव चिंतामण भिडे व त्याच्या पत्नीने दिलेल्या दहा हजारांच्या देणगीने झाली. समितीने सुरुवातीला हुशार पण गरीब असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे माफक उद्दिष्ट समोर ठेवले; पण सकल्प सोडला किमान एक लाख रुपये जमविण्याचा. कारण गुरुवर्य भिड्यांचे व्यायाम आणि इतिहास हेही आवडते विषय होते. त्या विषयात रस घेणाऱ्या, मोलाची कामगिरी करणाऱ्या सस्थाना आणि व्यक्तींना आर्थिक मदत द्यावी असाही हेतू होता प्रत्यक्षात ह्या शिष्यवृत्त्या देण्यास सुरुवात झाली १९८४ साली. इयत्ता बारावीतील तीन विद्यार्थ्यांनी प्रत्येकी सातशे पन्नास आणे इयत्ता दहावीतील तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाचशे दिले जातात. समितीची योजना आणि अपेक्षा अशी आहे की, उरण, कल्याण आणि डोंबिवली येथील ज. ए. सस्थेच्या शाळातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या पण गुणवत्ता असणाऱ्या आणि टिकवून धरणाऱ्या किमान सहा विद्यार्थ्यांना ते जितके

शिकू इच्छितात तेवढे शिक्षण घेता यावे. त्याची आर्थिक जबाबदारी ही समिती घेईल. इ. स. १९८६ मध्ये देणग्या, जाहिराती– स्मरणिका इ. रूपाने जवळपास एक लाख रुपये जमले आहेत

त्यामुळे ही समिती आता पुढील संकल्प प्रत्यक्षात आणण्यास आर्थिकदृष्ट्या सबल झाली आहे. कल्याण येथील 'नमस्कार मंडळ' नावाची व्यायामशाळा स्थापण्यात भिडेसरांचा महत्त्वाचा वाटा होता. अशा *व्यायामशाळांना त्यांच्या नव्या* योजना प्रत्यक्षात आणण्यास, त्या संस्थांनी योजना मांडल्यानंतर, भरीव आर्थिक मदत देण्याची कल्पना ह्या स्मारक निधीसमोर आहे. कै. भिडे हे इतिहासाचे शिक्षक होते. त्यांनी आपल्या B. T. पदवीसाठी 'कल्याण शहराची ऐतिहासिक पाहणी' हा विषय घेतला होता. तो प्रबंध 'तरंग' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाला. त्याचप्रमाणे इ. स. १९६६ साली 'डोंबिवली शहराचा इतिहास' प्रसिद्ध करणाऱ्या समितीला प्रेरणा देण्याचे आणि ते लेखन प्रत्यक्षात आणण्याचे कार्य इतर सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी केले त्यांचे इतिहास संशोधनाचे आणि इतिहासलेखनाचे वेड लक्षात घेऊन निधी समितीने असे कार्य करणाऱ्या व्यक्तीला वा संस्थेला आर्थिक मदत देण्याचे ठरविले आहे त्याचप्रमाणे ज्या *संस्था व्याख्यानमालेचे आयोजन* करतील त्यांनाही मदत करावी असे ठरत आहे कल्याण, डोंबिवली येथील इतिहासाचे प्रेमी आणि उपक्रमशील संस्था पुढे येऊन ह्या स्मारक निधीच्या सहाय्याने आपले कार्य अधिक चांगल्या तऱ्हेने करतील आणि एका हाडाच्या शिक्षकाची स्मृती कायम ठेवतील असे वाटते.

अठरा मार्च रोजी गुरुवर्य नानांचे निधन झाले. त्यामुळे अठरा मार्च रोजी वा त्यानंतर येणाऱ्या रविवारी कल्याण अथवा डोंबिवली येथे गतवर्षीपासून डोंबिवलीतच नानांच्या चाहत्यांचा, विद्यार्थ्यांचा तसेच आप्तेष्ट परिवाराचा एक सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. त्या निमित्ताने एक स्मरणिका निघते आणि दोन नामांकित वक्त्यांची भाषणे होतात. त्याच वेळी ह्या शिष्यवृत्त्या देण्यात येतात. पुढील वर्षी त्यात व्यक्तींना, संस्थांना दिलेल्या, देण्यात येणाऱ्या अनुदानाची भर पडेल. इ. स. १९८४ साली झालेल्या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी श्री. माधव गडकरी, संपादक, मुंबई सकाळ आणि माननीय वक्ते श्री. कृष्णराव धुळप, माजी खासदार व श्री. श ना. नवरे, प्रख्यात साहित्यिक हे होते. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष-स्थान भिडे सरांचे विद्यार्थी, महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री. शांताराम घोलप ह्यांनी भूषविले होते इ. स. १९८५ साली आमदार प्रा. राम कापसे हे प्रमुख अतिथी आणि डॉ. मो. दि पराडकर, प्राचार्य, के. वि. पेंढरकर महाविद्यालय, डोंबिवली हे अध्यक्ष होते. ह्यावर्षी झालेल्या स्मृतिदिन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी होते आणि अध्यक्ष म्हणून रुपारेल महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. भाऊसाहेब शिंदे हे होते.

न्यायमूर्ती धर्माधिकारी यांची प्रसिद्धी रामशास्त्री बाण्याचे न्यायाधीश म्हणून आहे तशीच एक प्रभावी वक्ता म्हणूनही आहे. त्यांची ओळख करून देताना 'रामशास्त्री बाण्याचे' असा उल्लेख श्री. माधवराव भिडयांनी केला. ते सूत्र पकडून ते म्हणाले, 'आजचे सर्वच उलटे पालटे झाले आहे. 'पोलिसाचा प्रामाणिकपणा' हा बातमीचा विषय होतो. पोलीस प्रामाणिकच असला पाहिजे. न्यायाधीश रामशास्त्री बाण्याचाच असला पाहिजे. तशी वस्तुस्थिती नाही म्हणून ती बातमी होते. आपल्या वडिलांनी 'हराम' ची कमाई नको 'राम' ची कमाई कर असे सांगितले. संस्कार हे करू नका, करावे लागत नाहीत. ते झाले पाहिजेत. आपण लहान मुलांना खोटे बोलायला शिकवतो तो खरे बोलतो. त्यामुळे आपण अडचणीत येतो. आपल्या खोटे बोलण्याचा अनुभव ते लहान मूल घेते आणि मग खोटे बोलायला शिकते.' आपली मुले आपले ऐकत नाहीत अशी तक्रार पालक करतात. त्यावर श्री. धर्माधिकारी म्हणाले, 'मुलांनी आपल्या पालकाची कार्बन कॉपी बनू नये.' त्या संदर्भात त्यांनी आपल्या वडिलांचे, आचार्य दादांचे म्हणणे सांगितले. दादा म्हणत 'जर आपल्या आईबापांचे ऐकणारी मुले ह्या देशात जन्माला आली असती तर ह्या देशाला स्वराज्य मिळाले नसते' 'कोणाचे केव्हा ऐकायचे आणि काय ऐकायचे ते प्रत्येकाने ठरवावे. अन्याय आणि भ्रष्टाचार ह्याविरुद्ध बंड केले पाहिजे. ते सहन करू नका' असे त्यांनी आवर्जून सांगितले.

## गरीब होण्याची भीती

'एका शिक्षकाची स्मृती आळवण्यासाठी इथे आलो' असे सांगणारे श्री. धर्माधिकारी शिक्षण आणि शिक्षक ह्या विषयावर मनापासून बोलले. 'आयुष्याची साक्षरता वेगळी असते. माणूसपण जोपासणे हे खरे शिक्षण आहे. आजच्या जगात माहिती वाढत चालली पण शिक्षण कमी होऊ लागले' अशी खंतही त्यांनी प्रकट केली. 'ह्या महाराष्ट्रात नातवाला आंबे मिळावेत म्हणून झाड लावणारा आजोबा नाही' ह्याची हळहळ व्यक्त करून ते पुढे म्हणाले, 'आजचा पालक झोपलेला आहे. तो मुलाच्या भल्याचे श्रेय स्वत कडे घेतो. वाईटाचे श्रेय मात्र शिक्षकाचे आजच्या मुलांवर सुसंस्कार करू नका. कुसंस्कारातून कसे वाचतील हे पहा. ताठमानेने चालणारा शिक्षक कोणालाच चालत नाही. सरकारला तर अजिबात चालत नाही. शिक्षकाची निवड करताना आपला आप्त, जातवाला इ कडे बघितले जाते. मुले बिघडू नयेत ह्याची काळजी तेव्हा घेतली जात नाही. आज शिक्षणाचा खराबा होतो आहे ह्याचा विचार केला जात नाही. माझे प्राथमिक *शाळेतील शिक्षक भेटले की माझी मान* लवते' असे त्यांनी अभिमानाने सांगितले. स्वत बद्दल सांगून त्यांनी एक सनातन सत्यच सांगितले. ते म्हणाले 'ज्याचे लहानपणी लाड होत नाहीत ते चांगले वाढतात. तत्त्वासाठी गरिबी ही फार मोठी संपत्ती आहे. आपण सारेजण गरीब होण्याच्या भीतीने फार पापे करतो, मरणाच्या नव्हे. तत्त्वासाठी जगणे कठीण असते. संकल्प तत्त्वासाठी जगण्याचा असावा प्रत्येकाने हे ध्यानात ठेवावे की सत्याचा आणि असत्याचा कधीही समझोता होत नाही. अंधार बघण्यासाठी डोळ्यात उजेड असावा लागतो.'

आपले विचारपरिपूर्ण भाषण संपविताना ते म्हणाले 'प्रत्येक चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वतःपासून करा. तीच व्यक्ती समाज बदलू शकते. भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत फक्त एक टक्का लोकांनी भाग घेतला. ऑनलूकर्स बनू नका. पार्टीसिपंट्स्, सहभागी होणारे हवेत पार्टिसिपेशन, सहभाग महत्त्वाचा आहे. मस्तीत जगा, असेही सांगायला ते विसरले नाहीत.

समारंभाचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब शिंदे ह्यांनी वाचन कमी होत चालले आहे, माहिती खूप आहे पण ज्ञान नाही अशी आजची तरुण पिढी आहे असे आपल्या व्याख्यानात सांगितले

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री रमाकांत यत्ते, रा. वा. भिडे, उमेश खरे इ. चे परिश्रम कारणीभूत झाले.

— चंद्रशेखर राजे

# आपण असे जगतो

वि. ग. कानिटकर

### □ विनोदबुद्धी

नवराबायको यांच्यातील बरीचशी किरकोळ कुरबुर ही दोघांपैकी कुणातरी एकाला विनोदबुद्धी नसल्यामुळे होत असते. 'बायकोला संगीतातले काही कळत नाही' किंवा 'तिला वाचनाची फारशी आवड नाही' किंवा 'आई करीत असे तशा पोळ्या बायकोला जमत नाहीत.' असे कितीही वाग्बाण नवऱ्याने सोडले, तरी बायको रागाने फणफणत नाही. पण नवरा जर म्हणाला– 'तिला ना– विनोदबुद्धी कशी ती नाही !' तर मात्र मग तिच्या संतापाला पारावार रहात नाही ! बायकोने नवऱ्याला 'आळशी', 'कामचुकार', 'खरेदी करण्याची अजिबात अक्कल नसलेला' असे काहीही म्हटले तरी तो ते मनावर घेत नाही. पण बायको जर म्हणाली– 'यांना ना अजिबात विनोदबुद्धी नाही.' तर नवरा खवळलाच पाहिजे. डेस्कार्टस म्हणत असे–No quantity is so well distributed as common-sense, for no man has so little, but that he thinks he has enough म्हणजे सामान्य अक्कल ही अगदी उत्तम रीतीने सर्वांना सारखी वाढलेली दिसते, कारण आपल्याजवळ ती पुरेशी आहे असे प्रत्येकाला वाटते आणि याबाबतीत कुणाचीच तक्रार असत नाही. विनोदबुद्धीच्या बाबतीत असेच म्हणता येईल.

विनोदबुद्धीची वाढ ही आपल्याकडे गेल्या पन्नास–साठ वर्षातली गोष्ट दिसते. विसंगतीतून प्रायशः विनोद निर्माण होतो. जेव्हा आयुष्य साधेसुधे, विशेष गुंतागुंतीचे नव्हते, तेव्हा अर्थात विसंगती कमी उद्भवत. परंतु निरनिराळ्या शोधांमुळे झालेल्या चौफेर प्रगतीमुळे जगणे आता अतिशय गुंतागुंतीचे परंतु अधिक आकर्षकही झाले आहे व यामुळे आपल्या वागण्यातली विसंगतीही त्या प्रमाणात वाढली आहे. साहजिकच विनोदबुद्धी असल्याखेरीज जगणे सुखद होणे कठीण झाले आहे. आज एखादे, सामान्य माणसाची अगतिकता दाखवणारे व्यंगचित्र हे प्रत्येक दैनिक वृत्तपत्राचे अविभाज्य अंग झालेले आहे. एक आर. के लक्ष्मण वगळता बाकीची व्यंगचित्रे ही विनोदबुद्धीची निदर्शक न रहाता केवळ टीका वा जळफळाट व्यक्त करणारी असतात ही गोष्ट जरी मान्य केली, तरी या व्यंगचित्राचे अस्तित्व हे विनोदबुद्धीची नितांत गरज सिद्ध करणारे असते.

काही जणांना आपल्यापाशी प्रखर विनोदबुद्धी आहे असा भ्रम असतो आणि ते सतत गंमतीदार बोलण्याचा निष्फळ प्रयत्न करत असतात. पुष्कळदा ते प्रयत्न इतके केविलवाणे असतात की अशा माणसांना शक्य ते टाळणे बरे असे आपल्याला वाटते. विनोदबुद्धी असणे म्हणजे येता जाता शाब्दिक कोट्या करणे किंवा दुसऱ्याच्या दुखऱ्या जागा सतत अनावृत्त करणे नव्हे, हे अनेकांना कळत नाही. विनोदबुद्धी ही बुद्धीपेक्षा माणसाच्या जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टीशी जास्त संबंधित आहे.

अब्राहम लिंकनला भेटायला माणसांची अतोनात गर्दी झाली की तो बाहेरच्या हिरवळीवर दारूची पिंपे आणीत असे. लोकांचे लक्ष तिकडे गेले की पहाता पहाता माणसे पटापट बाहेर जात– असे म्हणतात. सामान्य माणसाकडे पाहाण्याची लिंकनची जी दृष्टी होती त्यालाच दुसरे नाव–विनोदबुद्धी होते. आयर्विनला भेटायला गेल्यावर गांधीजींनी मुसुंब्याचा रस घेण्यापूर्वी खिशातून लहानशी पुडी काढून त्यात थोडे पुडीतले मीठ टाकले. आयर्विन साहेबाने 'हे काय ?' या अर्थाचा चेहरा करताच गांधीजी म्हणाले–'कायदेभंग करून तयार केलेले हे मीठ आहे !' आयर्विनना देखील यानंतर हसू आवरणे कठीण गेले.

साहजिकच आपल्यापाशी अजिबात गंमत नाही, आकर्षक निरागसपणा नाही आणि मुख्य म्हणजे इतरांपाशी असे काही आहे हे आपल्याला समजत देखील नाही, असे नवऱ्याने बायकोला किंवा बायकोने नवऱ्याला सांगितले तर राग आल्याशिवाय राहील का ?

### □ प्रेम आणि पैसा

एखाद्याने लग्नात भरपूर हुंडा मागितला की त्या माणसाने पैशासाठी लग्न केले, असे आपण म्हणतो. अशा रीतीने मुलीच्या वडिलांकडून पैसा उकळणे, हा तर आता दखलपात्र गुन्हा ठरलेला आहे. इथे कायदा करणाऱ्यांनी एक गोष्ट गृहीत धरली आहे, की हुंडा घेण्याच्या प्रथेनुसारच केवळ एखादा नवरदेव, मुलीच्या बापाकडून पैसा मिळवू शकतो. ज्या पाश्चात्य समाजात हुंड्याची प्रथा नव्हती, त्या समाजात अर्धशतकापूर्वी विवाह हा प्रेमाला प्राधान्य देऊन करावा की, त्यामुळे प्राप्त होणाऱ्या धनाला प्राधान्य देऊन करावा, हा मोठा चर्चेचा विषय झालेला होता. त्या काळी ज्या इंग्लिश कादंबऱ्या लोकप्रियता पावल्या, त्यातदेखील सुरुवातीला निर्धन दाखवलेली कादंबरीची नायिका, ही कादंबरी संपण्यापूर्वी अचानक कोठल्या तरी दूरच्या श्रीमंत आत्याचा वा मावशीचा वारसा लाभून श्रीमंत झालेली दाखवलेली असे. अर्थात प्रत्यक्षात अशा दर्दभरी चमत्काराच्या आशेने लग्न करणाऱ्यांना निराशाच पदरी येत असली पाहिजे. म्हणून मग पाश्चात्य समाजात उपवर मुलीचे आईबाप काय काळजी घेत ? तर मुलींनी प्रेमविवाहच करायचे आहेत हे लक्षात घेऊन, त्यांच्या सहवासात येणारे तरुण हे गर्भश्रीमंत असतील, याची काळजी घ्यायला त्यांनी सुरुवात केली. स्वयंवराला फक्त राजपुत्रच बोलावून आपल्याकडे पूर्वीचे राजे हीच काळजी घेत.

आता मानसशास्त्राची खूपच प्रगती झाली असल्याने, सर्वांनी आता ही गोष्ट मान्य केली आहे की, खऱ्याखुऱ्या प्रेमाच्या उगमातही, काही वेळा पैशाचा विचार हे अंशतः कारण असू शकते. इतिहासप्रसिद्ध व्यक्तींची उदाहरणे देता येतात. बेंजामिन डिझरेली, जो पुढे लॉर्ड बेकन्सफील्ड झाला, तरुणपणी अतिशय विपन्नावस्थेत असलेले, परंतु अतिशय महत्त्वाकांक्षी असे हे लग्नाचे स्थळ होते. त्याने आपल्यापेक्षा वयाने बऱ्याच मोठ्या अशा एका श्रीमंत विधवेशी लग्न केले व जगाने त्याला अगदी मूर्ख ठरवला. प्रत्यक्षात या त्याच्या पत्नीमुळे तो जीवनात यशस्वी वाटचाल करू शकला. लोक कुत्सितपणे असे म्हणत होते, की त्याचे तिच्यापेक्षा, तिच्या पैशावर अधिक प्रेम आहे. परंतु जगाचा हा भ्रम ठरला. त्याच्या संबंध

वैवाहिक जीवनात डिझरेलीने आपल्या पत्नीवर मनापासून अतिशय प्रेम केले. आपल्याला असे ठामपणे म्हणता येणार नाही की, डिझरेलीची पत्नीशी गाठ पडली, तेव्हा ती जर पैशाने गरीब असती तर तो तिच्या प्रेमात पडला असता. परतु विवाह झाल्यावर तिच्या पैशाच्या सुबत्तेमुळे त्याला जी मदत झाली, त्याच्या कृतज्ञतेपोटी त्याने तिच्यावर आयुष्यभर जिवापाड प्रेम केले–जे शंभर टक्के खरेखुरे होते. आपण दुसऱ्यावर प्रेम करतो, त्या प्रेमाचे मोठे कारण बहुधा हेच असते, की त्या व्यक्तीची आपल्याला, आपल्या आयुष्यातील काही गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठी मदत झालेली असते. एखादा तरुण जर महत्त्वाकांक्षी असेल, तर त्याला जीवन यशस्वी करण्यात ज्या स्त्रीने कोठल्याही स्वरूपात मोठी मदत केली, तिच्याविषयी प्रेम निर्माण न झाले तरच नवल ! जे प्रेम काही स्वार्थातून निर्माण होते ते खरेखुरे नसते, असे म्हणणे म्हणजे फारच उथळ मानसशास्त्र होईल. आपल्याकडे बहुतेक कम्युनिस्ट पुढाऱ्यानी श्रीमत बापाच्या मुलीवर प्रेम करून लग्ने केली हे सर्वश्रुत आहे.

डिझरेलीचे उदाहरण कशाला – महमद पैगबराचे घेऊ प्रत्येकाला हे माहीत आहे, ते एका श्रीमत विधवेच्या काफिल्यावर उटाची गाडी हाकणारे सेवक होते. त्यानी तिच्याशी लग्न केले. त्यानी पुढे आणखीही लग्ने केली परतु या पहिल्या प्रौढ बायकोवर त्याचे फारच प्रेम होते.

आता ही दोन्ही उदाहरणे, पुरुष गरीब व स्त्री श्रीमत होती अशाची झाली प्रत्यक्षात वधुपेक्षा वर हे अधिक श्रीमत असतात. परतु विवाह करतानाचे मानसशास्त्र तेच असते. जर वर श्रीमत असेल व गरीब स्थितीतील एखाद्या मुलीला काही सामाजिक क्षेत्रात महत्त्वाकांक्षा असतील, तर पत्नी होताच ती स्त्री नवऱ्यावर प्रथम प्रथम नसले–तरी पुढे प्रेम करू लागेलच. म्हणजे तो दिसायला अगदीच टाकाऊ नसला तर ! पण आकर्षक गरीब स्थितीतील वरापेक्षा, अनाकर्षक श्रीमत वराला प्रेम लाभण्याचा सभव शतपटीने अधिक हे मान्य द्यायला हरकत नाही.

आता पैशाचा असा प्रभाव असला की त्याने एखाद्याला वरवरचे नव्हे अगदी खरेखुरे प्रेम जीवनात मिळवून द्यावे, ही गोष्ट अन्याय्य वाटणारी आहे, अनाकलनीय आहे परतु सत्य आहे □

---

अहो, येता–जाता

---

# बद्रिकेदारच्या वाटेवर

फिरोझ रानडे

---

आम्ही जोशी–मठला असेच काहीतरी संध्याकाळचे पोहोचलो. आम्ही म्हणजे मी, माझी साठी उलटलेली आई आणि तिशीतली बायको आम्ही बद्रिकेदार आणि बद्रिनारायणाच्या दर्शनाला चाललो होतो. आमच्या एका सज्जन मित्राने आमच्या तीन मुलांना साभाळण्याचे कबूल केले होते. म्हणूनच अशी तिघाजणाना यात्रा शक्य झाली होती.

आम्ही हरद्वारहून सकाळी साडेनऊ–दहा वाजता निघालो होतो. यात्रा–पर्व असो वा नसो बद्रि–केदार व नारायणला जाणाऱ्याना कॉलऱ्याची लस टोचावी लागते आम्ही तशी लस टोचून घेतली नव्हती. तेव्हा तेथल्या अधिकाऱ्याना दोन–दोन रुपये देऊन मी खोटी प्रमाणपत्रे मिळवली होती.

आपण देवाच्या दर्शनाला जात आहोत तेव्हा अशी खोटी खोटी प्रमाणपत्र घेऊ नयेत असे माझ्या मनातही आले नाही आणि आले असते तरी देवाचा आणि ह्याचा काही संबध नाही म्हणून मी त्याला झटकून टाकले असते.

लस टोचून घेऊन उगाचच आजारी वगैरे पडण्यापेक्षा खोटी प्रमाणपत्र घेणं सोयीचं हा माझा हिशेब होता. त्यात देवाचा काही संबध नाही अशी माझी भावना होती.

आधीच हिमालयातल्या डोगराळ विभागातला प्रवास. त्यात दर दहा मिनिटानी येणारी जीवघेणी वळणे व तितकेच त्या तरुण नेपाळी लोकाचे बस चालवणे. त्यामुळे जीव मुठीत ठेऊन ठेऊन आम्ही अगदी कटाळून तर गेलोच पण प्रवासात अग अगदी अबून गेल.

त्यामुळे जोशी–मठ आल्यावर आम्हाला हायस वाटल. धर्मशाळेतल्या खोलीत आल्या आल्या आई चारपाईवर लवडली. मी व बायकोनं चहा घेतला व पाय मोकळे करायला व फालतु खरेदी करायला म्हणून बाहेर पडलो.

त्या भागात लवकर सध्याकाळ होते. तरी पुष्कळ दिसत होते. गगेच दर्शन होत का बघाव म्हणून त्या दिशेने निघालो. खरं म्हणजे त्या भागात गगा दिसण्यापेक्षा जास्त ऐकू येते. बापरे काय तो प्रवाह आणि काय ते राक्षसी आवाजातले घबधबणे ! पुलावर गेलो, गगेचे दर्शन घेतले–खरेदी केली व परत आलो.

परत आलो तो आई ताजीतवानी होऊन काही मराठी बायकाशी गप्पा–गोष्टी करत होती मध्यम वर्गातल्या–सुशिक्षित स्त्रिया होत्या आईन आमची ओळख करून दिली.

'हा मुलगा.. मध्यवर्ती सरकारात आहे आणि ही सून मासिकातून गोष्टी वगैरे लिहिते.'

त्या काहीतरी पाच–सहा जणी होत्या. वय असच पन्नाशीच, ग्वाल्हेर–इदूर भागातल्या. त्याची पुरुष माणस जेवणाची चौकशी करायला गेली होती. जथ्याने ते यात्रेला निघाले होते त्याच बद्रिकेदार दर्शन झालं होत. उद्या ते लोक बद्रिनारायणाला जाणार होते

ह्या दर्शनातही एक शिस्त आहे शैव लोक प्रथम बद्रिकेदाराचं म्हणजे महादेवाच दर्शन घेतात व वैष्णव प्रथम नारायणाचे दर्शन घेतात. अर्थात आम्हाला हा नियम लागू नव्हता आम्ही सोय म्हणून प्रथम केदारला जाणार होतो, नतर नारायणाला.

काही वेळानं त्या बायका जेवायला म्हणून उठल्या व आम्हीसुद्धा त्यातल्या त्यात बरं हॉटेल पाहून त्यात जेवून घेतले व परत खोलीवर आलो. कॉटवर मी पडलो व बायको आणि आई गाद्या टाकून जमिनीवर झोपल्या.

सगळेच दमले असल्याने सगळ्यानाच लगेच झोपा लागल्या. मध्यरात्री मला असं जाणवल की आई थोडी अस्वस्थ आहे. माझी झोप तशी तल्लख आहे त्यामुळे तिचे ह्या कुशीवरून त्या कुशीवर होण माझ्या लक्षात आले मी पडल्या पडल्याच 'ताई, काय होतंय ?' म्हणून विचारल.

'काही नाही. तू झोप !' आईन उत्तर

दिलं. मीही फार काही नसेल, पहाडावरच्या जागेमुळे झोप येत नसेल असा विचार केला व परत झोपलो.

थोड्या वेळाने परत कानावर आईची खुसखुस ऐकू आली. म्हटल की हे प्रकरण काहीतरी वेगळं आहे. आईला चांगलाच त्रास होतोय पण असं रात्रीचं मुलाला उठवणं बरं वाटत नसावं, संकोच वाटत असावा म्हणून ती सांगत नसावी. तेव्हा मी तडातडी उठलो. दिवा लावला.

तोपर्यंत आई उठून बसली होती. ते बघून मनात आलं की म्हणजे फार काही त्रास होत नाही आहे. तेवढ्यात बायकोपण उठलीच.

मी आईजवळ बसलो व म्हणालो, 'हे बघ काय त्रास होतोय तो सांग. डॉक्टरला बोलावू का?'

'मला काहीही होत नाही आहे...पण मला असं वाटतं की तुम्ही दोघांनी परत दिल्लीला जावं व पुढली यात्रा मी एकटीने करते.'

'काहीतरी काय?' मी थोडे चिडूनच विचारले. 'तुला एकटीला सोडून मी परत जाऊ?' ही कल्पनाच मला इतकी अवघड वाटली की माझ्या आवाजात चीड सहाजिकपणे आली.

'नाहीतर आपण तिघंही परत दिल्लीला जाऊ या. राहू दे तो बद्रिकेदार आणि बद्रिनारायण' परत आई.

आता हेही शक्य नव्हते. निम्म्या वाटेपर्यंत आल्यावर परत जाणं हे माझ्या वृत्तीत नव्हतं व परत का जायचं हे कळलं नव्हतं.

'पण असं झालं तरी काय? कोणाचं काही चुकलं?' बायकोनं मोठ्या काकुळतीनं विचारले. ती सून. तिला वाटलं की आपलं काहीतरी चुकलं म्हणून सासूबाई नाराज झाल्या आहेत.

'नाही, तसं काहीही नाही. पण मला वाटतं की आपण परत जावं.'

'मग झालं तरी काय?' परत मी.

त्याचं असं झालं होतं की त्या ग्वाल्हेर की इंदूरकडल्या बायका आईला म्हणाल्या होत्या:

'अहो, तुमचे एक ठीक आहे. तुमचं सगळं झालंय-मुलांची लग्नं झालीयेत. सुना आल्या आहेत. नातवंडं आहेत. पतवंडं आहेत. पण मुलाचा सुनेचा विचार केलात का? त्याची लहान लहान तीन मुलं. समजा प्रवासात काही बरं वाईट झालं तर ती मुलं उघड्यावर नाही पडणार?'

आईनं कालचा प्रवास अनुभवला होता. वळणावळणावर हजारो फूट खाली दरीत बस कोसळून पडण्याची शक्यता तिच्या मनाला शिवून गेली होती. त्यामुळे त्या बायकाचं म्हणणं पटायला आईला वेळ लागला नाही.

'तेव्हा एकतर मी एकटी पुढे जाते किंवा आपण सगळे परत जाऊ' आईने समारोप केला. तिच्या दृष्टीने तिचे म्हणणे बरोबर होते.

पण मी कसला खट. आता इतकं जोशीमठापर्यंत आल्यावर मी परत जाणं शक्यच नव्हतं. पण आईचं मन वळवणं तर भाग होतं व तेही तावडतोब. तेव्हा मी धडकपणे विचारलं,

'हे बघ, तुझा देवावर विश्वास आहे की नाही? देव आपले वाईट का म्हणून करेल?'

ह्या प्रश्नाने आई भांबवली. तिचा देवावर गाढा विश्वास होता. पण अपघात होण्याची शक्यता फार होती. अपघाताचा आणि देवावरच्या विश्वासाचा काही संबंध नव्हता.

'ते ठीक आहे रे पण आपण परत जाऊ!' आईचे पालुपद.

'मग कबूल कर की तुझा देवावर—नाशिकच्या काळ्या रामावर विश्वास नाही म्हणून तर आपण परत जाऊ.'

नाशिकचा काळाराम हा आईचा विक—पॉईंट होता. आम्हा सगळ्या भावंडांचे भले झाले आहे ते त्या काळ्या रामामुळे अशी तिची श्रद्धा होती. ती काळ्या रामावर विश्वास नाही असं म्हणणं शक्यच नव्हतं. पण...पण...डोळ्यासमोर आपली नातवंडं अनाथ होण्याची शक्यता पण होती.

मग देवावर विश्वास असतो म्हणजे काय असते?

आमचा प्रवास सुखा—समाधानाचा झाला हे वेगळे सांगायला नकोच. □

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# कलावंत, समाजसुधारक आणि लोकनेता भाई माधवराव बागल

रघुपती भट्ट

निसर्गाच्या सानिध्यात रमणारा एक चित्रकार; नदीचं संथ वाहणं, झाडांचं वाऱ्याशी कुजबुजणं, डोंगराची आकाशाशी चाललेली जवळीक यामध्ये तल्लीन होऊन ती भाषा कागदावर साकारू पाहाणारा; निसर्गाचे विविध आविष्कार त्याला मोहीत करायचे. तास न् तास तो त्यामध्ये गुंगून जायचा आणि ते काव्य कुचल्यानी जीवित करू पाहायचा. त्यामध्ये त्याला अत्युत्कट आनंद व्हायचा. भल्या भल्या चित्रकारानी त्याच्या चित्राची वाहवा केली होती. राजे महाराजे काय त्यावेळचे व्हाइसराय लॉर्ड आयर्विन यानीसुद्धा त्याच्या चित्रकलेची प्रशंसा केली होती. बाबूराव पेंटर, आबालाल रेहमान, धुरंधर इ. नामांकित त्याच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पाहात होते.

पण आसपासच्या माणसांच्या दुनियेनं त्या चित्रकाराला चित्रकलेपासून दूर खेचून नेल. राबणारी माणसे, अर्धपोटी पोरं, हातात आसूड घेतलेले जमीनदार शिपाई, तोंडात वेदभाषा असूनही ब्राह्मण्याचा गंधही नसलेले ब्राह्मण, सामान्यातूनच पुढे आलेले पण राज्यकर्त्यांची हाजी हाजी करणारे अमलदार आणि ब्रिटिशांच्या बेड्यात बद्ध असलेली भारतमाता, हे समोर दिसणार चित्र त्या चित्रकाराला फारच व्यस्त करून गेलं. समोरचा रंगाचा कुचला त्याने बाजूला ठेवला आणि सार्वजनिक जीवनात त्यानं उडी टाकली. सगळे मोह बाजूला सारले आणि दीनदलितांसाठी आपलं तन मन धन वेचायला सुरवात केली. सामान्याना संघटित करणे, त्याच्या मागण्यांसाठी लढा करणे, प्रसंगी तुरुंगवास, काबाडकष्ट या साऱ्यामध्ये तो चित्रकार गुतला. आपलं सगळं आयुष्य त्यानं त्यात खर्ची घातल. त्याच्या डोळ्यादेखत सामान्यांना अधिकार मिळाले. जनतेच्या हाती सत्ता आली, हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालं. ज्या ज्या स्वप्नासाठी त्यान वैयक्तिक आशा, आकांक्षा बाजूला ठेवल्या, घरादारावर तुळशीपत्र ठेवलं त्या सगळ्या गोष्टी त्यान घडून येताना पाहिल्या.

पण त्याचबरोबर आदर्शाचे अध:पतनही त्याला पहायला मिळाले. जे मित्र कालपर्यंत नि:स्वार्थी वृत्तीने कार्यरत होते तेच मित्र नव्या सत्ताधाऱ्याची हांजी हांजी करत पुन्हा गुलामगिरी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसले. कवी मनाचा तो हळवा चित्रकार व्याकूळ झाला. आपल्या परीने त्याने विरोधाचा प्रयत्न केला पण परिस्थिती बदलली होती. लोक बदलले होते. एका जमान्यात सगळा भाग पेटवून देण्याचे सामर्थ्य असणारे त्याचे शब्द आता क्षीण झाले होते.

पण हरणे त्याला मंजूर नव्हते. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत तो आपल्याला जे वाटते ते तळमळीने सांगत राहिला. आपल्याला कोण काय म्हणतंय याची त्यानं कधीच पर्वा केली नव्हती.

शेवटी एक कलंदर कलावंत होता तो. राजसत्तेला नमवण्याची ताकद होती त्याची आणि कोणी ऐको न ऐको, लोकाना चांगल्या मार्गाकडे प्रवृत्त करीत राहावे ही जिद्द होती त्याची.

या कलावंताने ता. ५ मार्च रोजी अखेरचा श्वास घेतला आणि जवळजवळ अर्ध शतक तुफानी वादळाशी झुंज घेणारी एक तेजस्वी ज्योत निसर्गात विलीन झाली. परमेश्वरावर त्याचा विश्वास नव्हता. निसर्ग आणि जनता–जनार्दन हे त्या मनस्वी कलावंताने परमेश्वरस्वरूप मानले होते.

कलावंत, लेखक, तत्त्वचिंतक, समाजसुधारक, पत्रकार आणि लोकनेता अशा विविध भूमिका तन्मयतेने बजावून गेलेल्या या मोठ्या माणसाचे नाव 'भाई माधवराव बागल'

¤

माधवरावाचा जन्म १८९६ सालचा. त्याचे वडील खंडेराव बागल हे बी. ए. एल. एल. बी. होते. कोल्हापूर संस्थानातील ते पहिले वकील. मराठा समाजातले पहिले पदवीधर, त्यामुळे त्याचे बरेच नाव होते. ते मामलेदार होते. शाहू महाराजाचा त्याच्यावर बराच लोभ होता. त्यामुळे माधवरावाचे बालपण फार सुखात गेले. सगळीकडे मामलेदारसाहेबाचा मुलगा म्हणून त्याची बडदास्त होत असे.

माधवरावाची आई ही नेहमी अथरुणाला खिळून असे. पण ती अत्यंत प्रेमळ शब्दानी माधवरावावर संस्कार करण्याचा प्रयत्न करीत असे.

नऊ दहा वर्षाचा असताना माधवरावाची आणि शाहू महाराजाची भेट झाली. सगळे महाराजाना नमस्कार करीत होते पण छोट्या माधवरावानी काही नमस्कार केला नाही. महाराजानी त्याना उचलून विचारलं, 'काय रे, तुला घोड पाहिजे काय?' माधवरावानी होकारार्थी उत्तर दिल.

आणि खरोखरीच शाहू महाराजानी एक अरबी घोडा बागलाकडे पाठवून दिला. हळूहळू माधवराव या घोड्यावर स्वार व्हायला शिकले.

माधवरावाच्या लहानपणी घडलेली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या जन्मदात्या आईचा मृत्यू. या घटनेने माधवरावाच्या मनातलं देवाचं आसन डळमळीत झाल. अर्थात एकदम नास्तिकवादाप्रत वळण्याइतके त्याचे मन पक्व नव्हते. पण देवाला आपली हाक ऐकू जात नाही एवढे तरी त्याच्या मनावर ठसले.

आईच्या मृत्यूनंतर माधवरावांना वडिलाचा अधिक सहवास मिळू लागला. त्याच्या मनावर चागले सस्कार व्हावेत यासाठी त्याचे वडील सतत प्रयत्न करीत. छोटया छोटया प्रसगातून न रागवता त्यांना ते शिकवित असत.

वडिलाचे बरोबर माधवराव फिरतीला जायचे. त्यावेळचे अनुभव त्याना शाळेहून जास्त मोलाचे वाटले. कष्टकरी शेतकऱ्याचे हाल त्यांनी बघितले. ब्राह्मण्याचे अनुभव घेतले. जातीयवाद पाहिला त्याच्या मनाने त्या सगळया अनुभवाची नोद घेतली.

कोल्हापुरात शाळेला आल्यावर माधवरावाना इतर विद्यार्थ्यांसारखी वागणूक मिळू लागली. खेडयात त्याना मामलेदाराचा मुलगा म्हणून मान होता पण कोल्हापूर 'राजधानी' असल्याने तेथे तसले काही नव्हते.

संध्याकाळी ते पचगगेच्या घाटावर फिरायला जात. 'देवालये त्याची शिखरे, दीपमाला, तुटलेला मोठा कडा, पूल, पुलाकडील वळणे घेत जाणाऱ्या नदीचा ओघ, हिरवीगार शेते, तुटलेल्या कडयाचे पुलाचे, देवळाचे आणि नदीवर धुण्यास येणाऱ्या लोकाचे प्रतिबिंब' आणि सध्याकाळ होताच 'आभाळातले रत्नभांडार' पाहण्यात माधवरावाचा तास न् तास जाई. माधवरावाना निसर्गाचे वेड लागले ते या सौंदर्याने. जवळच ब्रह्मपुरी टेकडी, 'अगावर हिरवी हिरवी शाल पाघरून झोपी गेलेली' आणि 'आभाळातील ढगाच्या शर्यती' यांनीच माधवरावाच्यातील चित्रकार फुलवला.

मॅट्रिकपर्यंत जाईतो माधवरावात बराच बदल घडून आला होता. त्यांचे वाचन भरपूर झाले होते. अंगातील अमलदारी ताठा कमी झाला होता आणि निसर्गप्रेमाने त्याना चित्रकलेकडे खेचले होते. चित्रकलेच्या परीक्षाही झाल्या होत्या.

या दरम्यान त्याच लग्न झाल. लग्नाला शाहू महाराज स्वतः आले होते आणि त्यांनी माधवरावाना भरजरी मदिल आणला होता.

## स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये

माधवरावाच्या वडिलाना त्यानी आपल्यासारखे वकील व्हावे असे वाटत होते; पण माधवरावात ती महत्त्वाकाक्षा नव्हती. अभ्यासात त्यांना रस नव्हता. त्याना आवडणारा विषय होता चित्रकला. त्यात प्रगती करावी अस त्याना वाटत होते. अखेर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये शिक्षण घ्यायचे ठरले.

तत्पूर्वी वडिलाच्या सूचनेवरून ते शाहू महाराजाना भेटायला गेले. महाराजाना नमस्कार करून त्यानी आपली इच्छा सागितली.

'किती रे भाऊ तुम्ही?' महाराज म्हणाले.

'आम्ही चौघे आहोत महाराज.' माधवराव म्हणाले.

ते ऐकल्यावर महाराजानी माधवरावाना एक मुस्काटात लगावली 'मग बापाला भीक लावायला निघालास वाटतं! मूर्ख कुठला!' आणि महाराज दिवाणजीना म्हणाले, 'खुळ पोर आहे हे. म्हणे आर्ट स्कूलला जातय. याला स्कॉलरशिप सुरू करा.' चाट पडलेल्या माधवरावांना ते म्हणाले, 'हे पहा. मुबईला जागा मिळत नाही. तू माझ्या बंगल्यात बाली हौसमध्ये रहा.'

अशाप्रकारे माधवरावाचे जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये शिक्षण चालू झाले. महाराजाच्या रागडया प्रेमाचे हे अनोखे दर्शन माधवरावाच्या मनावर फारच परिणाम करून गेले.

माधवरावांनी आर्ट स्कूलमध्ये पहिला येऊन स्कॉलरशिप पटकावली. ती जवळजवळ चार वर्षे सलग घेतली. त्यामुळे त्यांचे वडील आणि शाहू महाराज दोघानाही बरे वाटले.

काही वेळा माधवरावाना बरे वाटावे म्हणून शाहू महाराज त्यांची काही चित्रे विकत घेत. वर बक्षीसही देत. तो गुणग्राहक राजा होता आणि त्याच्या रागडया वेशामागे प्रेमळपणा दडला होता.

धुरधर या शिक्षकाकडून माधवराव चित्रलेखन शिकले. आगासकराच पोर्ट्रेट–ड्राईंग त्यांना अप्रतिम वाटलं त्रिदाडाच पेंटिंग म्हणजे त्याना लयबद्ध गाण वाटे. लँडस्केप त्यावेळी शिकवलं जात नसे. बाहेर जाऊन लँडस्केप्स करून आणायची, मग शिक्षक त्याना सूचना करायचे.

पेंटिंग झाल्यावर शाहू महाराजानी त्याना मॉडेलिंग करण्याची आज्ञा दिली. ते म्हणाले, 'माझ्या सस्थानचे लाखो रुपये पुतळयासाठी बाहेर जातात. ती कला तू शिक म्हणजे सारे पैसे तुला मिळतील.'

मग बागल मॉडेलिंग शिकले. त्यातही त्यानी स्कॉलरशिप मिळवली. पण मॉडेलिंग पूर्ण होत असतानाच शाहू महाराजाचे निधन झाले. माधवरावाना तो मोठाच धक्का होता. महाराजाच्या सहवासात त्याना बरच शिकायला मिळालं होत.

शिक्षण सपवून माधवराव कोल्हापूरला परत आले तेव्हा त्याच्यात बराच बदल झाला होता. 'स्वदेशी' चळवळीचे लोण त्याच्यापर्यंत आले होते ते आता खादी वापरू लागले होते. यग इंडिया वाचू लागले होते.

त्याना आता भरपूर वेळ असायचा. पचगगेच्या घाटावरचे निसर्गसौंदर्य त्यांनी आता कागदावर उतरवायला सुरुवात केली. चागला देखावा दिसला की तो चितारायचा मग अगदी उकिरडयात बसावे लागले तरी. असख्य चित्रे माधवरावानी चितारली. कोल्हापूरच्या आसपासचा सगळा भाग त्यानी कॅनव्हासवर आणला.

चित्रमहर्षी बाबुराव पेंटर आणि आबालाल रेहमान आदी थोराचा सहवास त्यांना या काळात लाभला.

त्यानतर माधवरावाचा बराच काळ असल्या निष्क्रियतेने गेला. पुन्हा त्यांची आर्थिक स्थितीही चागली होती.

खडेराव बागलानी 'हंटर' नावाचे पत्रक सुरू केले. माधवराव त्याला मदत करू लागले वृत्तपत्रीय कामात त्याना रस वाटू लागला. प्रुफे तपासणे, देखरेख, भाषातरे वगैरे कामात खडेरावांना त्याची मदत होऊ लागली. सध्याकाळी वेळ मिळाला तर ते लँडस्केप्स काढत असत

त्याच वेळी म. गाधीनी कोल्हापूरला एक भेट दिली. सत्यशोधक समाजातर्फे त्यांचा सत्कार करण्यात खडेराव अग्रणी होते. माधवरावाना त्यामुळे गाधीजीचा सहवास लाभला. माधवराव चित्र काढतात असे समजल्यावर ते म्हणाले, 'चित्रे अशी काढा की त्यामुळे जनसेवा घडेल.'

माधवरावाच्या मनातील चित्रकलेचे वेड त्या प्रसंगाने कमी झाले. ¤

दर आठवडयाला 'हंटर' साठी स्फुटे लिहिणे हे काम माधवराव

निष्ठेने करू लागले. खादीचा प्रचार, सत्यशोधक समाजाचे विचार वगैरेचा ते हिरीरीने पुरस्कार करू लागले. सत्यशोधक समाजाचे अग्रणी त्यावेळी खडेरावाकडे येत असत. त्याच्या चर्चेचा फायदा माधवरावाना होत असे. डॉ. बाळकृष्ण अहिताग्नी राजवाडे, पडित सातवळेकर याच्याबरोबर खडेराव बागलाचे जे जाहीर वाद झाले त्याचा चिकित्सक अभ्यास केल्याने माधवरावाची विचारसरणी तयार होत गेली.

सुधारणेची सुरुवात माधवरावानी स्वत.च्या घरातूनच केली. त्याच्या घरी एक अस्पृश्य जेवायला येत असे. त्याचे पान वेगळे माडले जात असे. अनेकवेळा सागून माधवरावाची आई ऐकेना. तेव्हा त्यानीच आपले पान त्याच्याबरोबर माडले. मग त्याच्या आईने ते सोडून दिले.

खंडेरावाचे 'हटर' पत्र जोरदार चालले होते. सस्थानी कारभारावर त्यावर टीकाही येत असे. एकदा माधवरावानी सस्थानच्या गिरणीचे कामाचे तास कमी करण्याबद्दल लिहिले. परिणामी गिरणीचे त्याना जे काम मिळायचे ते बंद झाले. त्याबद्दल त्याना इशाराही मिळाला होता; पण निर्भिडता हे धोरण चालू ठेवण्याचे माधवरावानी ठरवले होते. परिणामाची पर्वा करतो कोण ?

□

'हटर' मध्ये एकदा ब्राह्मणेतर पुढाऱ्यावर टीका आली होती. ओघात सस्थानच्या अधिकाऱ्यावरही त्यात आघात होता. त्यामुळे 'हटर'चा निषेध करण्यासाठी जाहीर सभा झाली. माधवराव त्या सभेला श्रोते म्हणून गेले. माधवराव आणि 'हंटर' यावर टीकेचे घणाघाती आघात सुरू झाले. माधवरावाना उत्तर द्यावेसे वाटत होते; पण ते कधी बोलले नव्हते. माधवरावाच्या निषेधाचा ठराव माडला गेला. तेवढ्यात माधवराव उठले. पाय कापत होते; पण ते म्हणाले, 'ठराव पास करण्यापूर्वी लोकानी तो वाचला आहे का पहा.' प्रस्तुतकर्ते म्हणाले, 'वाचलाय तो लेख सगळ्यानी.' पण सभेत बरीच तरुण मुले होती. ती ओरडून म्हणाली, 'आम्ही नाही वाचलेला.'

मग सभेच्या नेत्यानी माधवरावांनाच तो लेख वाचायला सागितला. लटपटत्या पायांनी माधवरावानी लेख वाचला आणि धीर येऊन ते चार शब्द बोलले.

सभेचा रग पालटला. माधवरावाच्या निषेधासाठी जमलेली सभा माधवरावांनीच जिंकली. ठराव मागे घ्यावा लागला.

सार्वजनिक जीवनात माधवरावाची ही सुरवात होती.

या सभेला प्रबोधनकार ठाकरे हजर होत. त्यानी माधवरावाची पाठ थोपटली.

मग माधवरावानी व्याख्यानाचे दौरे सुरू केले. सस्थानात सभाबंदी होती. खेड्यात भाषणे देता यायची. पण सस्थानचा कायदा जाचक ठरू लागला मग माधवरावानी वाळवे-कराड आदी गावात भाषणे केली. त्यावेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याचा सहवास त्याना मिळाला. माधवरावाचे विषय स्वदेशी चळवळ, खादीचा वापर आणि अस्पृश्यता निवारण हे असत. खेड्यात त्याच्या साध्या भाषेमुळे त्याना उत्तम प्रतिसाद मिळे. सभा झाल्यावर बहुधा विदेशी कपड्याची होळी असे. कायदेभगाला चिथावणी देणारी भाषणे माधवरावानी केली नाहीत त्यामुळे त्याना पोलिसाचा त्रास झाला नाही.

माधवराव हटरमधून कॉंग्रेसच्या बाजूने लिहीतच होते. एकदा माधवराव भगव्या झेड्याच्या मिरवणुकीत सामील झाले. सस्थाचचे पोलीस बरोबर चालत होतेच. कोल्हापूरच्या अनेकानी यात भाग घेतला होता. मिरवणूक पुढे जाईल तशा विदेशी कपड्याच्या होळ्या पेटतच राहिल्या. देशव्यापी चळवळीतील माधवरावाचा हा पहिला सहभाग.

पण यामुळे सस्थानच्या अधिकाऱ्याचे लक्ष 'हटर' कडे वळले. हटर बद पडणार अशा वार्ता उठू लागल्या माधवरावानीसुद्धा त्या तयारीनेच अग्रलेख लिहायला सुरवात केली त्यामुळे हटरचा खप वाढला. खडेराव राजनिष्ठ होते; पण अधिकाऱ्याचा जुलूम त्यांना पहावत नसे. माधवरावाना त्यानी याबाबतीत स्वातत्र्य दिले.

माधवरावानी 'हटर'च्या माध्यमातून प्रजेची गाऱ्हाणी, लोकाच्या तक्रारी दरबारापुढे माडल्या. प्रभातफेरीची परवानगी मिळावी, सभाबंदी रद्द व्हावी, दारूची दुकाने बद करावीत, वेठबिगारीची चौकशी व्हावी, गिरणीचे तास कमी करावेत, जबाबदार राज्यपद्धती सुरू करावी या मागण्याबरोबर सस्थानच्या शिकारीसाठी असलेले हरणाचे पार्क कुपणबद्ध करावेत, त्याना पिकाची नासधूस करू देऊ नये हीसुद्धा माधवरावाची मागणी होती.

त्या अकाच्या प्रती माधवरावानी फुकट वाटल्या. सस्थानविरुद्ध लिहिण्याचे धाडस माधवरावानीच पहिल्यादा केले. त्याच्या प्रचारार्थ एक सभाही झाली.

दिल्लीला कॉंग्रेस वर्किंग कमिटीला पकडल्याची बातमी आली तेव्हा कोल्हापुरात हरताळ, मिरवणूक झाली. त्यावेळी लाठीमार झाला. या लाठीमाराबद्दल माधवरावानी डि. मॅजिस्ट्रेटला जाब विचारला. यापुढे जाऊन माधवरावानी लोकाची फिर्याद महाराजानाही सुनावली.

परिणामी 'हटर' पत्राला नोटीस आली सस्थानचे रेसिडेंट लॅग हे चित्रकार माधवरावाचे चाहते होते. त्यानी तू यात पडू नयेस असा सल्ला माधवरावाना दिला होता. पण माधवरावानी जनसेवेचे ककण बाधले होते. 'हटर' बद पडले.

आणि माधवराव सस्थानातून हद्दपार झाले.

## समाजवादाकडे

हद्दपार माधवराव पुण्याला आले. तेथे कॉंग्रेसच्या एका सभेत त्यानी भाषण केले. ते लोकाना आवडले. पुण्याच्या ज्ञानप्रकाशने ते छापले.

'ज्ञानप्रकाश'चे संपादक काकासाहेब लिमये याना माधवराव भेटले. माधवरावाना महत्त्व मिळाले ते 'ज्ञानप्रकाश'मुळेच काकासाहेबाच्या निरपेक्ष वृत्तीचा त्याच्यावर फार परिणाम झाला. कोल्हापुरात तूर्त जाऊ नका असा सल्ला त्याना काकासाहेबानी दिला. अनेक बाबीत काकासाहेबाचे विचार त्याना मार्गदर्शक वाटले.

म्हणून ते काकासाहेबाना 'राजकीय' पिताजी मानत

हद्दपारीच्या काळात त्याना विविध अनुभव आले राजद्रोहाचा शिक्का त्याच्यावर होता. त्यामुळे अगदी जवळचे मित्रसुद्धा घाबरून होते त्याना आसरा दिला तर राजाची नजर कोल्हापुरातील आपल्य

मित्रावर वळेल असे त्याना वाटे. त्यामुळे ते माधवरावाना घरात घ्यायला टाळाटाळ करीत. उलट कर्मवीर शिंद्यासारखी प्रेमळ माणसेही त्याना या कालावधीतच भेटली. परिणामाची पर्वा न करता अमाप प्रेम करणाऱ्या माणसानी त्याची आठवणीची शिदोरी भरून टाकली.

या कालावधीतच माधवरावांची विचारक्रांती घडून आली. ते समाजवादी बनले. शॉंच्या 'इन्टेलिजन्ट वुमन्स गाईड टु सोशॅलिझम' ने त्याची समाजवादाची पूर्वतयारी केली. मग सोशॅलिझम या विषयावर नामवतानी लिहिलेले ग्रंथ वाचताना—

'हिंदुस्थानचे तसे जगाचे दारिद्र्य जायचे असल्यास,बेकारी नाहीशी व्हायची असल्यास, गुलामवृत्ती जायची असल्यास 'सोशॅलिझम' हाच एक खरा आणि प्रामाणिक उपाय आहे.'

या निष्कर्षाप्रत ते आले.

¤

ते कोल्हापूरला परत आले त्यावेळी कोल्हापुरातील वातावरण थंडावले होते. 'सत्यशोधकाना इशारा' ही लेखमाला त्यानी हद्दपारीच्या काळातच पूर्ण केली होती. कोल्हापूरला आल्यावर संस्थानबाहेरच्या वृत्तपत्रातून त्यानी ती प्रसिद्ध करायला सुरवात केली. आता त्याच्या लिखाणात समाजवादी सूर होता. या लेखाबद्दल सयाजीराव गायकवाड महाराज यानी पत्र पाठवून माधवरावाचे अभिनंदन केले.

तेवढ्यात आणखी एक दुःखद घटना माधवरावांच्या आयुष्यात घडली. माधवरावाचे मार्गदर्शक, गुरू, सल्लागार असणारे त्याचे वडील श्री. खंडेराव बागल हे कालवश झाले.

¤

या धक्क्यातून सावरायला माधवरावांना बरेच दिवस लागले.

काकासाहेब कालेलकर याच्या इच्छेनुसार 'करवीर इलाखा खादी संघ' स्थापण्यात आला आणि अध्यक्षपदी माधवरावांची निवड करण्यात आली.

सातारा जिल्हा कॉंग्रेस सभेसाठी माधवराव वाळवा तालुक्याचे प्रतिनिधी म्हणून गेले या सभेत 'शेतकऱ्याला जास्त व्याज आकारू नये' आणि 'हिंदूची देवालये हिंदूंना मोकळी असावीत' हे २ ठराव माधवरावानी मांडले. पण सभेतील प्रतिष्ठित आणि शेतकऱ्याचे प्रतिनिधी म्हणवणाऱ्यानी त्याला मोडता घातला.

मग माधवरावानी वाळवे तालुका शेतकरी परिषद भरवली. शेतकरी एक व्हावा, संघटनेच्या सहाय्याने अन्यायाशी लढा घेण्याची त्याची तयारी व्हावी हा माधवरावाचा उद्देश होता. या उपक्रमाला कर्मवीर शिंदे यांचा आशीर्वाद होता.

माधवरावाची सडेतोड वृत्ती आणि पटेल ते करण्याचा स्वभाव यामुळे कॉंग्रेसमध्ये आणि सत्यशोधक समाजात त्यांना हितशत्रू निर्माण झाले. माधवरावाच्या सगळ्या गोष्टी बरोबर होत्या असं नव्हे; पण त्यांची तत्त्वनिष्ठा इतरापेक्षा मोठी होती. सत्यशोधक समाजाला त्यानी आपले मानले होते. पण त्यांचा सडेतोड स्वभाव काहीना मानवेना तर काहीना त्यात वेगळा वास येऊ लागला.

माधवरावानी आणखी एक धाडसी उपक्रम घडवून आणला.

त्यांनी एक सभा बोलवली आणि संस्थानातील देवळे अस्पृश्यांना खुली व्हावीत असा ठराव पास करून घेतला आणि जनमत अनुकूल आहे हे पाहून पुन्हा २५ सप्टेंबरला अस्पृश्यांसमवेत जगदंबा–मंदिर प्रवेशाच्या पत्रिका वाटल्या.

२५ च्या सभेवेळी काही अधिकारी सभेच्या जागा अडवून बसले होते. माधवरावानी वेगळी सभा बोलवली आणि सभेनंतर एका अस्पृश्याच्या हातात हात घालून करवीर निवासिनी जगदंबेच्या मंदिरात त्यांनी प्रवेश केला.

ही पहिली खेप होती. त्यानंतर देवालय रीतसर सर्वांना खुले झाले.

हीच पद्धत अवलंबून नृसिंहवाडीचे दत्तमंदिर सुद्धा अस्पृश्याना खुले झाले. माधवरावाच्या जीवनातील या दोन महत्त्वाच्या घटना आहेत.

¤

कामगारासाठी काहीं करावं असं माधवरावांना वाटे. जवळच शाहू मिल होती तेथे कामाचे तास जास्त, पगार कमी, अमलदार, उन्मत्तपणे वागत. एकदा माधवरावानी 'हंटर'मध्ये लिहिलं. तेव्हा गिरणीचे काम जे त्याना 'हंटर'साठी मिळायचं ते बंद झाल

माधवरावानी टीका चालूच ठेवली. संस्थानमध्ये फॅक्टरी ॲक्ट लागू व्हावा ही त्याची मागणी होती. ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसकडे त्यानी त्या अर्थाचा ठराव पाठवला. त्याचे उत्तर सेन्सॉर झाले. दिवाणानी माधवरावाना बोलवून हद्दपारीची धमकी दिली.

पुढे मजुरांना कामावरून काढून टाकण्याच्या धमक्या येऊ लागल्या म्हणून मजूर संघटना स्थापित झाली. कामगार चळवळीची माहिती व्हावी म्हणून माधवरावांनी फंड काढून दोन कामगाराना अहमदाबादेत पाठवून शिकवून आणले.

संघटना मजबूत झाल्यावर संपाची धमकी देता आली. या संघटनेला सत्याग्रहाची पाळी आली नाही त्यापूर्वीच सर्व मागण्या मजूर झाल्या.

सिनेमा कामगारांची संघटनासुद्धा माधवरावानी बांधली. या संघटनेमुळे सिनेमा कामगारांचा प्रश्न धसाला लागला आणि त्यानंतर इतर सर्व संघटनातील प्रमुख कार्यकर्ते घेऊन 'कोल्हापूर संस्थान राष्ट्रीय कामगार संघ' ही संस्था माधवरावानी बांधली. अगदी मुंबईपर्यंतच्या कामगार चळवळीशी माधवराव निगडीत होते. पुढे माधवरावांच्या डोळ्यादेखतच त्या संघटना कमकुवत झाल्या; पण निदान सुरुवात तरी चांगली होती.

कामगारक्षेत्रातील माधवरावाचे कार्य चालू झाले ते शाहू मिलमुळे अगदी शेवटपर्यंत त्याना शाहू मिलच्या कामगाराविषयी जिव्हाळा होता.

त्याची पोच म्हणूनच शाहू मिलच्या पुढील रस्त्याच्या चौकाच नाव आहे.

'बागल चौक'

¤

एकदा भाषण करताना माधवरावाच्या तोंडून काही जहाल शब्द गेले आणि माधवरावाना राजद्रोहाची नोटीस लागली. पण माधवरावानी माफी मागितली आणि प्रकरण मिटले. त्यात माधवरावाचा फार दोष होता अशातला भाग नव्हता; पण काही कारण नसताना

पृष्ठ २१ वर

# प्रतिकाराचे अंकूर

**उत्तराखंडात अलकनंदेच्या एका तीरावर सात हजार फूट उंचीवर वसलेल्या एका दुर्गम गावातली ही गोष्ट. नदी आणि जंगलाच्या आधारावर इथले वनवासी रहातात. मोहन हा गावातला एक वनवासी. भूस्खलन झाल्यामुळे त्याची शेतजमीन कोसळून जाते त्यामुळे बायकामुलांसाठी पैसे मिळवायला, तो शहरात जातो. इकडे अलकनंदेला पूर येतो आणि सगळं गाव पुराच्या पाण्यात जातं. कुंवर हा वनवासींच्या मदतीसाठी साथीदारांसह गावात येतो गावातली ही परिस्थिती कशामुळे याचा विचार करताना कुंवर आणि त्याचे साथीदार पहाडावरच्या बेसुमार जंगलतोडीकडे लोकांचं लक्ष वेधतात. भूस्खलन आणि पूर हे दोन्हीही जंगलतोडीमुळेच आहे हे सांगतात. वनवासींना ते पटतं पण त्यांचा नाईलाज असतो. रोजच्या मजुरीसाठी त्यांना झाडावर घाव घालावेच लागतात. कुंवरला त्यांच्या साथीनं हे बदलायचं असतं पण...**

---

प्रतिकाराचे अंकूर
(भाग तिसरा)·

मूळ लेखक : चंडीप्रसाद भट्ट
मराठी अनुवाद : कुसुम कर्णिक

---

कुंवर बाहेर पडणार होता तेवढ्यात एक जण घाईघाईने त्याला सांगायला आला, ‘तुम्हाला साहेबांनी बोलावलं आहे. काही तरी जरुरीचे काम असावे म्हणून सांगितलेय साहेबांनी की पुढे घालून घेऊन ये.’

‘घरी बोलावलंय. मी काय यांचा नोकर आहे का?’ कुंवरने उत्तर केले. पण मग त्याच्याच लक्षात आले या साहेबांनी आपलं काय केलंय. नेहमी मदत करायला तयार असतात. त्या गरीब बिचाऱ्या गाववाल्यांच्या कच्च्या झोपड्यावर तर गदा नसेल आली यांच्या खात्याची नाही, हे तर मी कधीच घडू देणार नाही. त्याने मनातल्या मनात ठरवले.

कुंवरने नको नको म्हणत असताना त्याच्या हातात चहाचा पेला दिला. कुंवर भांडायला उतावळा झाला होता. पण साहेब एकदम गप्प होते. मग त्यांचे तोंड उघडले.

‘भय्या, मी शेवटी याच भागातला आहे. मलाही काळीज आहे. शक्य तेवढी लोकांना मदत करण्याचा प्रयत्न मीही करत असतो. तुम्ही काहीतरी विधायक कार्यक्रम का नाही सुरू करत? इथल्या लोकांना कसलेही काम काही येत नाही. फुकटच बोलता तेवढं येतं. आमच्या गावातले लोकही हे असलेच आहेत.’ साहेबांचं हे बोलण ऐकून कुंवरचा चेहरा रागाने ताणला गेला.

‘एवढ्याचसाठी मला बोलावलं का आपण? तीच तीच गोष्ट परत परत उगाळताहात. ऐकून असं वाटतं की तुम्ही लोकांनी हे सारं पाठ करून टाकलंय. नेहमी नेहमी हेच सांगत असता, समोर ऐकायला कोणी असो वा नसो’ कुंवर रागाने उद्गारला

आता साहेबांचा चेहरा रागाने आक्रसला. ‘तुम्हाला काय वाटतं मनाला लागेल ते बोलायचा अधिकार काय फक्त तुम्हा लोकांना दिलाय?’ साहेब चिडून बोलले.

'साहेब, तुम्हला माहीत नाहीये का इथल्या माणसाला लहानपणापासून दारोदार भटकावं लागते? आमच्या इथल्या या शिडीसारख्या शेतातून किती पिकतं आणि त्याकरिता किती कष्ट करावे लागतात. तुम्हाला काय माहीत नाही का? गावातली घट्टीकट्टी पोरं सारी सैन्यात भरती होतात. तेही काम काय गप्पा मारायचं काम आहे का पत्ते कुटायच काम आहे? जे सैन्यात जाण्याच्या लायकीचे नाहीत त्यांना माहिती असते की इथे काम मिळणार नाहीये. त्यांना बालपणातच देश सोडून दूर जावं लागतं. आज आम्हाला इथे काम निर्माण करण्याची काही शक्यता दिसत नाहीये. तुम्हा लोकांच्या भरवशावर यापुढेही आम्हाला सोडलं तर ती शक्यता कधीच निर्माण होणार नाही आणि मग या आमच्या मुलुखाची स्थिती...

'देवाच्या भरवशावर नाही तर आमच्या तो म्हणाला.

'हं, तुमचं पुढाऱ्यासारखं भाषण झालं का सुरू? मीही एका सैनिकाचाच मुलगा आहे. जर संधीच मिळत नाही म्हणता तर मी आय. एफ. एस. पास तरी कसा झालो असतो? ज्याला पैसे कसे सांभाळावे हे कळते त्याच्याकरिता सर्व संधी उभ्या आहेत. मला तुम्हाला विचारायच होतं की त्या गावकऱ्यासमोर तुम्ही मला असं का बोललात. जे काही माझ्या हातात होत ते मी केलं. भय्या, शेवटी यातून मार्ग आम्हालाच काढावा लागणार आहे ना?' साहेब म्हणाला.

कुंवरला हे सारे बोलणे उपहासाचे वाटले. त्यानेही रागानेच उत्तर दिले.

'हा, हां माहिती आहे तुमच्या वडीलांनी कॅप्टन झाल्यावर डेहराडूनला घरही खरेदी केलं होत. हे पण चांगल माहिती आहे मला की तुमचं शिक्षण कोणकोणत्या शाळा–कॉलेजमध्ये झाल. आता जरा हे पण सांगा की या भागातल्या किती जवानाच्या मुलांचे शिक्षण तुमच्याबरोबर झाले? अर्थात, आम्हाला तसा तुमच्याविषयी अभिमानच वाटतो; पण तुम्ही तुमच साहेबपण दाखवायला लागलात की आम्हाला कठीण जाते'

ऐकता ऐकता साहेबाचाही पारा चढू लागला. पण शेवटी अभिमान वाटतो हे ऐकून ते जरा शांत झाले त्यांना कुंवरविषयी आपलेपणा वाटू लागला.

'ठीक आहे, तुम्हाला जे सांगायचे आहे ते सांगा' साहेब.

वनक्षेत्रात वसलेल्या एका गावातील कथा आणि व्यथा कुंवरने सांगायला सुरुवात केली. गावात बाया, लहानमुले, वृद्ध यावर बेरोजगारी आणि उपासमारीनी मरायची वेळ आली होती. वनक्षेत्रातल्या गावातून पर्वतीय अर्थव्यवस्थेपायी लोकांच्या हालअपेष्टांची अनेक ज्वलत उदाहरणे त्याने मांडली. जंगलभाग असल्याने लोकांची गळचेपी होते आहे, नुकसान होते आहे. असहाय्य गावकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन साहेब शांतपणे ऐकत होते.

एका गावातल्या एका सेवानिवृत्त जवानाची हकिकत तो सांगू लागला. 'एका जवानाने मला घरी नेले. त्याने एक फोटो दाखवला. डोळ्यावरून फक्त कळत होते की तो त्याचाच होता. मी त्यांना विचारले, तुम्ही सारे लोक असे आजारी का दिसता. तेव्हा दु:खी अंतःकरणाने त्याने सांगितले तो ४२ वर्षांचा असताना पेनशनीत निघाला, आज तो ४६ वर्षांचा आहे. कुटुंबाचा पसारा वाढलेला आहे.५ मुले आहेत, बायको आजारी असते. मी नोकरीत होतो तेव्हा पैसे पाठवत असे त्यावर घरखर्च चालत असे. आमच्या नोकरीत म्हणजे वेळेवर काम, वेळेवर जेवण आराम सगळं नीट असत. आता घरी आलोय तर या वयात खूप कष्ट करावे लागतायत आणि जेवण तर तस काहीच नाही. त्यामुळे आजारी पडणे स्वाभाविकच आहे जी थोडीशी पेन्शन मिळते त्यात सात जणांचे भागणे अशक्यच आहे तुम्हाला वाटत असेल की इथे दुष्काळ आहे यंदा. पण दरवर्षीची परिस्थिती अशीच असते कधी शेती चांगली पिकली तर चार महिने धान्य पुरते, आधी जमीन फारशी नाही, आहे तिच्यात दगडच दगड, शिवाय तांबडी नापिक माती. इथे एरवी जंगलाशिवाय आहेच काय? एवढच बरंय की जंगल असल्याने बायांना लाकूडफाटा आणि गवत कमी पडत नाही पण गेल्या काही वर्षांपासून जंगलखात्याचे चौकीदार फार कडक झालेत. पकडलं तर विळे जप्त करतात. त्यावर मी विचारले की मग तुम्हाला बरेच विळे घ्यावे लागत असतील. त्याने उत्तर दिले, नाही तसे नाही. त्यांना आमच्याकडील काही विशेष वस्तू हवी असते तेव्हाच ते असे विळे जप्त करतात. फौजी जवान सुट्टीला परत येतो तेव्हा तुम्हाला तर माहितीच आहे की तो दोन–तीन बाटल्या तरी आणतोच. चौकीदाराला तो आल्याचे कळले की झालेच तो वसुलीला हजर होतो. मी विचारले की तुम्ही लोक तरी जंगलाचा नाश का करता? त्यावर त्याने ओशाळून सांगितले, बाबूजी, आम्हालाही कळते.शेवटी आम्ही फौजेरजी माणसे आहोत. शिस्त आम्हालाही कळते. ही सर्व आमच्या देशाची संपत्ती आहे हे आम्ही जाणतो. पण शेतकऱ्याला नांगर कुळव हवाच ना! बायांना लाकूडफाटा, गवतकाडी लागणारच ना? ते काय आम्ही काय विकत घ्यायचं का?'

साहेब मध्येच काही तरी बोलणार होते; पण कुंवर पुढे बोलतच राहिला.

'ही माझ्या देशाची संपत्ती आहे' हे सांगताना त्याच्या चेहऱ्यावर अभिमानाची प्रसन्नता झळळून गेली; पण नंतर लगेच त्याचा चेहरा उदासवाणा झाला. तो आर्त स्वरात पुढे म्हणाला, बाबुजी आमच्या या गरीब मुलखाकरता काही तरी करा. आम्हाला रोजगार मिळायला हवा तुम्ही बघता आहात की आमचे काय हाल चालले आहेत. फौजेतून निघाल्यावर आमच्या रोजीरोटीची काही तरी सोय झाली तर आम्ही दुप्पट मेहनत करून काम करू.

एका पधरा वर्षाच्या मुलाला कुंवरने विचारले होते, तू काय नोकरी करशील का? तर त्याने तात्काळ उत्तर दिले, मी फौजेत जवान बनणार आहे. मी काय फालतू माणूस नाहीये की, आतापासून भाडी घासायला लागीन.

त्यानंतर मी जवळ जवळ २० गावामध्ये हिंडलो जगात रमणीय गोष्टी असतात हे मी विसरून गेलो. वेदनी बुग्याल (कुरण) मेंटी बुग्याल, सुदर रमणी सारे विसरलो. मला एका विश्वास पक्का आला की इथे मानव–शक्ती आहे. या मानव–श्रमातून आणि नैसर्गिक साधन संपत्तीतून ही गरिबी मिटवली जाऊ शकते. एका गोष्टीची फक्त कमी आहे ते म्हणजे दृढसकल्पवान कार्यकर्ते.

आपण तर जाणताच की मी नोकरदार माणूस नाही. वेळ असेल तसा मित्राच्या बरोबर मेहनत करतो; पण अडचण असते की आम्हाला काम कोण देणार? तुम्ही सर्व साहेब पडलात. तुम्ही तर इथे नव्याने आला आहात. तुमच्या आधीच्या साहेबाच्या डोळ्यात आम्ही सलत होतो, पण आमचीही सकल्पशक्ती दिवसेंदिवस वाढते आहे आजकाल इथे जे साहेब बनून येतात त्यांना इथे भरपूर कमवायचे असते आणि या रमणीय भागात रहायच असतं. त्यांना इथे रहाणाऱ्या लोकाच्या जीवनाची काहीही माहिती नसते. इथे असताना मनमुराद लूट करून अमीर बनून ते परत जातात. एकीकडे अधिकाऱ्याची ही तिरस्कार वाटण्याजोगी पद्धत, दुसरीकडून ठेकेदाराची लूट आणि लोभ मिळून ही एक भयानक आक्रमणशाही आहे.' त्याच्या शब्दात त्वेष आणि विश्वास प्रकट होत होता.

'भय्या, परत तुम्ही पुढाऱ्यासारखी भाषणबाजी सुरू केलीयत. मला ही भाषण-

बाजी पसत नाही. मलाही काही सागायचे आहे, ते जरा बोलू द्या मग तुम्हाला काय वाटतय ते सांगा. तुम्ही सागितल ते मला बरेचसे नवीन आहे. तुमच्याविषयी तर मला काहीच माहिती नव्हती. कधी कधी क्लबमध्ये गप्पा होतात. सर्वजण आपापल्या स्वार्थी दृष्टिकोनातून माडत असतात. खर तर मला अजूनही तुमच म्हणण पूर्णपणे लक्षात आलेल नाही. आपला हा माग मागास आहे हे मी ऐकलेले आहे इथल्या एका डॉक्टरने क्लबमध्ये गप्पा मारताना सागितले की या भागात गरिबी इतकी आहे की, रोग्यात ७० टक्के लोक क्षयानं आजारी आहेत आणि त्याना स्वतःच्या रोगाविषयी अंदाजही नाहीये. तुम्ही सागता आहात की, या भागातले बरेच लोक सैन्यात आहेत पण ते डॉक्टर तर तस काहीच म्हणाले नाहीत,' साहेब बोलत होते.

' बस, परत तेच. डॉक्टर सरकारी आहेत म्हणून त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवणार. डॉक्टरानी जे सांगितले नाही ते मी सागतोय पण त्यावर तुमचा विश्वास नाही,'कुवर उठून रागाने म्हणाला

पण साहेब त्याला आडवत म्हणाले, 'बसा तर खरं. आज इथ जेवण करा. जोपर्यंत तुमच नाहीतर माझं पुरं समाधान होत नाही तोपर्यंत आज मी तुम्हाला सोडणार नाही. बोलण अर्धवट टाकून तुम्ही कस काय जाऊ शकणार ? '

कुंवर परत बसला. परत चर्चा सुरू झाली.

'खूप दिवस मी हा विचार करत राहिलो. कामातही माझ लक्ष लागत नसे. शेवटी एक मार्ग मिळाला. माझा एक मित्र ओवरसियर होता तो मला म्हणाला की स्थानिक लोकाना घेऊन आम्ही जर काही लहानमोठी कामे करायला तयार असलो तर तो आम्हाला गँगच्या हिशेबात किंवा उक्त काम मिळवून देऊ शकेल. योगायोगाने त्याचवर्षी आमच्या भागात निर्माण कार्य जोरात सुरू झाले होते. त्याच्या सांगण्यावरून आम्ही दोघा साथीदारानी नोकरीला रामराम ठोकला. आम्ही निश्चय केला की परत नोकरी कधी करानाही. तर कष्टकऱ्याच्या बरोबर आयुष्य घालवून आपल्या भागाचा विकास करण्याचा मार्ग शोधून काढू म्हणजे मग इथली गरिबी कायमची मिटेल. तसा हा निर्णय आम्ही भावनेच्या भरातच घेतला होता. '

' आम्ही दोघे साथी त्या भागात हिंडलो. स्थानिक लोकाना बरोबर घेण्याची आमची इच्छा होती; परतु पुऱ्या इलाक्यातून सगळे मिळून पाच लोक आमच्या बरोबर काम करायला तयार झाले त्यात दोघे तर फक्त सोळा वर्षांचे होते आणि तिघजण आमच्या वयाचे होते. आम्ही लोकाना समजवण्याचा खूप प्रयत्न केला की त्याच्याकरताच हे काम आम्ही घेतो आहोत पण आमच्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. अशातला भाग नव्हता की त्या भागातला दुष्काळ सपला होता किंवा लोक जगायला बाहेर गेले होते पण लोक विचार करत की ठेकेदाराकरिता घरदार सोडा आणि रात्रदिवस काम करा आणि शेवटी पैसे मिळायची वेळ आली की हे ठेकेदार आणि त्याचे कारकून गायब होतात आमच्या बरोबरचा सोळा वर्षाचा युवक त्या सैन्यातल्या जवानाचाच मुलगा होता.

इथूनच आमच्या कहाणीला खरी सुरुवात होते. त्या ओवरसियर साहेबाचे आमच्यावर फार उपकार आहेत. आम्हा सात लोकांच्या टोळीला त्यानी काम दिले आणि आम्हाला रोजगारही चांगला सुटू लागला. आमच्यातले लोक मधून मधून सुट्टी घेऊन घरी जात तेव्हा लोकांना या नव्या उद्योगाची माहिती सागत. हळूहळू पुऱ्या इलाक्यात आमचा प्रचार झाला. आमच्या गटाची भराभर प्रगती होऊ लागली. बरेच दिवस हे चालू राहिले. आम्ही मजुरी करून रोजगारही मिळवत होतो आणि लोकाचे प्रोत्साहनही मिळवत होतो लवकरच आमची सख्या सातापासून वाढून शेकडो झाली. आमची आपापसात चांगली मैत्री झाली होती. काम चालू ठेवण्याकरिता लागणारी पुजी, औजारे ही कोणा सावकाराच्या कृपेशिवाय आमच्या सहकार्यातून आम्हीच जमवली होती ती सारी एक मोठी कहाणी होईल की कशाप्रकारे आम्ही आमच्या अडचणी सोडवत होतो. आपापसात सलोखा राखत होतो. सागायचं म्हणल तर दिवसच्या दिवस पुरायचे नाहीत.

तर सागायच म्हणजे सुरुवातीला स्थानिक अधिकारी आणि कत्राटदार यानी आमच्याकडे लक्षच दिले नाही; पण आम्ही जसे नवीन नवीन कामे एका मागून एक घेऊ लागलो, जसे लोक आमच्याबरोबर मोठ्या संख्येने येऊ लागले ते बघितल्यावर ठेकेदाराचे लक्ष आमच्याकडे जायला लागले. लोकाच्या अज्ञान आणि असहाय्यतेचा फायदा घेऊन आजपर्यंत ते लोकाना फसवत आले होते त्याना आणि वरच्या अधिकारीवर्गाला आमची उपस्थिती आता खटकायला लागली. त्याना आमचा राग यायला लागला आणि त्यानी आम्हाला त्रास द्यायला सुरुवात केली. ते इतक्या सफाईदारपणे त्रास देत की काय सागाव ? त्यानी भाव जरा वरखाली केले की आम्हाला एकेक दिवसाच्या मजुरीचा फटका बसायचा. त्याना हिशेबाबद्दल काही सागायला जावे तर ते त्याच्या मोजमापाच्या सव्यापसव्याबद्दल लंब्याचौड्या बाता आम्हाला सांगायला लागायचे. असं बऱ्याच वेळा घडल्यावर शेवटी परिणाम असा झाला की आमच आणि विभागवाल्याच वाकडं आल. पाण्यात राहून माशाशी वैर करून काय भागणार हे आम्हाला कळत होतं; पण आम्हालाही आमचा स्वाभिमान सोडायचा नव्हता. तो सागता सागता मधेच थाबला आणि मग परत बोलू लागला.

मग आम्ही वनखात्याशी संबध प्रस्थापित केला. फरक इतकाच होता की पहिल्यादा आम्ही कुशल कामगारही कुशल कामगाराची कामे धकवत होतो; पण आता या कामात आम्ही कुशल असणे जरुरीचे होते.

आम्ही साऱ्या साथीदारानी अतिशय उत्साहाने हे नवीन आव्हान स्वीकारले. जगलातच आम्ही रहात होतो. दहा तासांऐवजी आम्ही बाराबारा तर कधी चौदा तासही मेहनत करत असू; परंतु कौशल्य नसल्याने काम निम्मेच व्हायचे. इतर काही कारणामुळे आमची सख्याही घटून चौदावर आली होती, परंतु जेवढे उरलो होतो ते सारे एक कुटुब असल्यासारखे जवळ आलो होतो. आम्ही खूष होतो की आम्ही एका नव्या कामाला आरभ केला होता. हे काम आमच्या जीवनाचे पायाभूत काम होते हे आमच्या लक्षात आले होते आणि हे काम पहाडी भागात कधीही न सपणारे काम होते हे आम्ही जाणले. आम्ही हे जाणून चुकलो की या कामाची दोन्ही अगे जगल सवर्धन

आणि जगलतोड यात स्थानिक लोकाना सहभागी करून न घेतल्यास त्याचे परिणाम फार भयानक होतील. पूर्वीच्या काळी ही जंगल पट्टी वन विभागाच्या सपूर्ण अखत्यारीत नव्हती; पण नतर जेव्हा ही त्याच्या ताब्यात आली तेव्हा या भागात जगलतोड करून फायदा उठवण्याविषयी वराच प्रचार वनविभागाने चालवला होता. त्याच वेळेला या भागात जागोजाग मोटारीचे रस्ते आणि अड्डे बनत होते. त्यामुळे या भागात वनविध्वंसाच्या योजना झपाटघाने बनवल्या गेल्या ' थोडा वेळ थाबून त्याने परत सुरुवात केली.

'आम्ही आमच्या प्रत्येक दिवसाच्या कामाचे मूल्यमापन करत होतो परतु हे सारे करूनही अनुभव नसल्याने आम्हाला फारसा आर्थिक फायदा झाला नाही. फक्त एवढेच समाधान होते की आमच्या ध्येयाकडे आम्ही जात होतो माझ्या साथीदाराच्या कष्टाचे, धीराचे आणि सहनशीलतेचे वर्णन कोणत्या शब्दात करू हेच मला समजत नाहीये काही वेळा तर चौदा तास काम करूनही खायला फक्त दोन रोटया मिळायच्या. रेशनचे दिवस, खुल्या बाजारात धान्य मिळणे कठीण होते. वेळेवर रेशनही मिळत नसे परतु यामुळे आम्ही निराश होत नव्हतो उलट हे दिवस लवकर पार व्हावेत म्हणून इतरापेक्षा जास्त काम करून दाखविण्याची ईर्षा प्रत्येकाच्या मनात होती.'

एक मर्मभेदी हकीकत कुवर साग़ू लागला 'एकदा आमच्यातले बरेच जण सणाकरिता घरी गेले होते कामावर फक्त तीन जण उरले होते. पण त्यानी तरीही काम केले. झाड तोडून मोठाले ओंडके बनवण्याचे काम होते. एका झाडाचे ओंडके पाडून झाल्यावर दुसऱ्या झाडाकडे वळायच्या ऐवजी त्याने कापलेले ओडके खड्डयातून सडकेवर वरती काढायचे काम सुरू केले. सध्याकाळ झाली तेव्हा फक्त दोन ओडके बाहेर काढायचे बाकी राहिले होते. दुसऱ्या दिवशी पहाटेच ते कामावर गेले छोटा ओडका एका तासात त्यानी बाहेर काढला. मोठा ओडका तसाच बाहेर काढणे अशक्य होते म्हणून ठरले की त्याचे दोन तुकडे करून बाहेर काढायचे आणि ते बाहेर काढल्यावरच नास्ता घ्यायचा. इतक्यातच जगलाचा शिपाई आपण्या मुलासह सणासुदीचा नास्ता सर्वांसाठी घेऊन तेथे पोचला. मग काय सर्वच खूष झाले, त्याना जोश आला. मग काय एक तासाऐवजी दोन तास सर्वांनी नास्ता करत तबत काढले ठरले की जेवणापूर्वी तो ओडका तोडून घ्यायचा. आता तिघाऐवजी ते पाच जण होते. आम्ही कोणी पाहुणे थोडेच आहोत असे म्हणत शिपाई आणि त्याचा मुलगाही कामाला झटले. ते म्हणाले की ते तर फौजी आदमी आहेत. ओडका बाहेर काढायची नवी युक्ती सांगतील. ओडका तोडताना सर्व लाकूड खराब होणार, ओडका तसा पाच ते सहा क्विटलचा होता. त्यानी कुऱ्हाड घेतली आणि वासे तोडून आणायला ते निघणार इतक्यात त्याचा मुलगाच तीन वासे घेऊनही आला. खड्डयापासून वर सडकेपर्यंत जमिनीलगत वासे आडवे ठेवले, आणि युक्तीने त्यावर ओडका चढवला. शिपाईदादा वरती उभे राहून सर्वांना हिम्मत देऊ लागले ओडका कसातरी दोन फूट वरती चढला पण पुढे चढवणे शक्य नाही हे लक्षात आले. शिपाईदादा खाली उतरले. मग सर्वांनी एकत्र जोर लावला. पाच...सहा सात फूट ओडका वर चढला. आता सडक फक्त २ फूट वर राहिली होती. परत सर्वांनी जोर लावला. त्याचा तरुण मुलगा मधे होता तो वरच्या बाजूला राहून ओडका रेटत होता. सगळयाना चेतवत होता .. थोडा जोर आणखी लावा मर्दानो की बस. आता १०-१२ मिनिटात सगळयाना आईनं पाठवलेली पुरी खिलवतो. जरा नेट लावा. मी बघा कसला जोर लावलाय अरे म्हणून तर हा इतका वर आलाय.' एकाने उत्तर दिले, ' हा भाई, तुझे वडील मदतीला नसते तर आमची काही हिम्मत झाली नसती.'

दोन मिनटं सर्व दम खायला बसले. ओडका खाली सरकू नये म्हणून त्याला उटी लावली होती. थोड्या वेळात परत सगळे उठले एक जोराचा धक्का सर्वांनी दिला काडकन आवाज झाला. मधला वासा ओझ्याने तुटला होता. समोरचं दृष्य बघून सर्वाचं काळीज फाटून गेल ओंडका वर आणि त्याच्या खाली हा तरुण. एक भीषण किंकाळी. शेवटची धडपड आणि सारं शात झाल. सर्वजण किंकर्तव्य विमूढ होऊन उभे. इतकी भयानक वेळ आली होती. ओडका छातीवर, त्याने डोळे उघडले, त्याचे ओठ हलले, काहीतरी तो बोलला. बहुधा मला शोधत असावा. हे काम अर्धवट सोडणार नाही असे वचन जणू त्याला पाहिजे होते पण त्या दिवशी मी तिथे नव्हतो,' बोलताना कुवरचे डोळे डबडबून आले.


'सर्वांच्या समोर अधार दाटला होता. त्याचा बाप त्याच्याकडे एकटक बघत उभा होता युवकाच्या पापण्या एकदा उघडल्या. आणि कायमकरता बद झाल्या. हे सारे पाहून एकजण बेहोष होऊन पडला. पण बापाने सान्याना धीर दिला. 'असं धीर सोडून भागणार नाही जे काम अपुरं सोडून हा निघालाय ते आपल्याला पुरं केलच पाहिजे. आणि काही वेळापूर्वी आईच्या हातच्या पुऱ्या सर्वांना खिलवण्याचे बक्षिस लावणाऱ्या आपल्या तरुण मुलाचे शव पित्याने हिम्मत बाधून उचलले लवकरच ते अग्नीने लपेटून भक्षण करून टाकले. ठिणग्या अनताकडे निघून गेल्या आणि थोड्याच वेळात एक राखेचा ढीग मात्र उरला. त्याचा दुर्दम्य उत्साह, कामाविषयी एकनिष्ठा, आणि त्याची त्यागभावना आम्हाला कायम प्रेरणा देत असते आमच्याकडे मुलं १०–१२ वर्षाची झाली की त्याना पैसे कमवायला शहरगावी जाऊन हॉटेलात भाडी धुवायला जावेच लागते. त्यानाही हे उदाहरण सतत प्रेरणा देत राहिले आहे.'

'माझे साथी सागतात की त्या जगलात एक पाखरू आवाज देत म्हणे खबरदार, खबरदार, बढते रहो, बढते रहो, रास्ता मील जायेगा !' कुवरचा गळा परत भरून आला.

ऐकता ऐकता साहेबाचे डोळेही भरून आले अंधार पडायला लागला होता. साहेबानी जेवण करायला सागितल होत. त्यामुळे नाईलाजाने कुवरला तिथे बसणे भाग होते. पण आता दोघातला दुरावाही बराच कमी झाला होता वीस–पंचवीस मिनिटं कोणीच बोलले नाही. साहेबांनी शातता मोडून बोलायला सुरुवात केली, 'तिथे आणखी एक मुलगा होता ना ? तो तुमच्याबरोबरच आहे का अजून ?'

'तो नंतर दोन वर्षांनी फौजेत भरती झाला. हुषार होता तो. कामावर त्याचाही फार विश्वास होता. त्याच्या मनात एकच

होतं की १८ वर्षाचा झाला की सैन्यात भरती व्हायचं. त्या गावी मी नंतर फारसा कधी गेलो नाही. आमच्या मेलेल्या साथी-दाराच्या आईला काय तोंड दाखवणार! पण एकदा जावं लागलं. गेल्या वर्षी आपलं आणि पाकिस्तानचं युद्ध सुरू होतं. लोकात फार उत्साह पसरला होता. आमच्या साऱ्या साथीदारांनी दोन-दोन दिवसाची मजुरी जमा करून माझ्याजवळ दिली की सैनि-काच्या कुटुंबांना त्यातून काही मदत करावी. त्यावेळी तिकडच्या साऱ्या इला-क्यात फिरलो. बरोबर एक-दोन साथी असायचे. मी गावात जाऊन रेडिओवर ऐकलेल्या बातम्या सांगायचो की बांगला देश आता स्वतंत्र होणार आहे. ते ऐकून ज्यांच्या घरातला कोणी सैन्यात असेल त्यांना आनंद व्हायचा.'



'एका गावातली हकिकत ऐकून आम्हाला अचंबा वाटला. एका रिटायर्ड हवालदाराचे चारी मुलगे सैन्यात आहेत. त्यातला एक बेपत्ता झाल्याची तार घरी आली आहे. तो म्हणत होता की तो मुलगा जिवंत असण्याची शक्यताच नाही. पण त्यालाही बातमी ऐकून आनंद झाला. तो म्हणाला मुलगा मेला असेल पण बांगला देश स्वतंत्र तर झाला. नंतर कळले की त्या मुलाला बहादूरीकरिता काही पदके मिळाली. साऱ्या इलाक्यात लोक या विषयी बोलत होती.

आम्हाला कळलं होतं की आमच्या मित्राच्या गावी तार आली होती की तिथल्या एका तरुणाला वीरगती प्राप्त झालीय. दोन दिवसांनी आम्ही तेथे पोचलो. आम्हाला पाहून गावातल्या स्त्रियांनी रुदन सुरू केलं. त्यांना वाटलं की आम्ही सरकारी लोक तारेतल्या बातमीला दुजोरा द्यायला आलो आहोत. आम्ही घराशी पोचलो. तेच ते जुनं घर होतं. सर्व स्त्रियांच्या डोळ्याला धारा लागल्या होत्या. आम्ही अंगणात बसलो होतो, तेवढ्यात वीस-बावीस वर्षाची एक युवती आपल्या छोट्या बालबच्च्यांना घेऊन फुटून फुटून रडत तिथे आली. 'दादा आता या पोरांचं मी कसं रे करू? यांना कशी सांभाळू? माझ्या शेतात आता नांगर कोण धरील?' त्या आक्रोश करणाऱ्या भगिनीला आम्ही काय उत्तर देणार होतो? दहा मिनिटे तर आमचे आश्रू थांबले नाहीत. नंतर आम्ही चौकशी केली, 'तुम्हाला हे कळलं कसं' तेव्हा त्यांनी सांगितलं की त्याच्या आधी दोनदा तार आली होती. पोस्टमनने तार गावातल्या गुरुजींना दिली. गुरुजींनी तार उघडली. तार इंग्रजीत होती. गुरुजींनी त्याचा अर्थ सांगितला की त्याला वीरगती मिळाली. आम्हाला माहिती होतं या गावातले सर्व पुरुष सैन्यात होते. गावात बायाशिवाय कोणी नाही. आम्ही ती तार दाखवायला सांगितली. आम्ही तार वाचली. तिच्यात वीरगतीचा कुठे उल्लेखही नव्हता. फक्त एवढेच होते की तो बेपत्ता आहे. बऱ्याच मुश्किलीने तिची समजूत घातली. तरीही ती हुंदके देत रडतच होती. तारेत नाव होतं आमच्या मित्राचं जो दोन वर्षांपूर्वी आमच्या बरोबर काम करत होता.

आम्ही परत परत सांगितलं की हा दोन वर्षांपूर्वी जगलात आमच्याबरोबर काम करत होता तेव्हा कुठे तिला थोडा विश्वास वाटला. रात्री आम्ही गुरुजींना बोलावून घेतले. त्या बिचाऱ्याला इंग्रजी फारसं वाचता येत नव्हतं. त्याला झालेल्या चुकीबद्दल खूप वाईट वाटत राहिले.

सकाळी निघालो तेव्हा ती भगिनी परत आली. म्हणायला लागली, 'भाईसाहेब, तुम्ही तर देवासारखे इथे आलात. तुम्ही ही गोष्ट सांगितलीत म्हणून नाही तर या कच्चाबच्च्यांचं मी कसं करणार होते? तुम्हाला तर या साऱ्या भागाची माहिती आहेच. इथं शेतीला पाणी नाही की चांगली उपजाऊ जमीन नाही. कितीही मेहनत केली तरी फारसं काही पिकत नाही. अशा परिस्थितीत आमच्या फुटक्या नशिबाला दोष देण्यापलिकडे आम्ही काय करू शकतो? आईबापांना दोष लावत बसतो की त्यांनी जन्माला घातलं, आमचं लालनपालन का केलं?'

आम्ही गाव सोडून खाली सडकेवर जाऊन पोचलो तरीही ती भगिनी आपल्या एका लेकराला कडेवर घेऊन आणि एका लेकराला हाताशी धरून तशीच उभी होती. आम्ही वरती पाहिले की ती आम्हाला हात जोडायची. तिचे शब्द आमच्या कानात घुमत राहिले.

नंतर पंधरा दिवसांनी जेव्हा खरी बातमी आली आणि गावचा पटवारी सांगण्याकरिता त्या गावी गेला तेव्हा त्या अभागिनीला पटेना की पटवारी तिला खरी बातमी सांगतो आहे. ती रडत रडत त्याला सांगत राहिली. 'तुमच्याकडची तार मला द्या. मी भाईला ती वाचून दाखवायला सांगीन.'

बराच वेळ परत शांततेत गेला. जेवणाची ताट वाढलो होती. कुंवर परत बोलू लागला. 'तुमची जी काही व्यवस्था आहे ती काय आम्ही गप्प बसून सहन करावी का? तुम्ही बघता आहात की दर वर्षी गावेच्या गावे वाहून जातायत. तुम्ही इथे काही वर्षं

आहात, तुम्ही तर ऐकलेच असेल की हे गाव दबलं गेलं, त्या इलाक्यात जनावरे मेली, भूस्खलन झाले. आम्ही ऐकून आहोत की जपानमध्ये इतके भूकंप होतात की लोकांना बांबूची हलकी घरे बनवायला लागतात. पण आपले वरिष्ठ लोक कधी जागे होणार? सगळे पहाड कोसळल्यावर? दरवर्षी पहाडातून पाण्याचे महापूर गंगा, यमुना आणि कालीमधून वाहतात, देशाचं कोट्यावधी रुपयाचे नुकसान होते. ही काय इंद्राची करामत आहे का माणसाची? लिलावात जंगलाच्या किम्मती वाढवून स्वत:ची एकाधिकारशाही जंगलावर बसवून मग जंगलाची सफाचट करणाऱ्या या अधाशी कंत्राटदाराची ही करणी नाही का?' कुवर चिडून चिडून भराभरा बोलत होता. 'चीडच्या झाडावर खोलवर घाव घालायचे, जास्तीत जास्त लिसा त्यातून काढायचा, झाड पोकळ करून टाकायचं आणि हा लिसा जास्तीत जास्त धनिक, मालदार ठेकेदाराना मिळवून द्यायचा या पद्धतीचा शोध लावणाऱ्याची ही करामत नाही?

कोणाची आहे ही करणी? ज्यांनी गावागावाचे हकहकूक (जंगलाचे हक्क) काढून टाकले आणि लोकांना रोज लागणारा लाकूडफाटा चोरून आणायला लावला. तो आणताना मग लोक कसेही अनापशनाप तोड नाइलाजाने करतात. दोष त्याचा नाहीये.

इथल्या स्थानिक लोकांना रोजगार द्यायला हे असमर्थ ठरले आहेत. जंगलाच्या जवळ रहाणारे लोक जंगलाचे मित्र व्हायच्या ऐवजी शत्रू बनण्याचे हे एक कारण आहे याची तुम्हाला कल्पना आहे का?'

त्याचा स्वर हळूवार झाला. 'तुम्हाला आणखी किती सांगू? तुमच्या चुकीच्या धोरणामुळे जंगल बेबंदपणे तुटतय, त्यामुळे नद्याना पूर येतायत, आमची गावे, शेतीवाडी घरंदार वाहून जातायत. तुमच्याच पाठिंब्याच्या जोरावर ठेकेदाराच्या कुऱ्हाडी झाडावर खरं तर आपल्या पोटावर पडतायत. तुम्ही लोकानी याचा विचार केला आहे की कधी की याचा शेवटी परिणाम काय होणार आहे. आज तर ठेकेदार, सरकारी कर्मचारी आणि गाववाले सगळे एकजुटीने झाडाचा विनाश करायच्या मागे लागले आहेत; पण हा जंगलाचा विध्वंस आम्हाला कधीही माफ करणार नाही. तुम्ही बघा, जेव्हापासून हा जंगलाचा नाश सुरू झालाय तेव्हापासून ही विनाशलीला सुरू झाली आहे.'

साहेबाचे डोळे जड व्हायला लागले होते. ते म्हणाले. 'भैया तुम्हा असं सांगताहात की दोषी फक्त आम्हीच आहोत. यात दोषी फक्त आम्ही आहोत हे मान्य. काही वेळा अशा काही योजना सुरू केल्या जातात, दूरगामी परिणामाचा विचार अगोदर केला जात नाही जेव्हा असे परिणाम लक्षात येतात तेव्हा ती थांबवता येते. झाडं कापण्याविषयीची गोष्ट बाजूला ठेवा. पण जेव्हा एकाद्या झाडाचं आयुष्य भरतं तेव्हा त्याला तसच सडायला ठेवायचं की कापून त्याचा उपयोग करायचा? देशाच आणि जंगलाच नुकसान होऊ द्यायच का? आम्हा लोकांची नेमणूक शेवटी जंगल संवर्धनाकरिताच केलेली आहे. जंगल वैज्ञानिक दृष्टीकोनातून कापावे कसे, छाटावे कसे एवढ्याकरिता आम्हाला दोन वर्षांचे प्रशिक्षण दिले जाते. आम्ही योजना अशा प्रकारे बनवतो की जंगलपण राहील आणि आर्थिक नुकसान पण होणार नाही. तस पाहिल तर आमच्या दृष्टीनेही ही संपत्ती आहे. आमच्या उपजीविकेच हेच एक साधन आहे.' साहेब बोलत होते पण झोपेने पेंगुळले पण होते.

'पण तुम्ही तर सर्व दोष आमच्यावरच घालताहात. पहाड कुदळ-टिकावाने खोदला म्हणून भूस्खलन झाले हे मान्य करू. पण जंगल तुटलं म्हणून पुर आले हे मी प्रथमच ऐकतोय. अरे, आम्ही काय निसर्गापेक्षा ताकदवान झालो काय? जरा काही विचार तर कराल, काय देशसेवा फक्त तुम्हीच करत असता. आमच्या मनात देशसेवेला काही स्थानच नाही का? तुम्हाला काय वाटतं की आम्ही अगदी हृदयहीन आहोत? अरे भैया, तुमच्या एवढं नाही पण थोड तरी प्रेम आमच्या मनात असेल की नाही. इंद्राचा कोपही आमच्याच माथी मारता आहात तुम्ही म्हणजे तुम्ही आम्हाला इंद्र बनवायला निघाला. म्हणजे साऱ्या निसर्गावर आमचाच अधिकार झाला म्हणायचा. जं मनाला येईल ते आम्ही करावं नाही का? कोणाचा विकास तर कोणाचा विनाश. म्हणजे फारच मोठे झालो आम्ही म्हणायच. तेव्हा आता तुम्ही लोकही आमच्यापासून सावध रहा' साहेब मंद स्मित करत म्हणाले. 'भैया, अशी पोरकट भाषा सगळ्याजवळ वापरू नका. मीही तुमच्यातलाच एक आहे, इथलाच आहे.'

कुवरही चिडून बोलला, 'यासाठीच का इतकी...'पण बोलणं तसंच अर्धवट टाकून तो गप्प झाला.

साहेबानी पुढे सुरू केल, 'हां, तुमचं ते रोजगाराविषयीच म्हणण न्याय्य आहे. इथल्या लोकाना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी आम्हीही खटपटीत आहोत. आमच्याकडे तुम्ही या. आमचा दरवाजा तुमच्यासाठी खुला आहे या कामात आमच्याकडून तुम्हाला पूर्ण मदत मिळेल. आम्हालाही डोळे आहेत, कान आहेत. आम्हीही बघत असतो, ऐकत असतो. चागलं काम करणाऱ्यांना जरूर प्रोत्साहन मिळेल. पण लक्षात ठेवा. नुसती बडबड करणाऱ्यांना...

'हे बघा, शेवटी ठेकेदारीची पद्धत तर रहाणारच आहे. ती कोण नष्ट करू शकणार आहे? ती नाही तर कामं कशी होणार? पाय जमिनीवर ठेवून काय ते बोला. हवेत तरंगत राहिलात तर त्याचा परिणाम काय होईल माहीत आहे? लोक वेड्यात काढतील तुम्हाला वेड्यात.' टोमणा मारून साहेब हसले.

'वेडा... अच्छा, काही चुकल तर माफ करा तुमचा अमूल्य वेळ मी घेतला. आपण पाहुणचार केलात त्याबद्दल आभारी आहे' कुवर ताडकन बोलून निघाला. साहेबानीही धाडकन दरवाजा लावून घेतला. कुवर सपासप दोन मैल अंतर काटून कँपवर आला. विचारात रस्ता केव्हा संपला त्याला कळलेही नाही.

ठेकेदाराचे मजूर बसची वाट पहात होते. बसला अजून एक तास होता. त्याच्याजवळ कुऱ्हाडी, करवती आणि दोन पोती राशन दिसत होतं. कुवरहो जंगलात जाण्याच्या तयारीने तेथे जाऊन पोचला. त्याने ऐकले होते की कोण्या ठेकेदाराचे मजूर आज जंगल कापायला चालले आहेत. मजुराना पाहून तो वरच्या स्वरात म्हणाला, 'मी तुम्हाला जंगलतोड करू देणार नाही तुमच्या कुऱ्हाडी माझ्या अंगावर पडल्या तरी चालतील; पण काही झाल तरी मी जिवंत असताना झाडा-

वर कुऱ्हाड पडू देणार नाही ' विचारे मजूर हे ऐकून गडबडून गेले. तोवर कुवरचे दहा-बारा साथीही तेथे आले. मजुरांकडे इशारा करून ते म्हणत होते, ' या कुऱ्हाडी झाडावर कधीही पडू देणार नाही आम्ही. कुऱ्हाडी-समोर आमची पाठ असेल.

बस येऊन थाबली. मजुराना काही कळत नव्हत की आज हे अस काय झालय. शंभर मैल दूरवरून त्याना आगाऊ पैसे देऊन ठेकेदाराने आणले होते. त्यानी विचार केला कशाला पडायचे या भानगडीत. मग त्या बसने त्याच्यातला एक जण जगलात मुकादमाला बोलदायला म्हणून गेला. बाकीचे तिथेच थाबले. सर्वत्र अस्वस्थता पसरली. सध्याकाळी मुकादमही येऊन पोचला. त्यालाही कळेना की ही काय गडबड आहे. तो सरळ अधिकाऱ्याकडे गेला. त्याने सारी हकिकत अधिकाऱ्याच्या कानावर घातली अधिकाऱ्यांनी मुकादमाची टर उडवली की मजुराना काही तर स्वप्न पडलं असेल. असं कधी होत का ?

मुकादम एका मजुराला घेऊन कॅपवर आला. कुवरच्या साथीदारावरोबर त्यानी चर्चा केली. साऱ्यानी त्याला बजावले, ' कोणत्याही परिस्थितीत झाडं कापू दिली जाणार नाहीत. कुऱ्हाडी चालवायच्या झाल्या तर प्रथम आमच्यावर आणि मगच झाडावर आणि पाठ एक नाही, दहा नाही तर शेकडो आहेत जर तयारी असेल तर या जगलात. '

' तुमच्या मजुराबरोबर आम्हीही जाऊ जगलात. आमच तुमच्याबरोबर काही भाडण नाही. ज्या झाडाविषयीचे हुकूम आणि परवानगी तुमच्या खिशात आहे ती झाडं आम्हाला वाचवायची आहेत. '

' जर तुम्हाला आमच्या पाठीवर कुऱ्हाडी चालवायच्या नसतील तर तुम्ही तुमच्या ठेकेदाराकडे वापस जा. आणि सागा की लोक झाडे तोडू देत नाहीयेत म्हणून. अधिकाऱ्याबरोबर ठेकेदाराचे साटलोट असत. तुम्ही कशाला या झगड्यात पडताय ? कुवरचे बोलणे मुकादमाच्या लक्षात आले मुकादमाला ठेकेदारापर्यंत पोचायला तीन दिवस लागले. ठेकेदाराच पत्र घेऊन मुकादम अधिकाऱ्याकडे आला. लोकानी अशाप्रकारे उद्धटपणा करून मजुरांना अडवून त्याचे पाच दिवसांचे केलेले नुकसान लोकानी भरून द्यावे अशा अर्थाचे ते पत्र होते

या दिवसात कुवरचे साथी आपापल्या गावी गेले होते. लोकाना त्यानी झाली हकिकत सागितली आणि तीन दिवसानी एक मध्यवर्ती ठिकाणी पुढच्या निर्णयाकरिता सभेला एकत्र यायचे आमत्रण दिले.

गावकऱ्यांना जगलची पूर्ण माहिती असते. कोणत्या प्रकारची किती झाड जगलात आहेत याची मोजदाद त्याच्याकडे असते. आपल्याला लागणारी लाकडाची गरज त्याना माहिती असते. पण वनअधिकाऱ्याच्या हुकुमानुसार त्यांनी स्वत.ची गरज एक झाड पूर्ण आहे असे ठरविले दुसरा *मार्ग* लोकांनी चोखाळला होता. तो वनखात्यानेच त्याना चोखाळायला भाग पाडले होते. वनकर्मचाऱ्याच्या नजरा चुकवून आपल्या गरजांकरिता लाकूड चोरून आणायचे. वनखात्याच्या वनविज्ञानातून ते शिकले होते– शिकणं भाग पडल होत. असे लाकूड आणताना ते पकडले गेले की कायद्यात ते चोर ठरतात; पण पिढ्यापिढ्या त्याच्या जगलातून लाकूड मिळवण्याच्या त्यांच्या हक्काला ते हकहळूक मानीत.

परंतु जंगलखात्याच्या हुकमतीखाली जसजशी आणखी आणखी जगले आली तसतसा तणाव वाढत चालला. लोकाचे म्हणणे होते की आम्ही पूर्वीपासून जगलातील लाकडाचा वापर करतो आहोत. झाडाची एकनएक डहाळी आम्ही कामात लावतो. एका झाडापासून तीसचाळीस नागर आम्ही बनवत होतो पण या वनखात्याचे नियत्रण आल्यापासून सारे बिघडून गेले आहे. सारे चोरून मारून करावे लागतेय. आता त्याच झाडापासून आम्ही जेमतेम चारसहा नांगर बनवतो आहोत सारा चोरीचा मामला मग वेडीवाकडी वृक्षतोड आमच्या हातून होत असते यामुळे झाडाचा सत्यनाश होतोय. पण आम्ही सरळ सरळ मागितले तर आमच्या तोंडावर याचे वनविज्ञान मारले जाते.

हे कसल वनविज्ञान. एकीकडे आम्हाला सागायचं की आम्हाला वर्षाला एकाला एकच झाड मिळेल तर दुसरीकडे ठेकेदाराला एकाच वेळेला ही इतकी झाडं तोडायला परवानगी द्यायची. इथे अचानक मग झाडाची सख्या तर नाही ना वाढली ? आज याचं एक वनविज्ञान तर चार महिन्याने दुसरेच. हे काय वनविज्ञान आहे का ? चीडच झाड परिपक्व व्हायला नव्वद वर्षं लागतात. अंगुला साठ, देवदाराला शंभरावर लागतात.

असले दुटप्पी धोरण नाही चालणार. वनवासी लोक आम्ही आता अशी उपेक्षा सहन करणार नाही.लोकाच्या सभेत याविषयी बराच विचार झाला जर उपेक्षा सहन करायची नाही तर प्रतिकार कशाप्रकारे करायचा ? एकाने मांडले की ठेकेदाराने तोडण्याकरिता ज्या झाडावर छाप मारले आहेत ती झाडे आपणच तोडूया दुसरा म्हणाला, त्याहून जास्त झाडे आपण तोडूया. काय करतील आपल्याला ? पकडतील ना ? पकडू देत बऱ्याच लोकाचं म्हणणं पडल की झाड तोडून ठेकेदार ट्रकवर लादून निघतील तेव्हा त्याना रोखूया. ट्रकसमोर आडवे पडू.' एक सरपच मधेच म्हणाले ' आपण झाड वाचवायला निघालो आहोत. त्याच रक्षण करायला निघालो आहोत. मार्ग असा काढायला हवा की काही करून झाडे वाचतील.'

मग एक निवेदन तयार झाले. त्यात ही गोष्ट स्पष्टपणे माडली होती.

आम्हाला नाइलाजाने सत्याग्रहाचा मार्ग पत्करावा लागतो आहे. आमचे आदोलन पूर्णपणे शाततामय असेल. आणि त्यात आम्ही सर्वात जास्त महत्त्व वनसरक्षणाला देतो आहोत. आमच्या या शाततामय आदोलनात आम्ही झाडाचे रक्षण करणार आहोत. कत्राटदाराना तोडायची परवानगी देऊन जी झाडे छापली जात आहेत ती त्याना तोडता येऊ नयेत म्हणून त्या झाडांना आम्ही चिपकून बसून कुऱ्हाडीचे घाव स्वत झेलणार आहोत. याकरिता जे कष्ट होतील ते आम्ही सहन करू.

लोकाना वाटले की वनाच्या प्राण रक्षणाचा हा एक नवीन मंत्रच आपल्याला मिळाला आहे. सर्वानी उत्साहाने त्या निवेदनावर सह्या केल्या. एक सरपच म्हणाले आज सर्व राजकीय पक्ष इथे एकाच घाटीतलं पाणी पितायत कारण सगळ्याना माहित आहे हे पाणी शेवटी जगलातूनच येतय.

नंतर सर्व सरपंचांनी आपापल्या गावाची बारी जंगल रक्षणाच्या कामाकरिता लावून घेतली. कुवर आणि त्याच्या साथीदारावर

सर्व गावाशी संपर्क ठेवून हालचाली कळवण्याची जबाबदारी सोपवली गेली.

दुसऱ्या दिवसापासून सर्व गावातून सभांचे सत्र सुरू झाले. लोक टोळघाटोळघाने जंगलाकडे निघाले. जंगलातले ते पाखरू ओरडे, 'खबरदार, खबरदार, जागते रहो' त्याच्या आवाजात साऱ्यानी आवाज मिळवला. जंगलात तो आवाज घुमत राहिला.

अधिकाऱ्याना चिंता वाटायला लागली. त्याची धावपळ सुरू झाली. वरिष्ठ अधिकाऱ्याना तार, टेलिफोन, इतकेच काय पण वायरलेसने माहिती पुरवली गेली. पण सर्वच अधिकारी घाबरलेले होते. झाडे तोडण्याकरिता जोरजबरदस्तीचा मार्ग कोठपर्यंत चालणार ? धाकदपटशा दाखवून काम केले तर त्याचे परिणाम विपरीत होऊ शकतात.

स्थानिक अधिकाऱ्याने त्याचा चौकीदार कुवरला बोलावण्याकरिता पाठवला. भेटून काही उपयोग होणार नाही म्हणून कुवरने नकार दिला जर आमचे म्हणणे मान्य असले तर गावोगाव तसे स्पष्ट कळवून टाका. लोकाचा वेळ वाचेल. रोजची कामे सोडून त्याना जंगलात उगाच जायला नको. थोड्याच वेळात टेलिफोन खणाणला कुवरचा टाळण्याचाच विचार होता पण शेवटी त्याने फोन उचलला.

लोकाना नाइलाजाने हे पाऊल उचलायला लागते आहे. तुमच्या वनविज्ञानाचे पालन तुम्ही करावे म्हणून हे सारे करायला लागते आहे. खरे तर तुम्हाला यात आनद वाटायला हवा होता, की लोक स्वत:चा कामधदा सोडून जे काम तुमचा वनरक्षक करू शकत नाहीये ते करायला बाहेर पडले आहेत. खर तर या लोकानाच मी अरण्यपाल म्हणेन. तुम्हाला यात काळजी करण्यासारखे काही नाही.

अधिकाऱ्यानी कुवरला सागितले की ती झाडे तर तोडली जाणार नाहीतच, त्यांची फोनवर वरिष्ठाशी चर्चा झालीय. शिवाय गावकऱ्याच्या ज्या काही मागण्या असतील त्या स्वीकारण्याचे आदेश आलेले आहेत. म्हणून या सबंधात तुमच्या ज्या काही मागण्या असतील, किती झाडाची तुम्हाला आवश्यकता आहे त्याची यादी करून पाठवून द्या. कुवरने उत्तर दिले की वनविज्ञानात आत एक आणि बाहेर एक असे नियम नसतात. गावकऱ्यानी आन्दोलन एवढ्याकरिता नाही सुरू केले की झाडावर डेहराडूनवाल्याच्याऐवजी गावकऱ्याच्या कुऱ्हाडी चालाव्यात कुऱ्हाडी कोणाच्याही असल्या तरी त्या झाड तोडण्याचेच काम करणार. कुऱ्हाडीसमोर झाड आणि पोट सारखेच आहे. आभार मानून त्याने फोन खाली ठेवला.

अतिशय खबरदारी घेऊन गुप्त रीतीने तेथून साठ मैलावर जंगलात झाडावर तोडण्यासाठी छाप मारण्याची व्यवस्था झाली होती पण सगळीकडे बातमी पसरवली होती की झाडे तोडायला आलेल्या मजुराना माघारी पाठवले जात आहे त्याचे पैसेही परत घेतले आहेत. अधिकाऱ्यानी काम इतक्या सावधपणे केले होते की तिकडची बातमी इकडे कळली तोपर्यंत मुकादम आणि वनरक्षक झाडावर छाप मारून परत निघाले होते. जंगलाचा सर्वनाश करण्याची ही खबर सगळीकडे पसरली. अधिकाऱ्यानी आपल्या अखत्यारीत छाप मारून दिले, आणि तुमची हिम्मत असेल तर तोडा असे ठेकेदारावर पुढचे त्यानी सोपवून दिले गाववाले आणि ठेकेदाराच्या मजुराचा लपाछपीचा खेळ सुरू झाला.

सहा महिन्यानी एके दिवशी अचानक शखाचा आवाज घुमला. पहाडाच्या कड्यावरून रणभेरीचा आवाज उठला गावकरी बायापुरुष जसे होते तसे जंगलाच्या दिशेने निघाले. तोपर्यंत सर्व मजूर भीतीने पळून गेले होते. छापलेल्या बत्तीस झाडांपैकी दोघांची कत्तल झाली होती आणखी दोन वृक्षावर दहावीस घाव पडलेले होते. कित्येक दिवस त्या झाडांवर गावकऱ्याचा पहारा चालू होता. अधिकारी अरण्यकाळ नसून आता अरण्यपाल बनले आहेत अशी खात्री होईपर्यंत पहारा चालूच राहिला.

सतत या गावावरून त्या गावी अशी धावपळ चालू होती. सहा महिने झाले मजुरी करून कमवायला जमले नव्हते. सर्व साथीदाराची हालत खराब झाली होती. साठवलेली पुंजी केव्हाच सपून गेली होती अधिकाऱ्याच्या हालचालीमुळे परिस्थिती दिवसेदिवस बिकट होत होती. कित्येक दिवशी घरातून चूल एकदाच पेटत होती. कुवरचे साथीदार परिस्थिती हिम्मतीने निभावत होते पण परिस्थितीचे चटके त्याच्याबरोबर घरच्यानाही बसत होते

एका साथीदाराची पत्नी खूप आजारी झाली होती बिचारी दवाखान्यापर्यंत यायच्या परिस्थितीतही नव्हती. खूप खटपट करून डॉक्टरच्या फीपुरते पैसे जमत नव्हते. कुठेही मोलमजुरीही मिळत नव्हती.

इतके दिवस या विषयावर बोलायचे साऱ्यानी टाळले होते. पण शेवटी चर्चा करणे अपरिहार्य झाले. चर्चेअती सर्वांनी निर्णय घेतला. चागल्या दिवसात आपण एक दुसऱ्याची साथ दिली आता वाईट, सकटाचे कष्टाचे दिवस आले आहेत. आता तर साथ द्यायलाच हवी आता मरायचे झाले तर एकत्रच मरू.

मोहनकडे बघून जाणवत होते की त्याला घरी जाण्याची ओढ लागली आहे. कुवरने त्याला सागितले तुला जायचे असेल तर तू जाऊ शकतोस. आपल्या सर्वात तुझी घरची परिस्थिती सर्वात खराब आहे. तुला जेव्हा वाटेल तेव्हा तू परत ये. आमचे दरवाजे तुला नेहमीच खुले असतील. मोहनच्या डोळ्यात पाणी उभे राहिले त्याला राहवले नाही. तो उठून गेला. तो निघाला तेव्हा वाटत होते की बऱ्याच दिवसांकरिता हा निरोप घेतो आहे. अलिकडे तो मित्राना म्हणत असे की परिस्थिती सहन करण्यापलिकडे गेली होती. कामधंदा मिळवण्यासाठी त्याने दिल्लीला जायचे ठरवले होते

टोळीतील आणखी एक साथीदार निघून गेला. एका पुढाऱ्याने त्याला सागितले, 'तुम्ही या असल्या चुकीच्या कामात फसू नका. आज तुम्ही म्हणता की झाडे कापू नका, कारण झाडे तुटल्याने पूर येतात, जगले साफ होतायत. ठेकेदाराना जगलात येऊ देऊ नका. याचा परिणाम काय होईल याची काही कल्पना आहे का तुम्हाला ?' आणि मग उत्तराची वाट न बघता तो पुढे बोलला होता, 'असेच चालू राहिले तर उसवाला शेतकरी म्हणेल आम्ही गुळ देणार नाही, लोखडाच्या खाणीवाले म्हणतील आम्ही लोखड देणार नाही तर बघा काय प्रसंग ओढवेल किती अविचार आहे हा ! तुम्ही विचार केलाय का की देशातले लोक तुम्हाला काय म्हणतील ? तुम्हा लोकाची काय लायकी आहे ? शेवटी घरी जे काही आह तेही गमावून भीक मागायची वेळ येईल.' त्यानी लाबलचक भाषण दिले

त्यानी इतरानाही प्रभावित करण्याचा प्रयत्न केला पण इतरावर काही परिणाम होऊ शकला नाही. सर्वांच्या तोंडी एकच भाषा होती, जगायच तर तेही एकजुटीने आणि मरायच तर तेही एकजुटीनेच. त्यांनी प्रभाव पाडण्याचा खूप प्रयत्न केला, प्रचारही बराच करून बघितला पण आता गावकरीही त्याना निरुत्तर करत असत.

(अपूर्ण)

तुरुंगात जाणे त्यांना मंजूर नव्हते.

यानंतर माधवराव इतर सामाजिक कार्यात गढून राहिले. मिश्र विवाहांना आशीर्वाद देण्यासाठी ते अगत्याने उपस्थित राहायचे. मराठा–ब्राह्मण, मराठा–अस्पृश्य, मराठा–अन्यजाती आदी विवाहांना त्यांचे आशीर्वाद असायचे. त्यांच्या नातेवाईकांना ते पसंत पडायचे नाही. एकदा तर खुद्द राजाच्या नापसंतीची पर्वा न करता माधवरांव पुढाकार देण्यासाठी उपस्थित राहिले होते. आपल्याला पटते ते बिनदिक्कत करायचे हा त्यांचा स्वभावविशेषच होता.

'क्षात्र जगद्गुरू' हे शाहू महाराजानी निर्माण केलेले पीठ. माधवरावांच्या समाजवादी वृत्तीला कोणतेच पीठ मान्य नव्हते मग ते ब्राह्मणांचे असो की मराठ्यांचे. माधवरावांच्या टीकाप्रहारात क्षात्रजगद्गुरू सापडले. संस्थानात त्यांच्यावर टीका करण्याचे धाडस दुसरे कोणी करणे शक्य नव्हते. जगद्गुरूंनी 'भाई' लोकांवर टीका करताच भाई माधवरावांनी अस्त्र परजले–

'गुलामगिरी शेंडीवाल्या भटाकी जाऊन तेथे पटकेवाल्याची आल्याने खालच्या समाजाचा काही फायदा होण्यासारखा नाही. म्हणून ही सर्वच पीठे नष्ट झाली पाहिजेत.'

क्षात्रजगद्गुरू पिठाचे उत्पन्न स्वतःसाठी वापरत. त्यांचे राजविलासी बंगले होते. संस्थानकालात महाराजांना खूष करण्यासाठी स्वातंत्र्यचळवळीला विरोध आणि संस्थाने विलीन झाल्यावर राजांना टाकून काँग्रेसशी हातमिळवणी.

माधवरावांना ते रुचणारे नव्हते.

### लोकनेता

पण तोपर्यंत राजकीय विषयांनी त्यांचे लक्ष दुसरीकडे गेले. सभाबंदी उठावी म्हणून त्यांनी आतापर्यंत खूप अर्ज, ठराव केले होते; पण काही जमले नव्हते. आता त्यांनी त्यावर ठोस उपाय करायचे ठरवले. पण त्यांच्या मनाचा निश्चय होत नव्हता. एक तर बायको क्षयाने आजारी. दुसरे भाऊ विभक्त. प्रथम त्यांनी बायकोची परवानगी घेतली. सौभाग्यवती बागल धीराच्या होत्या. नवऱ्याच्या वाटेत यायचे नाही असा त्यांचा निर्धार. त्यांनी माधवरावांना प्रगतीकडे, सत्याग्रहाकडे, तुरुंगाकडे जायची परवानगी देऊन टाकली.

माधवरावांचे मन निर्धास्त झाले.

सारा कमी करावा या मागणीसाठी शिरोळ पेट्याच्या शेतकऱ्यांनी मिरज घाटावर सभा घ्यायचे ठरवले. कोल्हापूर संस्थानच्या बाहेर. पण लोकांचा जमाव पाहिल्यावर मिरज सरकारनेसुद्धा सभाबंदी केली. माधवरावांनी सभा मिरज हद्दीच्याही बाहेर घेतली. आपल्या मागण्यांसाठी घरादारांवर तिलांजली देण्याची पाळी आली तरी डगमगणार नाही अशा अर्थाच्या शपथा शेकडो शेतकऱ्यांनी घेतल्या.

माधवरावांच्या मागे संस्थानचे पोलीस लागले. पण माधवराव शेतकऱ्यांच्या सहाय्याने पोलिसांना चुकवत खेडोपाडी सभा घेत. आपल्या मागण्यांसाठी हा अविश्रांत लढा त्यांनी आता आरंभिला होता.

माधवरावांनी कोल्हापूरला येऊन कायदेभंग करायचं ठरवलं. ते ज्या गाडीतून चालले होते ती गाडी सत्याग्रहींनी भरली होती. प्रत्येक स्टेशनवर त्यात भर पडत होती. माधवरावांचा जयघोष चालला होता. एखाद्या देवाप्रमाणे माधवरावांवर प्रेमाचा वर्षाव चालला होता. आपल्यासाठी माधवराव तुरुंगात जातायत या भावनेनं गोरगरीब शेतकऱ्यांची हृदये भारावून गेली होती.

कोल्हापूर स्टेशनसमोरच्या पटांगणात माधवरावांनी शेतकरी आणि कोल्हापूरकर विद्यार्थ्यांसमोर एक भाषण दिले. शेतसारा कमी करावा, भाषणस्वातंत्र्य आणि मुद्रणस्वातंत्र्य द्यावे, लोकांनी निवडलेल्या व्यक्तींचं सरकार आणावं या मागण्या त्यांनी मांडल्या. छत्रपतींच्या गादीबद्दलचा आदर व्यक्त करून ते म्हणाले–

'छत्रपतींची प्रजा म्हणजे जनावरे नसून, त्यांना माणुसकी आहे म्हणून माणुसकीचे हक्क आम्हाला द्या. हे मागण्यास आम्ही आलो आहोत.'

सभा संपल्यावर मोर्चा निघाला.

थोड्याच वेळात माधवरावांना अटक करून सेंट्रल जेलकडे नेण्यात आले. यथावकाश त्यांच्यावर खटला भरण्यात आला. माधवरावांच्या अटकेनंतर पुन्हा मोर्चे निघाले. या मोर्च्यांना महाराजांनी काही आश्वासने दिली आणि त्यानंतर माधवरावांना वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले. माधवरावांना महाराज म्हणाले, 'बागल, तुम्ही राजनिष्ठ आहात की नाही ?'

त्यावर बागलांनी स्पष्ट केले की छत्रपतींची गादी आणि छत्रपती यांचेबद्दल त्यांना पूर्ण आदर आहे. फक्त लोकांवरचा अन्याय दूर व्हावा एवढीच त्यांची मागणी आहे.

महाराज आणि इतर यांच्याबरोबर बराच वेळ चर्चा केल्यावर माधवरावांची मुक्तता झाली. महाराजांच्या वागण्याने माधवराव भारावून गेले होते. त्यांच्या स्वभावात भावनाविवशता हा गुण किंवा दोष प्रकर्षाने होता. एकाच वेळी ते राजनिष्ठ होते, समाजवादी होते, प्रजानिष्ठ होते.

सुटकेनंतर बागल कोल्हापूरच्या गळ्याचे ताईत बनले. त्यांची लोकप्रियता शिगेला जाऊन पोचली होती. ठिकठिकाणी त्यांचे सत्कार झाले, मिरवणुका निघाल्या.

सभाबंदी उठल्यामुळे त्यांना आता खुल्या सभा घेता येऊ लागल्या. आता माधवराव सभेला आले म्हणजे 'बागल महाराज की जय' च्या घोषणा होऊ लागल्या होत्या.

माधवरावांनी शब्द टाकला तर अख्खे संस्थान पेटून उठावे अशी ताकद त्यात आता आली होती. कोल्हापुरात एवढी लोकप्रियता कोणाला मिळाली नव्हती.

आपल्या कार्याने ते कोल्हापूरचे नेते बनले होते. संस्थानी सत्तेला नमवणारे नेते.

¤

माधवरावांना खेडोपाड्यांच्या सत्कारात अनेक थैल्या दिल्या होत्या. या त्यांनी रत्नाप्पा कुंभार यांच्या हवाली केल्या. संस्थानभरच्या लोकांचे प्रेम पाहूनच माधवरावांच्या मनात 'प्रजा परिषद' ही संकल्पना जन्मास आली.

शेतकऱ्यांना गदगदून येईल अशी भाषा माधवराव वापरीत.

'बाबा, दुनियेचा खरा मालक तूच आहेस. खरा देव तूच आहेस.

राजांचा राजाही तूच आहेस. सर्व दुनिया केवळ तुझ्या श्रमावर जगत आहे. तुझ्या मदतीविना कोणालाही जगता येणार नाही. तू व्याज दिलेस तर सावकार जगणार. तू खड दिलास तर जमीनदाराची बडदास्त चालणार. तू कर दिलास तर राज्याचा गाडा सुरळित चालणार. शिक्षणाचा खर्च तू चालवतोस. सगळ्याच्या उड्या तुझ्या जीवावर. सर्वांचा दाता, रक्षणकर्ता, अन्नवस्त्र पुरवणारा पोशिंदा, तूच खरा परमेश्वर ! पण तुझी ओळख तुला नाही.'

हे ऐकून एका मुसलमान शेतकऱ्याला भावनावेग आवरला नाही. 'ओय् खुदा ! ओय् खुदा !' म्हणत तो माधवरावांच्या पायावर पडला.

काही ठिकाणी दंगा धोपयाचेही प्रकार घडत. पण माधवरावांच्या मागे अथाग जनसागर असल्याने त्यांचा केसही वाकडा झाला नाही.

महाराजाचे मतही त्यांच्याबद्दल कलुषित झालेले होते. सभोवतालचे हुजरे त्यांचे कान भरीत.

३९ च्या सुमारास प्रजा परिषद स्थापन झाली. जयसिंगपूरला पहिली सभा झाली तेव्हाच माधवरावांवर राजद्रोहाचे कलम बजावून त्यांना अटक करण्यात आली.

माधवरावांच्या अटकेची बातमी वणव्यासारखी पसरली. संस्थानचे वातावरण प्रक्षुब्ध बनले. संस्थानच्या पोलिसांनी दहुकेशाही आरंभली.

माधवरावावर राजद्रोह शाबीत झाला. संस्थानच्या प्रजेला भडकावणे, आपल्या न्याय्य हक्कासाठी झगडायला लावणे, लोकशाहीची मागणी करणे या गुन्ह्यासाठी त्यांना दोन वर्षे सक्तमजुरी आणि १००० रु. दंड झाला.

माधवरावांची ताकद संस्थानच्या ध्यानात आली होती आणि नव्हतीही. त्या एका शिक्षेने माधवरावांची कीर्ती वाढली. प्रजापरिषदेची मुळे खोलवर रुतली आणि संस्थानच्या कारभाराला प्रतिशह निर्माण झाला. लोकाना अन्यायाची जाणीव झाली.

माधवरावांना शिक्षा झाली. त्याच्या निषेधार्थ कोल्हापूर बंद झाले. जागोजागी बागलांचा जयजयकार ऐकू येऊ लागला.

माधवराव तुरुंगातही स्वस्थ बसले नाहीत. तुरुंगाची स्थिती सुधारावी म्हणून त्यानी तेथे उपोषण केले आणि काही सुधारणा त्यांनी घडवून आणल्याही.

दोन वर्षे संपायला काही दिवस उरले असताना महाराणी ताराबाईसाहेब यांच्यामुळे राजबंद्याची सुटका झाली.

सुटकेनतरच्या पहिल्या सभेत माधवरावांनी पुन्हा एकदा मागण्यांचा पुनरुच्चार केला. प्रजा परिषदेवर बंदी होती पण त्यामुळेच तिचे सामर्थ्य वाढत चालले होते याची जाणीव संस्थानला नव्हती.

□

त्यानंतर माधवरावानी म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीसाठी प्रयत्न करायचे ठरवले. प्रचाराचे काम जोरदार चालू झाले. संस्थानविरुद्ध लढा द्यायचा म्हणजे अविश्रांत परिश्रमाची शर्त करणे आवश्यक होते. कार्यकर्त्यांनी कामाचा डोंगर उपसला. लोकनियुक्त २५ पैकी २२ जागा जिंकून बागलांच्या स्थानिक स्वराज्य संघाने नगरपालिकेत निर्विवाद बहुमत प्राप्त केले. सर्वांचे मत घेऊन माधवरावानी वसंतराव बागल यांची अध्यक्ष म्हणून निवड केली. दुसऱ्या वर्षी श्रेष्ठी वकील यांची निवड केली. त्यानतर काही दिवसानी प्रजापरिषदेवरची बंदी उठली.

'चले जाव' चळवळीच्या वेळी सगळा भारत पेटून उठला होता. प्रजापरिषद यामध्ये थोडी उशिरा पडली. माधवरावांनी लोकांना आणि महाराणीनासुद्धा चळवळीत भाग घेण्याचा आदेश दिला.

आता माधवरावाना अटक झाली ती राजकीय कारणामुळे. त्याना पन्हाळ्यास स्थानबद्ध करुन ठेवण्यात आले. संस्थानच्या कारावासापेक्षा हा सुसह्य होता. मुळात चित्रकार असलेले माधवराव पन्हाळ्याच्या सृष्टीसौंदर्यात रमले.

संस्थानचे दिवाण पेरी यानी माधवरावाची सुटका घडवून आणली. पेरीचा स्वभाव उदार होता.

संस्थानच्या राणीसाहेब ताराबाई याच्या जागी अॅडमिनिस्ट्रेटर आणण्याचा घाट ब्रिटिश सरकारने आणला. त्यावेळी माधवराव संस्थानशी असणारे आपले सबंध विसरले आणि त्यानी ताराबाईसाहेब याना वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केले.

प्रजापरिषदेमध्ये एक गट माधवरावाच्या विरुद्ध कारस्थाने करू लागला होता. माधवराव सिव्हिल बोर्डाचे अध्यक्ष होते. माधवरावानी त्या पदाचा राजीनामा देऊन टाकला. हेच लोक पुन्हा आपल्याला पूर्णतः काढून टाकणार आहेत याची त्यांना जाणीव नव्हती.

त्यानतर सरकारी नोकरांच्या लढ्यात माधवराव उतरले. कोल्हापूर दरबारने ब्रिटिश सरकारच्या पद्धतीने प्रथम मागण्या मान्य केल्याचे पत्रक काढले आणि लोक कामावर परत आल्यावर जैसे थी परिस्थिती ठेवली. दरबारच्या या आश्वासनभंगाचा निषेध म्हणून माधवरावानी प्राणांतिक उपोषण चालू केले अखिल भारतीय प्रजापरिषदेतर्फे कमलनयन बजाज आले. त्यानी दरबारशी वाटाघाटी केल्या आणि उपोषण मिटले.

□

एकीकडे छत्रपतीबद्दल प्रेम आणि एकीकडे जनतेचे प्रेम या दोन्हीच्या कैचीत सापडून काही वेळा माधवरावांच्या हातून असे काही घडून जाई की, त्याच्या पक्षातले लोक नाराज होत. श्रेष्ठी, वर्धमाने आणि रत्नाप्पा हे लोक एका वेगळ्या गटाचे होते.

छत्रपती शहाजीराजे याची निवड झाल्यापासून माधवरावाचे संस्थानिकाबद्दल मत बदलले होते. शहाजीमहाराजाच्या स्वभावात एक उमदेपणा आणि मोकळेपणा होता. त्यानी माधवरावाशी मित्रत्वाचे सबंध राखले.

अनेक वर्षांच्या लढ्यानतर कोल्हापूरची सत्ता लोकप्रतिनिधींच्या हातात द्यायचे ठरले ते शहाजी महाराजाच्या कारकीर्दीतच. प्रजापरिषदेने हे ध्येय गाठले. प्रजापरिषदेचे नेते या नात्याने माधवरावाकडे ते अधिकार आले.

माधवरावानी नावे पक्की केली, पण रत्नाप्पा कुंभारानी गृहमंत्रीपदाचा आग्रह धरला. आपल्या आत्मचरित्रात माधवरावानी रत्नाप्पांच्या गुणदोषाबद्दल बरेच लिहिले आहे. रत्नाप्पाच्या जीवनात व्यक्तिनिष्ठेखेरीज काही नाही असे ते लिहितात.

अखेर माधवरावांच्या हातात सत्ता आली होती. सगळ्या कारवायांवर विजय मिळवून ते कोल्हापूर संस्थानचे लोकनियुक्त सत्ताधीश बनले होते.

हा त्यांच्या अनेक वर्षांच्या लढ्याचा विजय होता.

ही सत्ता माधवरावांना फार काळ अनुभवायला मिळाली नाही. कारण तोपर्यंत स्वातंत्र्याची पहाट झालेली होती. संस्थाने विलीन होणार हे ठरल्यासारखे झाले होते.

थोड्या कालावधीत प्रजापरिषदेने राजकीय चळवळीत कामी आलेल्या २१ हुतात्म्यांच्या कुटुंबांना मानधन चालू केले. राजकीय वॉरंटे परत घेतली. राधानगरी, गारगोटी, बावडा इ. भागातील गरीब, धनगर, हरीजन यांना २५००० एकर जमिनी लागवडीस दिल्या. सरकारी नोकरांना सपकाळातील पगार मजूर केला. माधवरावांच्या डोळ्यासमोर समाजवादी राज्याचे स्वप्न तरळत होते. लेनिनप्रमाणे त्यांना कोल्हापूर मिळाले होते. आणखी काही काळ मिळाला असता तर त्यांना बरेच मनाजोगे करायचे होते.

म्हणून माधवराव आणि प्रजापरिषद विलीनीकरणाच्या विरुद्ध होते. कोल्हापूर संस्थान वेगळेच ठेवायचे त्यांच्या मनात होते. काँग्रेस जोपर्यंत पूर्णपणे समाजवादी होत नाही तोपर्यंत कोल्हापूर संस्थानने संघराज्यात विलीन होऊ नये असे त्यांचे मत होते. ते कोल्हापूर संस्थानचा वेगळा इतिहास लिहू पाहात होते.

प्रजापरिषदेचे नेतेसुद्धा त्याच मताचे होते. ४८ च्या अधिवेशनात शंकरराव म्हणाले,

'राज्य कोणाचे हवे हे ठरविण्याचा अधिकार जनतेला आहे. काश्मीरने कुठे सामील व्हावे, हे सार्वमताने ठरवले जावे असे हिंद सरकार म्हणते. जुनागडमध्ये सार्वमत घेतले गेले. मग त्याला अपवाद कोल्हापूर का?'

रत्नाप्पा गटाचे लोक विलिनीकरणाच्या बाजूने होते. माधवराव आणि इतर यांना आपल्या स्वप्नापुढे इतिहासाची पावले दिसत नव्हती.

गांधीच्या खुनाच्या दिवशी कोल्हापुरात ब्राह्मणांच्या घरांची जाळपोळ सुरू झाली. जमावाला शमवण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला.

माधवरावांचे मंत्रिमंडळ असल्याने माधवराव आणि मंत्रिमंडळ यांच्यावरच या जाळपोळीचा आरोप झाला. माधवरावांनी मुद्दाम या प्रकारांना चेतावणी दिली, जाळपोळीला प्रोत्साहन दिले असे ते आरोप होते. माधवरावांच्या विरोधी गटाने त्याचा फायदा उठवला आणि माधवराव बदनाम होत चालले. मुरारजी देसाईंनी माधवरावांना त्याचा जाब विचारला.

माधवरावांचे सरकार गेले आणि मि. नंजप्पा हे अॅडमिनिस्ट्रेटर म्हणून आले. कोल्हापूरची जाळपोळ आणि विलीनीकरणविरोधी वातावरण यामुळे त्यांना खास पाठवण्यात आले होते.

माधवरावांना भारत सरकारने अटक केली. प्रक्षोभक भाषणाचा आरोप त्यांच्यावर होता. स्थानबद्धतेच्या काळात माधवरावांना चिंतन करायला वेळ मिळाला. पूर्वीचे ते काँग्रेसचे, नंतर प्रजापरिषद पण आता प्रजापरिषदेचे अस्तित्व ठेवणे त्यांना रास्त वाटेना. काँग्रेसचे त्यांना आवतणं होते. पण काँग्रेसबद्दल त्यांच्या मनात कटुता निर्माण झाली होती.

सुटकेनंतर एक सभा घेऊन माधवरावांनी प्रजापरिषदेचे विसर्जन आणि शेतकरी कामगार पक्षात पदार्पण जाहीर केले.

विलिनीकरणानंतरसुद्धा म्युनिसिपालिटीवर माधवरावांचे वर्चस्व दोन तीन वर्षे होतच. या कालावधीत फुले, आंबेडकर आणि शाहू महाराज यांचे पुतळे बसवण्यात आले. आणखी काही लोकोपयोगी कामे करण्यात आली.

शे. का. पक्षात गेल्यावर माधवरावांना नवीन मित्र मिळाले. शे. का. पक्षालाही त्यांच्या वक्तृत्वाचा फार उपयोग झाला. पार्लमेंटच्या निवडणुकासाठी माधवराव स्वतः उभे राहिले नाहीत. त्यांनी पक्ष उमेदवाराचा प्रचार केला. काही वेळा त्यांना आपल्या मित्राविरुद्ध प्रचार करावा लागे पण स्पष्टपणे तसे सांगून ते पक्ष उमेदवाराच्या प्रचार सभा घेत. माधवराव हे 'भाईजी' या नावाने सुविख्यात होते भाईजींच्या सभा म्हणजे हमखास गर्दी खेचणाऱ्या. इतक्या सोप्या भाषेत बोलणारा दुसरा वक्ता नव्हताच.

त्यानंतर माधवरावांना संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्षपद मिळाले. 'संयुक्त महाराष्ट्र' हे श्रमजीवी वर्गाला फायदेशीर कसे आहे हे भाईजींनी उमरावतीच्या अध्यक्षीय भाषणात पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भाईजी संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी राबत राहिले. एकदा एक गोष्ट पटली म्हणजे त्यासाठी समर्पित होऊन

---

**भाई माधवराव बागल**

माजी मुख्यमंत्री : 'कोल्हापूर संस्थान'.
जन्म : १८ मे, १८९६.
मृत्यू : ५ मार्च, १९८६.
कला : लँडस्केप्स्, पोर्ट्रेटस्, बस्टस् इ.
चित्रे : बागल गॅलरी, ताराराणी विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठास भेट.
अध्यक्ष : महाराष्ट्र चित्रकार संमेलन, १९३९.
सल्लागार : आर्ट एज्युकेशन सल्लागार समिती
स्टेट आर्ट एक्झिबिशन, समिती.
समता चळवळ : अस्पृश्यासमवेत जगदंबा .
मंदिर प्रवेश, नृसिंहवाडी पादुका पूजन,
मिश्र विवाहात पुढाकार.
मजूर चळवळ : शाहू मिल, सिने–कामगार, शिंपी,
विडी–कामगार, हमाल, मेडिकल स्टाफ यांच्या संघटना.
संस्थान चळवळ : 'हंटर पत्र', करवीर इलाखा
खादी संघ, शेतकरी मोर्चा, प्रजा परिषद, राष्ट्रसेवादल,
नगरपालिका, नोकर संघ इ. माध्यमातून.
–संयुक्त महाराष्ट्र चळवळ.
–सीमा लढा.
साहित्य : १० तत्त्वविचार ग्रंथ. १९ सामाजिक विषयावर,
४ पुस्तके कला विषयावर, चार लघुकथा संग्रह,
व्यक्तिचित्रे आणि आत्मचरित्र.
¤

---

राबणे ही त्यांची खासियत असल्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळील, त्यांचा बराच फायदा झाला.

शे. का. पक्षाबद्दल त्याना आत्मीयता होती पण नंतर नतर शे. का. पक्षातले आतरिक कलह आणि मतभेद यामळे भाईजी त्यातूनही बाजूला झाले.

५४ सालापासून भाईजी सक्रीय राजकारणातून बाजूला झाले म्हणण्यापेक्षा बाजूला फेकले गेले म्हणणे अधिक रास्त होईल. त्यांच्या परीने ते प्रयत्न करीत राहिले; पण नतर तो जोम राहिला नाही. संस्थाने संपल्यावर ते तेजोवलयही पुसट होत चालले. जमाना बदलत चालला होता. आता भाईजीच्या शब्दातील ती ताकदही कमी कमी होत चालली होती. वय वाढत चालले तशी ताकदही कमी होत गेली. समाजवादाचे आणि समाजवादी समाजाचे स्वप्न स्वप्नच राहाणार ही जाणीवही बेचैन करीत होती.

¤

अखेरची वर्षे भाईजी शिवाजी विद्यापीठाच्या अतिथीगृहात होते. विद्यापीठावर त्याचे फार प्रेम होते. आपला एक चित्रसग्रह त्यांनी विद्यापीठाला दिलाय. विद्यापिठाच्या ग्रंथालयालासुद्धा त्यानी बरीच पुस्तके दिलेली आहेत. आपल्याजवळची छायाचित्रे आणि काही वस्तू त्यानी विद्यापीठाला दिलेल्या आहेत. त्या विद्यापिठाच्या शाहू सशोधन केंद्रात ठेवलेल्या आहेत.

भाईजीचे शेवटचे दिवस सुखाचे नव्हते. भाववाढविरोधी आंदोलन, सीमा प्रश्न आदीसाठी भाईजी लढ्यात उतरले होते. पण ते आतून खचले होते. शेवटी शिवाजी विद्यापीठात ते राहिले. यशवतराव चव्हाण त्यांना गुरुतुल्य मानत. 'विचारसंग्रह' या पुस्तकात यशवतरावांच्या पत्रावर प्रतिक्रिया लिहिताना ते लिहितात

'शिवाजी विद्यापिठाचे आजचे कुलगुरु कणबरकर यानी मला आत्महत्येपासून वाचवलं.'

शिवाजी विद्यापिठानं त्याना अखेर सामाळलं. आजचे कुलगुरू प्रा. भोगीशयन प्रथम आले तेव्हा अतिथीगृहात राहात होते. त्यावेळी माधवरावांचा आणि त्यांचा परिचय झाला. प्रा. भोगीशयन यानी हंगामी कुलगुरू असताना माधवरावांना डी. लिट. द्यावी अशी शिफारस केली होती.

आतून खचलेल्या माधवरावांची तत्त्वनिष्ठा प्रा. भोगीशयनना आवडली. माधवरावानाही त्याच्याबद्दल आत्मीयता वाटली. ते दररोज गप्पा मारत. माधवराव आपले अनुभव आणि सपर्कात आलेल्या व्यक्तीबद्दल भोगीशयनना सांगत. नव्वदी गाठत आलेल्या माधवरावांची स्मरणशक्ती आणि बुद्धिमत्ता याबद्दल भोगीशयनना फार कौतुक वाटे. माधवरावांना अतिथीगृहात जास्तीत जास्त समाधानाने राहाता यावे यासाठी त्यानी आपल्या परीने खूप प्रयत्न केले.

माधवरावानीसुद्धा त्याना जिव्हाळ्याचे स्नेही मानले. आपल्याकडील पुस्तके त्याना ते वाचायला देत. त्यावर अभिप्राय विचारत. पुढे भोगीशयन कुलगुरू निवासात राहायला गेले पण माधवरावाशी स्नेह कायम राहिला. माधवराव गवात जाताना आग्रहाने कुलगुरू निवासात थाबून त्यांच्याशी चर्चा करीत. पुन्हा माधवरावाना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले तेव्हाही ते माधवरावांना भेटायला गेले होते. नेहमीच्या मोकळेपणाने माधवराव त्यांच्याशी बोलले.

प्रा. के. भोगीशयन, हे त्याच्या शेवटच्या दिवसातील जीवाभावाचे स्नेही बनले हो'त. कुलगुरू म्हणून कर्तव्यकठोर असणारे प्रा. भोगीशयन माधवरावांविषयी बोलताना किंचित हळवे झाल्यासारखे भासले. शिवाजी विद्यापिठाने माधवरावांच्या अखेरच्या दिवसात एखाद्या पितृभक्त मुलाप्रमाणे त्याची देखभाल केली.

¤

पाच मार्चला रात्री उशिरा भाईजी हे जग सोडून गेले. शिवाजी विद्यापीठ, ताराराणी विद्यापीठ यामध्ये त्याची चित्रसंपदा आणि ग्रथसंपदा सोडून गेले. त्यात तत्त्वविचार आहे, लघुकथा आहेत, सामाजिक ग्रथ आहेत, व्यक्ती–चित्रण आहे, स्मृती ग्रथ आहेत. या सगळ्यानी भाईजीची स्मृती राहाणार आहे.

कर्मवीर शिंदे अखेरच्या दिवसात गहिवरून म्हणाले होते,

'माधवराव, तुमच्या हयातीत तुमची स्मारके उभारली जातील. आणि झालेही तसेच. भाईजीच्या हयातीतच शाहू मिल समोरच्या रस्त्याच्या चौकाला 'बागल चौक' हे नाव मिळाले. भाईजीच्या हयातीतच भाईजीच्या पुतळ्याचे कोल्हापुरात अनावरण झाले.'

शाहू मिलचे कामगार नेहमीच भाईजीचे स्मरण करतील. त्याच्या मागण्यांना दाद मिळत गेली ती भाईजीमुळेच.

भाईजीना आयुष्यात अनेक पुरस्कार मिळाले. पद्मभूषण, दलित मित्र भारत सरकारकडून, डी. लिट शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठानी दिली. राहुरीच्या कृषी विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स दिली. साहित्य संस्कृती मडळाने फेलोशिप दिली.

पण त्याना मोलाचे वाटले ते लोकाचे सन्मान. कोल्हापूर नगरपालिकेवर तिरंगा झेंडा फडकवताना लोकानी केलेला जयजयकार. अश्रुभरल्या डोळ्यानी 'बागल महाराजकी जय' म्हणून जनसामान्यानी खाद्यावर घेऊन नाचवताना जो आनंद त्यानी उपभोगला तो हजारो सन्मानाहून मोलाचा होता.

भाईजी निघून गेले. समाजवादाचे स्वप्न पाहणारा, संस्थानी सत्तेशी आणि ब्रिटिशाशी निर्धाराने टक्कर घेणारा, कुचल्याने निसर्ग जिवत करू पाहणारा, दीनदलित आणि अस्पृश्य यांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून तळमळणारा. अथाग काळोखातसुद्धा आपल्या प्रकाशाने आसमंत उजळू पाहणारा एक महान आत्मा कालवश झाला.

त्यांच्या ठायी दोष होते. काही वेळा जाती–अभिमान, राजनिष्ठा, मित्रनिष्ठा त्यांना गोंधळवून टाकत असे. पण तत्त्वनिष्ठा आणि विवेक याचा आधार त्यानी कधी टाकला नाही. सामान्यांना 'माणूस' म्हणून जगण्याचे हक्क मिळावे म्हणून भाईजी सामान्यांसवेच असामान्यरीत्या झगडले. त्याच्या चुकाचे त्यानी पदरी माप घेतले. त्यामुळे त्यांचा मोठेपणा आणखी उजळला

कोल्हापूर त्याना स्मरत राहील. महाराष्ट्राला त्याना विसरता येणार नाही. समाजवादी समाजाचे स्वप्न पाहणाऱ्यांना त्याचे जीवन नेहमीच स्फूर्ती देत राहील.

□

### तिहार तुरुंगातील भ्रष्टाचार वेशीवर टांगून सहज निसटून गेलेला



# चार्ल्स शोभराज

● अविनाश चाफेकर ●

**चा**र्लस गुरुमुख शोभराज हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अट्टल आणि धोकेबाज गुन्हेगार. तो आणि अन्य सहा कैदी दिल्लीच्या तिहार जेलमधून सहजगत्या पळून गेले आणि मग थोड्याच वेळात जेलमध्ये आणि दिल्लीत एकच धावपळ सुरू झाली. तिहार जेल हा अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्था असलेला जेल म्हणून मानला जातो. असे असताना हे लोक पळून जाऊ शकलेच कसे ?

त्या दिवशी दोन लोक जेलमध्ये आले. वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी मिठाई आणि फळफळावळ वाटण्याची परवानगी मागितली. जेल अधिकाऱ्यांनी ती सहजपणे दिली. काही रक्षक, अन्य कर्मचारी आणि बडे अधिकारी या सर्वांनी 'तो प्रसाद' घेतला आणि.. झालं ! एकेक जण आडवाच झाला. शरीर व मनावरील त्यांचा तावाच सुटला. नजर शून्यात लोंबकळू लागली. शोभराज आणि कंपनीचा हेतू साध्य झाला. मार्ग मोकळा झाला. जेल नंबर तीनचा पोलादी दरवाजा बिनधास्तपणे उघडला गेला. कार थांबलेलीच होती. तीत बसून सूर्याच्या साक्षीनं सातजण मार्गस्थ झाले.

अर्धा–पाऊण तासानं जेल अधिक्षकांना निरोप गेला. धावपळ सुरू झाली. अधिक्षक धावतच घटनास्थळी आले. धोक्याची बेल वाजू लागली. दिल्ली पोलीस कंट्रोल रूमला मेसेज गेला आणि मग देशभर पोलिसांना सावध करण्यात आले. दरम्यानच्या काळात जेलमध्ये मोजदाद झाली. 'किती आणि कोण' याची पाहणी झाली. सातजण गेल्याचं निष्पन्न झालं. त्यांची नावे आणि फोटो राज्याच्या पोलिसांकडे रवाना झाले. भारताच्या शेजारील व अन्य राष्ट्रांना निरोप पाठवून 'इंटरपोल'ला सावध करण्यात आले. अशा प्रकारे तपासणी चक्रे जोरात फिरू लागली.

दोन दिवसांनी एक तरुण गुन्हेगार दिनेश कुमार (वय १९) हा आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्याच्या येण्याने उंचच उंच गेलेल्या पोलिसांच्या आशा त्याच्या जबानीनंतर एकदमच खाली कोसळल्या. एका किरकोळ चोरी प्रकरणी चार महिन्यांची शिक्षा झालेल्या या दिनेशकुमारचा शोभराजच्या पलायनाशी काहीच संबंध नव्हता. केवळ दार उघडे दिसले म्हणून तो बाहेर पडला इतकेच. त्यामुळे शोभराजसंबंधी त्याच्याकडून काहीच माहिती कळू शकली नाही.

निराश झालेल्या पोलिसांच्या आशा दुसऱ्या दिवशी पुन्हा उगवल्या. भोलाराम नावाचा सातांपैकी आणखी एक कैदी ग्वाल्हेर येथे पोलिसांना सापडला. त्याच्याकडून बरीच इंटरेस्टिंग आणि उपयुक्त माहिती मिळाली. तो म्हणतो, मी व दिनेशकुमार (आपण होऊन स्वाधीन झालेला) बरोबरच बाहेर पडलो. काही अंतर दोघे बरोबर चालत गेलो आणि नंतर आपआपल्या मार्गाला लागलो.

शोभराजबद्दल तो म्हणतो, हा माणूस तुरुंगात एखाद्या राजकुमारासारखा राहात असे. कैदी व अधिकारी दोहोंवर त्याचा चांगलाच वट होता, प्रभाव होता. त्याला कोणी उलट प्रश्न करू शकत नव्हता. तुरुंगाच्या बाहेरील बाजूस 'पंडित' नावाच्या इसमाचं पानट्टीचे दुकान आहे. हा 'पंडित' त्याला वाट्टेल त्या वस्तू पुरवत असे. मांस, दूध, फळे या गोष्टी किलोवारी येत असत. बहुधा रोज, आणखी अनेक चैनीच्या वस्तू येत.

दहा–बारा स्त्रियासुद्धा त्याला तुरुंगात येऊन भेटत असत. त्यातील बहुसंख्य परदेशी होत्या आणि तिघी नेपाळी.

त्या रविवारी मिठाई व फळे वाढदिवसाच्या निमित्ताने वाटली, ही माहिती बरोबर नाही, असे भोलारामने सांगितले. तो म्हणाला, वाढदिवसाचं निमित्त वगैरे काही नव्हतं. शोभराज नेहमीच–बहुधा दर रविवारी–अनेक कैद्यांना आणि तुरुंग अधिकाऱ्यांनासुद्धा पार्टी देत असे. त्या दिवशीची पार्टी नेहमीसारखीच होती. गुंगीचे औषध मिठाईत नव्हते. 'फ्रुट कस्टर्ड' म्हणून जे वाटले त्यात काही तरी घातले

होते पुऱ्या आणि अन्य पदार्थही वाटण्यात आले. माझे जेवण नुकतेच झाले होते, म्हणून मी काहीच खाल्ले नाही

हे पलायन नाट्य घडवून आणण्यामागे सूत्रधार कोण होता? भोलाराम म्हणतो, राजू भटनागरने हे सारे घडवून आणले. (भटनागर हा एक दरोडेखोर आहे) त्याला कोर्टाने तीन महिन्यापूर्वी जामिनावर सोडलेले आहे 'डेव्हिड' असे नाव धारण करून तो त्या दिवशी तुरुंगात आला होता. पोलिसानी भोलाला राजूचा फोटो दाखवला. तो 'डेव्हिड आणि राजू' एकच व्यक्ती असल्याचे भोलाने ओळखले शोभराज आणि कपनीला तुरुंगाबाहेर जाण्यास या डेव्हिडनेच मदत केली आणि नतर त्यानेच मोटार हाकली.

हॉल नावाच्या एका ब्रिटिश तरुण गुन्हेगाराचाही त्यात साहाय्य झाल्याचे नतर निष्पन्न झाले आहे. त्यालाही पकडण्यासाठी अनेक देशाना सावध करण्यात आले आहे.

पलायन नाट्याच्या निमित्ताने काही गोष्टी नव्याने घडल्या तर काही उजेडात आल्या. तिहार जेलचे तीन प्रमुख विभाग पाडले आहेत–जेल नं. १, २ व ३. शोभराज जेल नबर तीनच्या गेटमधून पळून गेला अलिकडेच काही दिवस तो या विभागात होता. अस सागण्यात येते की, एका पत्रकाराला त्याची मुलाखत घ्यायची होती. ते काम सोपे व्हावे म्हणून त्याला त्याच्या नेहमीच्या विभागातून येथे आणण्यात आले आणि त्याच्या पलायनानतर उजेडात आलेली बातमी अशी की, जेल नं. तीनचे उपअधिक्षक श्री. पुष्कर्ण (वय ३३) हे शोभराजला बरेच जवळचे आहेत. त्याच्याच विभागातून तो पळाला!

## थायलंडला जायचे नव्हते!

शोभराजवर थायलंडमध्ये खुनाचा व अन्य बरेच गभीर आरोप आहेत, म्हणून त्या सरकारला तो हवा आहे. दोन वर्षांपूर्वीच भारतातील न्यायालयाने त्याला तिकडे पाठविण्यास हरकत नाही, थायलड सरकारच्या ताब्यात द्यावे, असा निर्णय दिला होता; परतु तरीही त्याला तिकडे पाठविण्यात आलेले नव्हते. परराष्ट्र खात्यात कोठेतरी घोडे अडले असे म्हणतात. त्या सरकारकडून वारवार विचारणा होत होती. गेल्याच आठवड्यात तशा अर्थाचे पत्र भारतात आले होते आणि असे सागतात की, शोभराज तेव्हापासून अस्वस्थ होता. काय कारण असावे? भारतातील गुन्ह्यापेक्षा त्याने थायलडमध्ये केलेले गुन्हे अधिक गभीर स्वरूपाचे आहेत. त्यामुळे तेथे मृत्युदडाची शिक्षा अटळ होऊन बसली आहे. कदाचित त्याच कारणासाठी त्याला तिकडे जायचे नसेल. त्याची पाठवणी दोन वर्षे लाबवता आली; परतु आता नव्याने आलेल्या थायलडच्या पत्रामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणामुळे, त्याची पाठवणी आता टाळण्यासारखी नसेल म्हणूनच त्याला 'तिहार' सोडणं अपरिहार्य झाल असाव.

शोभराजच्या पलायनानतर आणखी एक घटना लक्ष वेधून घेणारी ठरली. पलायनाची घटना दुपारी अडीचच्या सुमारास घडली. दिल्लीतच घडली आणि तरीही दूरदर्शनवर रात्री ८ ४० किंवा ९.३० पैकी कोणत्याच बातम्यात त्या घटनेचा उल्लेखही नव्हता. ससद अधिवेशन चालूच होतं. दक्ष लोकप्रतिनिधीनी या गोष्टीकडे सरकारच लक्ष वेधलं. माहिती व नभोवाणीमत्री बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ यांनी दूरदर्शन सचालकाला लगेच जाब विचारला. पुढे काय? सरकारी पद्धतीनुसार तपास चालू आहे.

येथवर आपण शोभराजच्या नाट्यमय आणि खळबळजनक पलायनासबधीची हकीगत पाहिली. पण एवढी खळबळ उडवून देणारा हा शोभराज आहे तरी कोण?

चार्लस गुरुमुख शोभराज हा जातीन सिंधी, जन्मान व्हिएटनामी आणि राष्ट्रीयत्व फ्रेंच असा चमत्कृतीपूर्ण इसम आहे. त्याचे वडील पुण्याच्या सिंधी समाजातील. ते सायगावला असताना एका फ्रेंच–व्हिएटनामी स्त्रीशी त्याचा सबध आला आणि शोभराजचा तेथेच जन्म झाला. पुढे तो आईबरोबर फ्रान्सला गेला. त्यामुळे त्याचे बालपण फ्रान्समध्ये गेले पुढे तो काही काळ पुण्यात वास्तव्य करून होता.

आई फ्रान्समध्ये, बाप भारतात, अशा विस्कटलेल्या कुटुबाचा बळी ठरलेला शोभराज गुन्हेगारीकडे वळला नसता तरच नवल.

'द लाइफ अॅण्ड क्राइम्स ऑफ चार्लस् शोभराज.' या नावाच एक पुस्तक ऑस्ट्रेलियातील लेखकानं लिहिल आहे. परवाच्या घटनेनतर एका वृत्तसस्थेच्या वार्ताहराने त्या लेखकाशी सपर्क साधला. तो लेखक म्हणाला; शोभराज हा अत्यत बुद्धिमान तितकाच 'डेन्जरस' इसम आहे. मार्गात आडवा येईल त्याला वाटेल त्या मार्गाने दूर करायला तो मागपुढ पाहात नाही. एका देशातून दुसऱ्या देशात सीमा ओलाडून जाण्यात तो तरबेज आहे. देशातर तो अतिशय बेमालूमपणे करतो. पर्यटकाचे पासपोर्ट चोरून त्या आधारे तो देशातर करतो. पोलिसाच्या हातावर तुरी देऊन तो अनेक वेळा असाच पळून गेला आहे परतु त्याच दुर्दैव म्हणजे प्रत्येक वेळी तो सापडला. सदर ऑस्ट्रेलियन लेखकाच्या अदाजानुसार तो तिहारमधून बाहेर पडल्यावर पाकिस्तानच्या दिशेने गेला असावा. कारण तोच देश त्याच्या दृष्टीन अधिक सुरक्षित. उत्तरेकडे तो जाऊ शकला नाही कारण नेपाळ सरकारलाही तो हवा आहे पूर्वेकडे बागला देश वा ब्रह्मदेश हे थायलडलाजवळ

शोभराजने फक्त पोलिसानाच 'आकर्षित' केल असं नव्हे, तर लेखक, पत्रकार, मनोविकारतज्ज्ञ अशा विविध क्षेत्रातील लोकाना त्यान आकृष्ट केल. आतापर्यंत त्याच 'जीवन' आणि 'कार्य' याविषयी दोन पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. तर पत्रकारानी आपल्या वृत्तपत्राचे किती रकाने त्याच्यावर खर्ची घातले, याचा हिशेबच नाही. एका सायकीआट्रीस्टनही त्याची दोन तास मुलाखत घेऊन त्याच्या मनाचं विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतातील फ्रेंच कॉन्सुलेटमधील एक सायकीआट्रीस्ट (मनोविकारतज्ज्ञ) डॉ. रेजीस अेअरॉल्ट हे शोभराजला सुमारे वर्षापूर्वी भेटले. त्यावेळी तो कर्नाटकातील तुरुगात होता. दोन तास त्याची मुलाखत घेतल्यावर त्याच मत पडल की तो मनोरुग्ण आहे. सामान्य बुद्धीचा आहे. प्रसिद्धीला हपापलेला आहे. त्याच्या बोलण्यात सुसगती नाही असं त्याना वाटत. तो अत्यत बुद्धिमान आणि एक 'हिरो' असल्याचं वलय त्याच्याभोवती निर्माण करण्यात आल असल तरी त्या गुणाचं निदर्शक अस त्याच्यात काहीच आढळलं नाही. त्याच बोलणं विसगत आहे,

असं सांगताना सदरहू डॉक्टर उदाहरण देतात की, प्रथम तो म्हणतो, मी कधीच खून केलेला नाही. पण तो थोडचा वेळानं सांगतो, चांगण्या माणसाला मी कधीच मारलं नाही. तसंच स्वतःच्या कृत्याचं तो सारखा समर्थन करीत असतो असं हे डॉक्टर सांगतात. परंतु या दोन्ही गोष्टीत मला मनोरुग्णतेचं लक्षण दिसत नाही. असे प्रकार नॉर्मल आणि अॅब्नॉर्मल अशा दोन्ही प्रकारच्या माणसात दिसतात. त्यामुळे एकंदर पार्श्वभूमीवरच याचा विचार करावा लागेल.

शोभराजनं त्यांना सांगितलं की, जे घडलं ते त्याचं 'कर्म' होतं. त्याला त्याबद्दल मुळीच खेद होत नाही. त्याची लेखक व्हायची इच्छा होती. 'लोकांपुढं येणं, लोकांना माहीत होणं महत्त्वाचं आहे. मग मार्ग कोणता का असेना. ध्येय गाठलं जातंय की, नाही हे महत्त्वाचं.'

त्याला दोन पुस्तकं लिहिण्याचं मनात होतं. एक हुंडापद्धतीवर आणि दुसरं गुन्हेगारीवर–पण आत्मचरित्रात्मक नव्हे.

## गुन्हेगारी की मनोरुग्ण ?

त्याच्या रुग्णतेचं लक्षण सांगताना डॉक्टर म्हणतात, तो अतिशय आत्मकेंद्रित आहे. वास्तविक डॉक्टरांनी त्याचीच माहिती मिळवण्यासाठी दोन तास मुलाखत घेतली. असं असताना तो स्वतः संबंधीच अधिक बोलणार नाही तर काय ? शिवाय त्याचं बरंच आयुष्य तुरुंगात गेलं. उरलेलं धक्कादायक घटनांना भरलेले. त्यामुळं स्वतःबद्दल सांगण्यासारखं त्याच्याजवळ बरंच आहे.

त्याचं कुटुंब विस्कळीत झालेलं, वडील त्याचा स्वीकार करीनात, वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत त्याला कोणत्याही देशाचं नागरिकत्व मिळू शकलं नाही, एका फ्रेंच तरुणीनं त्याच्याशी विवाह केला पण ते बंधन फार काळ टिकू शकलं नाही. अशा एकंदर मानसिक आघात करणाऱ्या घटनांमुळं तो मनोरुग्ण बनला असं डॉक्टरांचं म्हणणं. मनोरुग्ण बनण्यास परिस्थिती अनुकूल होती. एवढा अर्धा भागच डॉक्टरांचा पटण्यासारखा आहे. पण मनोरुग्ण बनला हे म्हणणं पटू शकत नाही. या परिस्थितीमुळे तो गुन्हेगार बनला असं म्हणता येईल. कारण ती जगजाहीर वस्तुस्थिती आहे.

तो समाजाशी समरस होऊ शकला नाही, हे मनोरुग्णतेचं (सायकोमॅथ) आणखी एक लक्षण डॉक्टर सांगतात. समरस होऊ शकला नाही ही वस्तुस्थिती असली तरी मनोरुग्णतेमुळं ते घडलेलं नसून त्याच्या गुन्हेगारीमुळं ते घडलेलं असणं अगदी स्वाभाविक आहे.

डॉक्टरांनी काढलेले निष्कर्ष केवळ दोन तासांच्या मुलाखतीत काढता येण्यासारखे नाहीत. तो मनोरुग्ण असणारच असं गृहीत धरून डॉक्टर मुलाखतीला गेल्यामुळे मानसशास्त्राच्या पुस्तकातील कारणमीमांसा आणि प्रत्यक्ष त्याचं जीवन यात साम्य आढळताच डॉक्टर महाशय भारावून गेलेले दिसतात. असो.

एस्. व्यंकटनारायण या पत्रकारानं गेल्या वर्षी मे महिन्यात शोभराजची सविस्तर मुलाखत घेतली. त्यांच्या मुलाखतीच्या अनेक बैठका झाल्या. सदर पत्रकार म्हणतो, या मुलाखतीतून माझं असं मत बनलं आहे की, शोभराज आतापर्यंत ज्या प्रकारचं जीवन जगला त्याला तो कंटाळला आहे. शोभराज म्हणतो, गुन्हेगारीला मी माझी जीवनपद्धती किंवा जीवनकार्य समजून पत्करलेलं नाही. ( आय हॅव नॉट टेकन टू क्राइम अॅज अ वे ऑफ लाइफ ) त्याचबरोबर साधं सरळ जीवन जगण्याची संधी मी आता गमावली आहे, असंही मला वाटत नाही. तुरुंगातून मी सुटून आलो की योग्य जीवन जगण्याची माझी इच्छा आहे.

शोभराजचे चरित्रकार लिहितात, शोभराजला जर्मन तत्वज्ञ नित्शे फार आवडतो. या नित्शेनं एके ठिकाणी म्हटलं आहे, 'द ग्रेटेस्ट जॉय ऑफ एक्झिस्टन्स ईज टू लिव्ह डेन्जरसली !'

## जेलमधील भ्रष्टाचार

शोभराजच्या पलायनांतून अनेक प्रश्न निर्माण होतात. तिहार जेल हा अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्था असलेला जेल मानतात. म्हणजे नेमकं काय ? भिंती जाडजूड आणि उंच असणं, जाड लोखंडी गजांची दारं आणि भारी शस्त्रे घेतलेले सुरक्षासैनिक पहाऱ्याला असणं यालाच कडक सुरक्षा व्यवस्था म्हणता येईल का ? शोभराजच्या पलायनातच त्याचं उत्तर सामावलेलं आहे. या साऱ्या गोष्टींवर नियंत्रण ठेवणारं जेलचं प्रशासन पोलादीमनाचं आणि पहाडासारख्या निष्ठेचं हवं. तर त्या पोलादी दरवाजाला आणि पहाडासारख्या भिंतींना अर्थ प्राप्त होतो.



**'साधं, सरळ जीवन जगण्याची संधी हवी होती–आहे...वगैरे' शोभराज**

□

तिहार जेलचं प्रशासन 'पोलादी' आणि 'पहाडासारखं' नव्हतं म्हणूनच हे असं घडू शकलं. शोभराजनं तिहार जेलमधील त्याच्या वास्तव्यात तेथील अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले. त्यांना सतत काही ना काही देऊन त्यांच्या डोक्यावर मिंधेपणाचं ओझं निर्माण केलं. इतकेच काय पण त्याला भेटायला येणाऱ्या लोकांशीही तेथील कर्मचाऱ्यांचे, रक्षकांचे इतके मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले होते की ते पाहुणे त्यांचं चेकिंग न होता आत जाऊ शकत होते. जवळ जवळ रोज शोभराजकडे कोणी कोणी येत असे.

मादक पदार्थांच्या व्यवहारांशी शोभराजचा असलेला संबंध जेल अधिकाऱ्यांना माहीत नव्हता असं नाही. तोच काय पण इतर कैदीही मादक पदार्थांचा व्यवहार जेलमध्ये मोठ्या प्रमाणावर करीत होते. मेन गेटवर कोणत्याही प्रकारे चेकिंग होत नसे. त्यामुळे मिठाईच्या बॉक्समधून, बुटांमधून अशी द्रव्ये जेलमध्ये आणली जात. गेल्या वर्षी डिसेंबरात दोन कैद्यांचा जेलमधेच मृत्यू झाला. त्यातील एक जण विषारी पदार्थ सेवन केल्यामुळे मरण पावला. त्या संदर्भात लोकसभेत १८ डिसेंबरला गृहमंत्री चव्हाण यांनी सांगितले होते की, तिहार जेलमधील मादक पदार्थांचे व्यवहार थांबवण्यासाठी दिल्ली प्रशासन अनेकविध उपाय

योजित आहे. चेकिंगसाठी जादा वॉर्डर नेमले आहेत. परंतु वस्तुस्थिती वेगळीच आहे.

दुसरी ढिलाई अधिकाऱ्यांच्या वर्तनातील म्हणता येईल. शोभराजने आजवर अधिकाऱ्यांना खाऊ घातले ते कितीही शुद्ध अंतःकरणानं असेल. परंतु एखाद्या कैद्याकडून तुरुंग अधिकाऱ्यांनी वारंवार मेजवानी स्वीकारणं ही गोष्ट अनैतिक, शिस्तभंग करणारी, धोक्याची आणि कर्तव्याची जाणीव नसणारी अशीच म्हणावी लागेल. त्याचीच फळं आज त्यांना भोगावी लागत आहेत.

शोभराज आणि तिहार जेल यांच्याबद्दल अधिक खोलवर जाऊन माहिती घेतली तर वरील भाष्य फारच सौम्य वाटेल अशी परिस्थिती आहे. तिहार जेलमधील अधिकाऱ्यांना जेल अधिकारी का म्हणावं असा संभ्रम पडावा.

शोभराज टेपरेकॉर्डर जवळ ठेऊन जेलभर हिंडत असे. अधिकारी–अधिकारी, कैदी–कैदी, अधिकारी–कैदी यातील बोलणी तो टेप करून ठेवीत असे. अनेक गैर प्रकारांशी संबंधित अशी ही बोलणी असत. या टेपच्या आधारे तो अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करी. यामुळे अनेक भ्रष्टाचारी अधिकारी त्याच्या पूर्ण कह्यात आले होते, तर काहींना त्याने मिंधे करून ठेवले होते. काही वर्षांपूर्वी बी. एल्. विज नावाचे जेल सुपरिंटेंडेंट होते, तर एस्. एन्. त्रिखा हे डेप्युटी सुपरिंटेंडेंट होते. शोभराज जवळजवळ दिवसभर त्यांच्या ऑफिसात गप्पा मारत बसलेला असे. त्यांच्याबरोबर हसणं, खिदळणं चालू असे आणि सायंकाळनंतर? दोघेही अधिकारी शोभराजच्या रूममध्ये पडलेले! सोबतीला रम आणि रमा!!

याच दोघा अधिकाऱ्यांना त्याने १९८०च्या डिसेंबरात धमकीचं पत्र लिहिलं होतं. त्यात तो म्हणतो, जेलमधील भ्रष्टाचाराच्या अनेक कथा मला माहीत आहेत आणि तुमच्याविरुद्धचे भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायला पुरेसा पुरावाही माझ्याजवळ आहे.

हे झालं भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांशी त्याचं वागणं? जे निष्ठावान, प्रामाणिक अधिकारी होते त्यांच्यापुढे याची डाळ कशी शिजत असे? एकदा जेलमध्ये वेदप्रकाश गर्ग म्हणून असि. सुपरिंटेंडेंट होते. शोभराजला त्यांनी दिवसभर मेनगेटजवळ घोटळताना पाहिलं. त्यांनी त्याला तेथून निघून जायला सांगितलं. त्यानंतर थोड्याच दिवसात श्री. गर्ग यांची दुसरीकडे बदली झाली.

राकेश कौशिक नावाच्या जन्मठेपेच्या एका कैद्याने १९८० मध्ये सुप्रीम कोर्टात एक अर्ज केला आणि शोभराज जेलमध्ये फार मोठे रॅकेट चालवतो, अशी तक्रार केली. त्या सविस्तर तक्रार अर्जाचा सविस्तर विचार कोर्टात चालू असतानाच इकडे अर्जदार राकेश कौशिक याला विषबाधा झाली. कशी झाली कळले नाही. गंभीर अवस्थेत त्याला हॉस्पिटलात न्यावे लागले. त्यानंतर लौकरच सुप्रीम कोर्टाने कौशिकच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सुबोध मार्कंडेय यांची नेमणूक केली. कौशिकचे बरेच आरोप खरे असल्याचे आढळून आले. तरी सुप्रीम कोर्टाने नंतर न्यायालयीन चौकशीचा आदेश दिला. अखेर त्यातून काहीही निष्पन्न झालं नाही.

ही दोन उदाहरणं केवळ नमुन्यादाखल दिली आहेत.

तिहार जेलमधील हे प्रकार वाचून वाचकांच्या मनात साहजिकच प्रश्न उद्भवला असेल की, राजधानीच्या परिसरातील एका बड्या तुरुंगात असे प्रकार घडूच कसे शकले? आणि इतके वर्षानुवर्ष? घरातून माळे असतात. या माळ्यात सामान्यतः अडगळीचं सामान ठेवलेलं असतं. काही जुन्या व मोडक्या वस्तू अशा असतात की, त्या धड टाकवत नाहीत आणि वापरताही येत नाहीत. अशा वस्तू आपण माळ्यात टाकून देतो. कधी तरी होईल उपयोग. या वस्तूंकडे आपण वर्षानुवर्षं नजरसुद्धा फिरवत नाही किंवा माळ्याची झाडलोटही करीत नाही. असा बराच काळ लोटला तर तिथे खूप उंदीर, पाली, झुरळं होतात. एखादा उंदीर गोळ्या घातल्यामुळं मरून पडतो किंवा मांजरी तिथं विते आणि मग त्या निमित्तानं आपलं त्या माळ्याकडं लक्ष जातं. आपण त्याची झाडलोट करतो, आवराआवर करतो.

मला काय म्हणायचं आहे हे सूज्ञ वाचकांच्या लक्षात आलंच असेल. तिहार जेल हा अशा माळ्यासारखा आहे असंच ना!

सरकार वा विरोधी पक्ष कोणीच या पलायन नाट्याची फारशी दखल घेतलेली दिसत नाही. सरकारतर्फे एक निवेदन करण्यात आलं आणि तेवढ्यावरच भागलं. विरोधी पक्षांनी सरकारला धारेवर कसं धरलं नाही? विचार करता करता एक गोष्ट ध्यानी आली की, काचेच्या घरात राहून दुसऱ्यावर दगडफेक न करण्याचा शहाणपणा विरोधी पक्षांनी दाखवलाय! जनता राजवटीच्या काळापासून या घटना चालत आल्या आहेत. त्यामुळे 'तेरी बी चूप मेरी बी चूप' अशी भूमिका त्यांनी घेतलेली दिसते.

जनता सरकारनंतर इंदिरा सरकार आलं. घटना चालूच होत्या. चालूच राहिल्या. आता तर मिस्टर क्लीन यांचं सरकार! त्यांच्या सरकारमध्ये तर 'यशस्वी एक्झिक्युटिव्ह' आहेत! कोणाचंच या माळ्याकडं लक्ष गेलं नाही? □

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे!

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# रंगभूमी

## भोपाळच्या कलाकारांचे ‘स्कंधगुप्त’ आणि ‘अंधायुग’

वि. भा. देशपांडे

गेल्या डिसेंबरमध्ये भोपाळच्या भारत भवन या संस्थेचे कलाकार पुण्यात आलेले होते. त्यावेळी त्यांनी दोन नाटके पेश केली होती. एक होते ‘ घाशीराम ’ आणि दुसरे ‘ महानिर्वाण ’. पण ही मूळची मराठी नाटके असल्याने त्यातल्या सादरीकरणाव्यतिरिक्त अन्य आकर्षण आपल्याला काही नव्हते. पण हेच कलाकार आता नुकतेच हिंदी नाटकांचे प्रयोग होऊन पुण्यात आले होते. त्यातले एक ब्रेश्टचे नाटक सोडल्यास उरलेली नाटके मूळची हिंदीभाषिक होती. ही नाटके पुण्यात आणण्याला निमित्त होते पुणे विद्यापीठाचा हिंदी विभाग. या विभागाच्या रौप्य महोत्सवानिमित्त अनेक कार्यक्रम आयोजण्यात आले होते. त्यामध्ये हा नाट्योत्सव होता. विद्यापिठाच्या एखाद्या विभागाने स्वतंत्रपणाने नाट्योत्सव आयोजित करावा ही अभिनंदनीय गोष्ट आहे. डॉ. दुर्गा दीक्षित आणि त्यांचे सहकारी यांचे त्या संदर्भात आवर्जून कौतुक करायला हवे.

जयशंकर प्रसाद यांचे ‘ स्कंदगुप्त ’ हे नाटक आपण केवळ ऐकले असेल. काहींनी ते परीक्षेच्या निमित्ताने अभ्यासलेही असेल. पण त्याचा प्रयोग पाहण्याचा योग निदान आपल्याकडे तरी येत नाही. तो या निमित्ताने आला. प्रसाद यांच्या नाट्यकृतीला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यांनी हे नाटक स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिले. त्यावेळी इंग्रजी सत्तेविरुद्ध भारतीय जनता आक्रमक पवित्र्यात होती. देशसेवा, देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मूल्ये प्रभावीपणाने निरनिराळ्या स्तरांवरून व्यक्त होत होती. तो मूल्यविचार समोर ठेवून तत्कालीन जनतेमध्ये काही चेतावणी मिळावी अशा हेतूने हे नाटक लिहिले असावे असे वाटते. कारण यातली स्कंदगुप्त ही व्यतिरेखा राष्ट्रनायक या स्तरावर निर्माण केली आहे. केवळ एखादा ऐतिहासिक कालखंड किंवा त्यातल्या व्यक्ती–प्रसंग घेऊन नाट्यरचना करण्याचा त्यांचा विचार नव्हता. त्यामागे निश्चित अशी दृष्टी होती. जशी मराठी नाटकांच्या संदर्भात खाडिलकरांकडे होती.

या नाटकाचा प्रयोग म्हणजे वस्तुपाठ असावा इतका उत्तम होता. यातल्या कलाकारांची निवड, त्यांची वेशभूषा, त्यांची संवादभाषा बोलण्याची पद्धती, दिग्दर्शकाने केलेल्या विरचना, वापरलेले संगीत आदी अनेक गोष्टींचा झालेला एकसंध परिणाम स्मरणीय असाच होता. नाटकाचे दिग्दर्शन आणि संगीत नियोजन बी. व्ही. कारंथ यांनी केलेले होते. वेशभूषेची संकल्पना रोबिनदास यांची होती. अभिनयाच्या हिशेबात सर्वात लक्षवेधी ठरला तो स्कंदगुप्ताची भूमिका करणारा संजय मेहता. भूमिकेच्या वयाच्या जवळपास दिसणारा असा तो होता. शब्द पोहोचवण्याची त्याची ताकद चांगली होती. त्याच्या जोडीने ध्यानात राहिला तो मुद्गलच्या भूमिकेतील अमरसिंह हा कलाकार.

‘ अंधायुग ’ हे डॉ. धर्मवीर भारती यांचे प्रख्यात काव्यनाट्य. आधुनिक हिंदी नाटकांमध्ये या नाटकाचे स्थान अग्रक्रमाने आहे. विशिष्ट नाटके दिग्दर्शकाला सतत आव्हानात्मक असतात तशांपैकी हे एक आहे. त्यामुळे या नाटकाचा आणि नाटककाराचा दबदबा मोठ्या प्रमाणात आहे. वास्तविक या नाटकाचे मूळ लेखन नभोवाणीसाठी होते. पण त्यातले नाट्य रंगमंचावर येणे अगत्याचे आहे असे वाटून सत्यदेव दुबेने ते प्रथम प्रयोगरूपात आणले. नंतर इब्राहिम अल्काझी यांनी त्याचा प्रयोग करून हे नाटक रंगभूमीवर अधिक सुप्रतिष्ठित केले. इतके की, अल्काझी, दिल्लीची राष्ट्रीय नाट्य शाळा आणि हिंदी नाटक यांचा जेव्हा जेव्हा विषय निघतो, त्यामध्ये ज्या नाटकांचा आवर्जून उल्लेख होतो असे हे नाटक. इतर अनेक दिग्दर्शकांनी या नाटकाचा प्रयोग एक आव्हान म्हणून केलेला आहे.

भोपाळच्या कलाकारांनी जो प्रयोग पेश केला त्याचे दिग्दर्शन बन्सी कौल यांचे होते. हे राष्ट्रीय नाट्यशाळेचे प्रख्यात विद्यार्थी आहेत. नामवंत दिग्दर्शक म्हणूनही परिचित आहेत.


‘ अंधायुग ’ हे महाभारतातील एका विशिष्ट कालखंडावरचे भीषण नाट्य आहे. महाभारतात झालेल्या युद्धाचे विध्वंसक चित्रण यामध्ये आहे. याचे वर्णन असेही केले जाते की हे नाटक म्हणजे जळत्या शहरासारखे आहे. ज्या शहरातले लोक या आगीपासून बचवावण्यासाठी आंधळ्याप्रमाणे धावत आहेत. केवळ धृतराष्ट्र आणि ( पट्टी बांधल्यामुळे ) गांधारी हे दोघेच अंधजन नव्हते तर युद्धाच्या भयाण स्थितीमुळे सारे वातावरण निरनिराळ्या स्तरांवर अंधजनांचे गाव असावे तसे होते. जो तो आपल्या दुःखाचे खापर दुसऱ्यावर फोडण्यात मग्न आहे. धृतराष्ट्राला युद्धभूमीवर सत्य काय घडले ते सतत हवे आहे. सत्य भयाण आहे हे कोणी कोणाला सांगायचे म्हणून संजय संभ्रमात आहे. हे नाटक दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे अलिकडच्या काही दशकातले आहे म्हणून त्याला येणारी अर्थपूर्णता वेगळीच आहे. संदर्भही वेगळा आहे.

पण इतकी अर्थपूर्णता होऊन आलेला नाट्यानुभव आपल्याला चांगल्या अर्थाने अस्वस्थ करील असे वाटले होते; पण तसे घडले नाही. काव्यात्म नाट्याला तितकीच तरल, संवेदनक्षम अशी अभिनयशैली अपेक्षित असते तसे या प्रयोगाच्या संदर्भात घडले नाही. परिणामी प्रयोगाची रंगत उतरत गेली. प्रेक्षक आणि नाट्यानुभव यांच्यात

अंतर पडत गेले. याला मुख्य कारण घडले ते म्हणजे अश्वत्थामा आणि काही व्यक्तिरेखांची भडक अभिनयशैली. विशेषतः अश्वत्थाम्याने ज्या प्रकारचा उच्च स्वर लावला होता आणि शारीर हालचालींच्या संदर्भात जी कसरत चालू ठेवली होती ती आक्रस्ताळी होती. त्याने साऱ्या नाटकाचा तोल बिघडवला.

या प्रयोगाची जमेची बाजू म्हणजे बी. व्ही. कारथ यानी दिलेले संगीत. सगीताचा वापर करताना छत्तीसगडी पडवानी गायनशैली वापरली होती. ( ज्यानी हबीब तन्वीर याचे 'चरणदास चोर' नावाचे नाटक पुण्यात काही वर्षांपूर्वी पाहिले होते त्याना या गायनशैलीची याद असेल. ) या गायनाबरोबरच छाऊ आणि मणिपुरी लोकनृत्याची झलकही होती. पण ती फारशी प्रभावी ठरली नाही. विभा मिश्र हिने केलेली वेशभूषा-सकल्पना काल आणि नाट्याशयाला अनुकूल होती. मी अल्काझींच्या प्रयोगाच्या अनेक कथा ऐकल्या आहेत, छायाचित्रे पाहिली आहेत, त्यावरची समीक्षणे वाचली आहेत, अल्काझी जेव्हा पुण्यात व्याख्यानाला आले होते तेव्हा त्यांच्याही तोडून त्यांच्या प्रयोगाविषयी ऐकले आहे. त्या तुलनेत किंवा स्वतत्रपणानेही भोपाळच्या कलाकारांचा प्रयोग निष्प्रभ वाटला. पण त्याचे परिश्रम मात्र सतत जाणवत होते

बी. व्ही. कारथ यांनी हिंदी रंगभूमीच्या सदर्भात दोन व्याख्याने दिली. कारथ वक्ते नाहीत, पण विचारवंत-कलावंत आहेत. त्यानी हिंदी रंगभूमीच्या प्रेरणा-प्रवृत्तीचे चित्र थोडक्यात पण उत्तम रीतीने उभे केले. विशेषतः पारसी रगभूमीचा प्रभाव, रंगभूमीचे हिंदी नाटककाराना पूर्वी नसलेले आणि नंतर आलेले भान, एकांकिका लेखनाची त्रुटी इत्यादी गोष्टींचा उहापोह त्यानी केला. तो करताना भारतेंदु, जयशकर प्रसाद, लाल धर्मवीर भारती, मोहन राकेश आदींच्या नाट्यकर्तृत्वाचे विवेचनही समाधानकारक केले.



दूरदर्शन

## ती निष्पाप होती का ?

गुरुवार दि. २० मार्च या दिवशी सध्याकाळी दूरदर्शनवर सादर झालेले 'ती निष्पाप होती का ?' हे श्री अजितेम् जोशी यानी लिहिलेले नाटक विषयाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण होते.

श्री प्रधान, सौ. प्रधान आणि त्यांची दोन मुले असे एक आधुनिक, चौकोनी, सुशील, सुसस्कृत कुटुब. सौ. प्रधान नोकरीत भ्रष्ट आहेत असे श्री. प्रधानाना कळते. ते अस्वस्थ होऊन मुलाना ही गोष्ट सागतात. तिघे मिळून सौ. प्रधानला जाब विचारतात. इच्छा नसताना केवळ नजरचुकीमुळे पैसे खाणाऱ्यांच्या साखळीत एकदा तिला जावे लागते. त्यामुळे तिने राजिनाम्याचा निर्णय घेतला आहे असे ती सांगते. राजीनामा न देता भ्रष्टाचाराशी झगडण्यासाठी तेथेच रहा असा सल्ला श्री. प्रधान तिला देतात.

बहुतेक नाटक-चित्रपट, कथा-कादंबऱ्यात 'स्त्री'चा भ्रष्टाचार चारित्र्याशी, शीलाशी निगडीत असतो. दारिद्र्यापायी किंवा अतिश्रीमतीच्या हावेने कचेरीत काम करणाऱ्या स्त्रिया त्याच्या 'बॉस'शी सबध ठेवतात वगैरे सगळे पाहून आता कंटाळा आला आहे. या नाटकाचा विषय तसा नव्हता. एका मध्यमवर्गीय स्त्रीवर लाचलुचपतीचा आरोप हा विषय म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण वाटला. अजुनही पैशांच्या भ्रष्टाचारात मध्यमवर्गीय स्त्रिया म्हणण्यासारख्या आढळत नाहीत या वास्तवतेचे दर्शनही याच नाटकामध्ये झाले.

मात्र नाटक एकदर ढोबळ वाटले. अनेक गोष्टी खटकल्या. श्री. प्रधान, त्याच्या सवादातून विचारी, सुजाण, समजस न्यायप्रिय असे उभे केले आहेत. जिच्याबरोबर वीस वर्षे संसार केला आहे ती पत्नी भोळसट सरळ स्वभावामुळे कदाचित निष्काळजीपणामुळे भ्रष्टाचाराच्या साखळीत सापडली गेली असेल याचा अदाज या सुजाण पतीला येऊ नाही ? आश्चर्यच वाटते श्री. प्रधान स्वत च्या मुलीला-रश्मीला पत्नीबद्दल म्हणतात, नुसतं कोणाच्या सागण्यावरून मी बोलत नाही. मी स्वतः पाहिलं आहे. ती करप्ट आहे.' परंतु सौ. प्रधानाचा भ्रष्टाचार कधी, केव्हा, कोठे श्री. प्रधानांच्या दृष्टीस पडला ते नाटकातून कळूच शकले नाही. पैसे देणारे आणि घेणारे आपल्या साखळीत सौ प्रधानला कपटाने दबावाने खेचतात असे दाखविले आहे भ्रष्टाचारी वर्तुळात एखादी व्यक्ती कोरडी रहाणे इतराना परवडण्यासारखे नसते हे खरेच. तरीही सौ. प्रधानवर त्यासाठी दबाव येणे हे पटत नाही. याला कारणे अनेक आहेत. नोकरी करणाऱ्या बहुसख्य स्त्रियांच्या मनावरही घर आणि ससार हेच आपले मुख्य क्षेत्र हा सस्कार ठाम असल्यामुळे स्वत.च्या टेबलावरचे काम आज्ञाधारकपणे पार पाडण्याखेरीज इतर बाबतीत त्याना रस नसतो. त्यामुळे पैशाचे वाममार्गी व्यवहार भोवताली नेमके कसे चालले आहेत हे अनेकदा त्याना कळतच नाही. (पैसे नको म्हणून सौ. प्रधान केबिनमधून जाते. तेव्हा पैसे फाइलमध्ये सारले जाऊ शकतील हे तिच्या लक्षात येत नाही या अज्ञानाचे द्योतक ) कळले तरी पारपारिक सस्काराच्या पगड्यामुळे वाममार्गी व्यवहार करणाऱ्याशी सहसा त्या संघर्षाला उभ्या रहात नाहीत (सौ. प्रधान मला पैसे नको असे निक्षून सांगते; पण तुमच वागण मला पटत नाही असे अधिकाऱ्याला बिलकूल म्हणत नाही.) पैसे देणारे आणि घेणारे हे ओळखण्याइतके धूर्त असतातच. सौ. प्रधानसारख्या सरळ मार्गी स्त्रीला 'वाटा' न दिल्यास आपले काहीही बिघडणार नाही ये या धूर्त माणसाना चागले माहिती असते. त्यामुळे फाजील औदार्य दाखवून स्वतःचा तोटा ते करून घेतील हे सभवनीय नाही.

नाटकाच्या पार्श्वध्वनीनी अनेक ठिकाणी रहस्यमय वातावरण निर्माण केले. विषय लक्षात घेता त्याची बिलकूल आवश्यकता नव्हती. सौ. प्रधानच्या हातून कोणत्या प्रकारचा भ्रष्टाचार होतो ही मुख्य बाब फार शेवटी सागितली गेली. नाटकाच्या पहिल्या अर्ध्या भागात कुटुबातले केवळ अस्वस्थ वातावरण तेवढेच दाखवले गेले. त्यामुळे सुरुवातीला नाटक सथ झाले श्री. विक्रम

गोखले, श्रीमती मंगला पटवर्धन, कु. मृणाल देव यांच्या सुंदर अभिनयामुळे नाटकाचा हा पहिला भाग कंटाळवाणा झाला नाही इतकेच. केवळ ताणलेले वातावरण दाखवण्यापेक्षा सौ. प्रधानच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारे एक दोन प्रसंग नाटकात आले असते तर बरे असते.

विषयाची मांडणी सरधोपट असली तरी विषयाचा वेगळेपणा, भ्रष्टाचाराचे शेवटपर्यंत राखलेले रहस्य आणि सुजाण अभिनय यामुळे दूरदर्शनवरच्या या नाटकाने शेवटपर्यंत आपली पकड ठेवली.

—विनया खडपेकर

चित्रपट

# शर्त

## गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध

हिंदी चित्रपटात दोन प्रकारच्या व्यक्ती असतात. सज्जन आणि दुष्ट. यातली चांगुलपणाची सगळी मक्तेदारी नायक आणि त्याची आई, वडील वगैरे तत्सम कुटुंबीय मंडळी यांच्याकडे असते आणि दुष्टपणा करायची सगळी जबाबदारी अर्थातच खलनायक आणि कंपनीकडे. हे लोक जन्मतःच खुनशी वगैरे असतात आणि वेळ जात नसल्यासारखे स्मगलिंग करणं, खून करणं वगैरे उद्योग करत असतात; पण हे झालं सरळसोट समीकरण. एखादा गुन्हा घडतो तेव्हा त्याला गुन्हेगाराची पार्श्वभूमी, तो गुन्हा करायला प्रवृत्त व्हायची कारणं त्याची मानसिक स्थिती या गोष्टी कारणीभूत असतातच. या सगळ्याचा शोध घ्यायचा प्रयत्न करण्याचं धाडस केतन आनंदनं 'शर्त' या आपल्या पहिल्याच चित्रपटात दाखवलं आहे. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून एखाद्या गुन्ह्याचा विचार करणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट असावा. म्हणूनच हे धाडस स्तुत्य ठरतं.

'शर्त'चा नायक (आणि खलनायकही) ज्या पद्धतीचे खून करतो तशा प्रकारच्या खुनांसाठी रामन राघव किंवा जॅक दि रिपर प्रसिद्ध आहेत. शहरात अचानक वेश्याव्यवसाय करणाऱ्या किंवा पतीशी एकनिष्ठ नसणाऱ्या तरुणींचे खून होऊ लागतात आणि पोलिसखातं खडबडून जागं होतं. खून करणाऱ्याचा हेतू काय हे लक्षात येत नाही आणि खुन्यानं काही पुरावाही मागं ठेवलेला नसतो. ठेवलेला असतो तो फक्त एक निगेटिव्हचा तुकडा. हे सगळे खून पौर्णिमेच्या रात्रीच होत असतात.

खुनाचा तपास लागत नाही आणि शेवटी हे काम अर्जुन (कंवलजित) या इन्स्पेक्टरकडे येते. फोटोची निगेटिव्ह आणि तिच्यामागं लिहिलेला शेर पाहून या प्रकारात आपला मित्र विक्रमचा (नसिरुद्दीन शाह) हात असावा अशी शंका त्याला येते. इथं फ्लॅशबॅकने त्यांच्या जीवनातले प्रसंग दाखवलेत. विकी आणि अर्जुन हे एकमेकांचे जिवलग मित्र. दहा रुपयांच्या नोटेसाठी अफलातून पैजा लावणारे. त्यांच्या आयुष्यात एक दिवस किरण (शबाना आझमी) येते. एका नाटकाच्या ग्रुपबरोबर ती आलेली असते; पण नंतर ती या दोघांच्याच कॉलेजमध्ये दाखल होते. या तिघांच्यात चांगली मैत्री होते. विकी आणि अर्जुन दोघंही तिच्यावर प्रेम करू लागतात.

अतिशय हुशार असलेल्या विकीला स्कॉलरशिप मिळते. त्याचवेळेस आपली आई वेश्या असल्याचं आणि जिला आई मानलं ती तिच्यापेक्षाही वाईट असल्याचं त्याला कळतं आणि तो वेडापिसा होतो. किरण आपल्यावर प्रेम करते असा त्याचा समज असतो; पण तिनं अर्जुनची निवड केली आहे हे त्याला कळतं आणि तिनं आपल्याला फसवलं अशी त्याची समजूत होते. त्याचाच परिणाम म्हणून त्याचा मानसिक तोल बिघडतो आणि खूनसत्र सुरू होतं.

विक्रम प्रसिद्ध फोटोग्राफर असतो. त्याच्याबरोबर काम करणाऱ्या रुही (सारिका) या मॉडेलचाही खून होतो आणि अर्जुनची विक्रम गुन्हेगार असल्याबद्दल खात्रीच होते; पण त्याच्याकडे पुरावा नसतो. परिणामी विक्रम मोकळाच रहातो; पण अर्जुन त्याच्यावर नजर ठेवतो. किरणचा खून करण्यासाठी



विक्रम येतो; पण ऐनवेळेस तिथं आलेल्या अर्जुनच्या हातून तो मारला जातो.

'शर्त' हा रहस्यपट नक्कीच नाही. सुरुवातीला रहस्याचं वातावरण निर्माण केलं असलं तरी लगेचच खुनी कोण उघड होतं; पण चित्रपटातला तणाव कायम ठेवण्यात दिग्दर्शक यशस्वी ठरला आहे. त्यामुळे चित्रपट खूपच प्रभावी ठरतो. जोडीला रिलीफ म्हणून कॉलेजजीवनातले प्रसंग आहेतच. ते खूपच रंगले आहेत. केतन आनंदनं पहिलंच दिग्दर्शन असूनही चित्रपट चांगला पेलला आहे. चित्रपटाचा विषय अवघड असला तरी विक्रमचा मूळ हसरा स्वभाव आणि त्याचं एका थंड, क्रूर खुन्यात होणारं रूपांतर, जिवलग मित्र एकमेकाविरुद्ध उभे राहिल्यावर निर्माण होणारा ताण हे सगळं फिल्मीपणा येऊ न देता

व्यवस्थित दाखवण्यात तो खूपच यशस्वी ठरला आहे. बंजाऱ्यांच्या वस्तीतलं तसंच मॉडेल्सवर चित्रित होणारं गाणं त्यानं टाळलं असतं तर अधिक बरं झालं असतं.

नसिरुद्दीन, शबानासारखे कलाकार घेतल्यानं दिग्दर्शकाचं काम अधिकच सोपं झालं आहे. नसीरनं हसतखेळत जगणारा विकी आणि लागोपाठच्या धक्क्यांनी मनोरुग्ण बनलेला जी. जी. माथूर ही दोन अगदी वेगळी रूपं चांगली उभी केली आहेत. एकाच माणसाच्या या दोन व्यक्तिमत्त्वातला फरक तो सराईतपणे दाखवतो. आई वेश्या आहे आणि किरणनं आपल्याऐवजी अर्जुनची निवड केली आहे हे कळल्यावर तो उध्वस्त होतो, तो प्रसंग तर त्यानं कमालीचा रंगवलाय.

त्याच्या तुलनेत शबाना आणि कंवलजितला कमी वाव आहे; पण शबानाची ही भूमिका तिच्या अलिकडच्या दुःखी, गंभीर भूमिकांपेक्षा खूप वेगळी, अधिक मोकळी आहे. त्यामुळे तिला बघायला बरं वाटतं. कंवलजित दिसायलाही चांगला आणि त्याचं कामही व्यवस्थित आहे. या तीनही मुख्य पात्रांच्या व्यक्तिरेखा लेखकानं सुस्पष्ट रेखाटल्यात. त्यामुळं त्यांना कमी-जास्त वाव असला तरी फारसा फरक पडत नाही. सारिकाला मात्र ग्लॅमरस दिसण्याखेरीज काही काम नाही. इतर भूमिकात दीना पाठक, टॉम आल्टर, उदयचंद्र, मॅकमोहन वगैरे आहेत

चित्रपटाचं संगीत भप्पी लाहिरीचं आहे. त्यातली दोन गाणी वर म्हटल्याप्रमाणं अनावश्यक आहेत. त्याचं संगीतही यथातथाच आहे. 'तेरा मेरा-तेरा-मेरा पहला याराना' हे गाणं मात्र चित्रपट संपल्यानंतर सुद्धा लक्षात रहातं.

एक मनोरुग्ण गुन्हेगारांकडं वेगळ्या दृष्टीनं पहाणारा चित्रपट म्हणून 'शर्त' नक्कीच लक्षणीय ठरतो.

— सीमा कुलकर्णी


## राजहंसचे विज्ञान प्रकाशन

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो
बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षात आपण सगळेच टारझन ठरू
की काय ?

अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ
वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या
जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.
एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही
जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.

या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून
ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत
प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या
सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे
खुलासा करणारे पुस्तक

**या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय?**

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन
पुणे

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर (प.) मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ४२२५४५५

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

**महाराष्ट्र साहित्य परिषदेने**
**पारितोषिक देऊन गौरविलेले**
**राजहंस प्रकाशन**

# भ्रम आणि निरास

**लेखक : डॉ. नरेंद्र दाभोळकर**

**पृष्ठे : १४० / किंमत : ३० रुपये**

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतल्या एका कार्यकर्त्याने बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म, ग्रहांचे खेळ यासारख्या आपल्या समाजात ठाण मांडून बसलेल्या गोष्टींचे केलेले शास्त्रशुद्ध विवेचन आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतले प्रत्यक्ष अनुभव.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. । फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई ४०० ०२८ । फोन : ४२२ ५४५५